(सभापतीस्थानी माननीय सभापती)

बेळगांव महानगरपालिका निवडणुकीत

महाराष्ट्र एकीकरण समितीला मिळालेल्या यशाबद्दल अभिनंदन

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला आपल्या परवानगीने एक महत्वाचा विषय उपस्थित करावयाचा आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मी सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मी आपल्याला बोलण्यासाठी परवानगी देईन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कर्नाटक सरकारने बेळगांव महानगरपालिका बरखास्त केल्यानंतर नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये मराठी माणसांनी बेळगांव महानगरपालिकेत पुन्हा बहुमत मिळविले आहे. त्याबद्दल महाराष्ट्राच्यावतीने व या सभागृहाच्यावतीने आपण सर्वांनी सर्व बेळगांवकरांचे अभिनंदन केले पाहिजे. बेळगांव महानगरपालिका बरखास्त केल्यानंतर आम्ही आपणासह आझाद मैदानावर जमलेल्या बेळगावकरांना भेटण्यासाठी गेलो होतो. सुप्रीम कोर्टामध्ये प्रश्न प्रलंबित असल्यामुळे असा विजय मिळविणे गरजेचे होते. बेळगांवमध्ये अजूनही मराठी माणसांचा हक्क आहे आणि मराठी माणसांचे बहुमत आहे हे तेथील निकालावरुन सिध्द झालेले आहे. त्यामुळे बेळगांवकरांचे व तेथील जनतेचे सभागृहाने अभिनंदन केले पाहिजे आणि सभागृहात अभिनंदनाचा ठराव मंजूर झाला पाहिजे अशी मी सभागृहाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटाचे आरोपी न सापडणे

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी निषेध नोंदविण्यासाठी या ठिकाणी उभा आहे. या मुंबईमध्ये दिनांक 12 मार्च रोजी साखळी बॉम्बस्फोट झाले होते, त्याला आज 20 वर्षे झाली आहेत. पण यातील आरोपी पकडण्यात शासनाला यश आलेले नाही. त्याचा निषेध नोंदवून मी आपल्या माध्यमातून शासनाला त्याची जाण करुन देत आहे. या बॉम्बस्फोटामध्ये शेकडो माणसे मृत्युमूखी पडले. त्याचे आरोपी पकडण्यात शासनाला आजपर्यंत अपयश आलेले आहे. आजपर्यंत एकाही आरोपीला पकडलेले नाही. शासनाने त्याचा जनतेला जाब दिला पाहिजे अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करीत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना आपली ज्येष्ठता समजून घेऊन मी सांगू इच्छितो की, एखादा प्रश्न सदनामध्ये मांडावयाचा असेल तर त्याबाबत सभापतींची परवानगी घेणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आता जो विषय सभागृहात उपस्थित केला आहे, त्याबाबत त्यांनी माझ्याकडे भावना व्यक्त केली होती. त्यावेळी मी त्यांना प्रश्नोत्तराच्या तासानंतर आपण आपले विचार मांडावेत असे सांगितले होते. परंतु त्यांच्या भावनांचा उद्रेक झाल्यामुळे अपवाद म्हणून मी त्यांना बोलण्याची परवानगी दिल्यावर त्यांनी त्यांचे म्हणणे मांडले. मी पुन्हा एकदा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगेन की, आपल्याला एखादा मुद्दा मांडावयाचा असेल तर ती बाब आपण सभापतींच्या नजरेला अगोदर आणणे आवश्यक आहे. हे औचित्य आपण पाळणे गरजेचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

पुणे शहराचा पाण्याचा वाढीव कोटा पूर्ण करण्यासाठी भामा आसखेड धरणातून पाणी मिळण्याबाबत

(१) * ३७११० श्री.मोहन जोशी , श्री. शरद रणपिसे , श्री.संजय दत्त , श्री.एम.एम.शेख , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराचा पाण्याचा वाढीव कोटा पूर्ण करण्यासाठी भामा आसखेड धरणातून २.६ टीएमसी पाणी मिळण्याबाबत मंत्रीमंडळात मान्यता घेण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये मा.उपमुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मान्यता घेण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहराला वाढीव पाणी मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप प्रश्न भाग १ बाबत मंजुरी घेण्यात आली नसल्यास, त्या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : (१) (२) व (३) शासन निर्णय दि.७.१२.२०११ अन्वये पुणे महानगरपालिकेसाठी भामा आसखेड प्रकल्पातून १.३० टीएमसी तसेच शासन निर्णय दि. १६.२.२०१३ अन्वये १.३७ टीएमसी वाढीव पाणी आरक्षणास मंजुरी देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे भामा आसखेड धरणातून पुणे महानगरपालिकेसाठी एकूण २.६७ टीएमसी पाणी आरक्षण मंजूर करण्यात आले आहे.

(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहराच्या दृष्टीने पाणी पुरवठ्याचा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे याची मला कल्पना आहे. परंतु पुणे शहरातील जनतेला भीषण परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. पुणे शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शासनाने पुणे महानगरपालिकेत नव्याने 23 गावांचा समावेश केलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भविष्यामध्ये आणखी 28 गावे पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. पुण्यामध्ये संरक्षण खात्याचे मोठमोठे कारखाने आहेत. इतर मोठमोठे प्रकल्प आहेत. या सर्व प्रकल्पांना पुणे महानगरपालिकेकडून पाण्याचा पुरवठा केला जातो. मी माननीय उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो, त्यांनी भामा आसखेड मधून 2.67 टीएमसी पाणी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. 2013 चे पुणे डोळयासमोर आणले तर भामा आसखेड मधून आणखी 1 टीएमसी पाणी मिळण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने शासन विचार करील काय ? सध्या खडकवासला, पानशेत, वरसगाव अशा धरणातून पुण्याला दरवर्षी जवळपास 14 टीएमसी पाणी पुरवठा होतो. 2016मध्ये पाटबंधारे विभाग आणि पुणे महानगरपालिकेचा करार संपणार आहे. 2016 सालासाठी पुणे महानगरपालिकेने 16 टीएमसी पाण्याची मागणी केलेली आहे. ही मागणी शासन मान्य करील काय ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : पुणे शहराला जलसंपदा विभागाच्या प्रकल्पातून पाणी दिले जाते. खडकवासला प्रकल्पातून 11.50 टीएमसी पाणी दिले जाते. खडकवासला प्रकल्पातून वारजेसाठी 10टीएमसी पणी दिले जाते. पवना प्रकल्पातून वाघोलीसाठी 0.342 टीएमसी पाणी दिले जाते. भामा आसखेडमधून 2.67 टीएमसी पाणी दिले जाते. जेव्हा पुणे महानगरपालिकेची शेवटची मागणी जलसंपदा खात्याकडे आली त्यावेळी 2020-21 ची लोकसंख्या 48.36 लक्ष इतकी कळविली होती. त्यामध्ये 30 टक्के तरल लोकसंख्या धरुन एकंदरीत 62.87 टक्के लोकसंख्येला घरगुती वापरासाठी 150 लिटर, औद्योगिक वापरासाठी 6 लिटर, पाणी गळतीसाठी 23 लिटर राष्ट्रीय मापदंडाप्रमाणे प्रतिदिनी प्रतिमाणसी येणारा कोटा हा 14.50 टीएमसी इतका होतो. यावरुन हे स्पष्ट होत आहे की 2020-21च्या लोकसंख्येला पुरेल एवढया पाण्याचा वापर पुणे शहर आताच करीत आहे. 2011-2012चा पाण्याचा वापर पाहिला तर तो 16 टीएमसी इतका आहे. महानगरपालिकेने मागणी केली तर भामा आसखेड मधून अतिरिक्त टीएमसी पाणी देण्याचा विचार निश्चितपणे केला जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37110....

श्रीमती दिप्ती चवधरी : पुणे शहरासाठी 16 टीएमसी पाण्याचा वापर होतो हे माननीय मंत्री महोदय कशाच्या आधारे सांगत आहेत ? पुणे शहरामध्ये पाण्याची गळती फार मोठ्या प्रमाणावर होत असते. ही बाब शासनाच्या वारंवार निदर्शनास आणून दिलेली आहे. पाण्याची गळती होऊ नये यासाठी पाईप लाईन बदलण्याची गरज आहे. तेव्हा ही पाण्याची गळती थांबविण्यात येईल काय ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : पुणे महानगरपालिकेच्या डिस्ट्रिब्युशन लाईनमधून पाण्याची गळती होते. आमच्या कालव्याच्या दुरुस्त्या चालू असतात.

डॉ. नीलम गो-हे : भामा आसखेडच्या बाबतीत बरेच दिवस प्रलंबित असलेला निर्णय अखेर झाला हे योग्य झाले. हा निर्णय झाल्यानंतर मागील काही काळामध्ये पाणी सोडले गेले आहे काय ? पुणे शहरामध्ये पाण्याची टंचाई असेल तर त्याची जबाबदारी जनतेने देखील स्वीकारली पाहिजे. गेल्या तीन महिन्यामध्ये पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर दुष्काळग्रस्तांचे लोंढे येत आहेत. या लोंढ्याचा विचार करता शहरासाठी किती पाण्याचे प्रावधान करावे लागेल यासंबंधी शासनाने काही निर्णय घेतलेला आहे काय ? माननीय उपमुख्यमंत्री येथे उपस्थित आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये येणा-या दुष्काळग्रस्तांच्या लोंढ्याच्या बाबतीत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

...नंतर श्री. गिते

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, पुणे शहराचे प्रतिनिधित्व करीत असलेले सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी, सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी, सन्माननीय सदस्या डॉ. नीलग गोऱ्हे यांनी पाण्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. खरे तर वरसगाव, पानशेत, खडकवासला आणि टेमघर या चार धरणांचे पाणी पुणे शहराला पिण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे काम जलसंपदा विभाग करीत आहे. ज्या ज्या वेळी पुणे शहराची पिण्याच्या पाण्याची मागणी वाढते, त्या त्या वेळी पिण्यासाठी जास्तीचे पाणी देण्याचे काम देखील जलसंपदा विभागाने केलेले आहे. परंतु पुणे शहराच्या खालच्या बाजूस असलेल्या हवेली, इंदापूर आणि दौंड या तीन तालुक्यात धरण झालेल्या भागातील लोकांचे पुनर्वसन केलेले आहे. या धरणाखाली ज्यांची जमीन-जुमला, घरे गेली आहेत, ते लोक आम्हालाही पाणी मिळाले पाहिजे अशी मागणी करु लागले आहेत. जलसंपदा विभागाने स्पष्टपणे पुणे महानगरपालिकेला सांगितले की, आपण एवढया प्रमाणात पाणी घेत आहात. पण राज्य सरकारने पहिले पाणी पिण्यासाठी, दुसरे पाणी शेतीला आणि तिसरे पाणी उद्योगधंद्यांना अशा प्रकारचे धोरण स्वीकारलेले आहे. मात्र पुणे शहराचे सर्व पाणी सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्टच्या व्दारे नदीला येत नाही.

आपण सर्व सदस्य बघतो की, भीमा नदीचे पाणी अतिशय घाण झालेले आहे आणि तेच पाणी पुढे उजनी येथे जाते. म्हणून पुणे महानगरपालिकेला जलसंपदा विभागाकडून वेळोवेळी सांगितले आहे की, काहीही झाले तरी तुमच्या अर्थसंकल्पामध्ये जास्तीचा निधी हा सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्टकरिता दाखविण्यात यावा. तुम्ही जेवढे पाणी वापराल, तेवढे पाणी आम्हाला द्यावेच लागणार आहे. भामा आसखेडचे पाणी पुणे शहरासाठी नव्हते. मात्र तेथील 2.7 टी.एम.सी.पाणी देण्याबद्दलचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. हा निर्णय घेण्यासाठी राज्य सरकारने कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण केलेली नाही. हे पाणी माणसांना पिण्याकरिता नाही, परंतु त्या पाण्यावर ट्रिटमेंट करुन जनावरांना पिण्यासाठी उपयुक्त होईल.तसेच त्या पाण्यात मासे देखील जगतील आणि शेतीला उपयोगी होईल अशा योग्यतेचे करुन नदीमध्ये सोडून नदीतील ते पाणी पुन्हा कॅनॉलमध्ये टाकण्याचे पुणे महानगरपालिकेने मान्य केले आहे. परंतु अजून ते काम झालेले नाही. त्या संदर्भात बंधाऱ्याचे काम झालेले आहे. ते काम पूर्ण झाले तर आम्हाला पुणे शहराखालील तालुक्यांमधील शेतकऱ्यांना सांगता येईल की, आम्ही तुमचे पाणी कमी करीत केलेले नाही. तुम्हाला मागणी प्रमाणे पाणी उपलब्ध करुन देत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, पुणे जिल्हयाचा पालक मंत्री म्हणून मला देखील अनेक वेळा अडचणी येतात. ग्रामीण भागालाही पाणी द्यावे लागते आणि शहरी भागालाही पाणी द्यावे लागते. सदरहू पाण्यावर ट्रिटमेंट करुन कॅनॉलव्दारे पाणी पुरविण्याचे काम पूर्ण झाले तर ग्रामीण व शहरी हा भेदभाव निश्चितपणे आटोक्यात आणता येईल. या बाबतीत राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी दरम्यानच्या काळात पुणेकरांना आवाहन केले होते की, आपण काटकसरीने पाणी वापरावे. आज राज्यातील अनेक शहरांमध्ये 15-15 दिवस पिण्यासाठी पाणी मिळत नाही. काही शहरांमध्ये दोन-दोन दिवसानंतर, काही शहरांमध्ये तीन-तीन दिवसानंतर पिण्यासाठी पाणी मिळते आहे. पिंपरी-चिंचवडला पवनी धरणातून पाणी येते. मी मघाशी उल्लेख केलेल्या चार धरणांचे पाणी पुणे शहराला मिळते. 2.67 टीएमसी पाणी मंजूर केलेले आहे.

सभापती महोदय, आपणही शेतकरी आहात. पुणे शहरातील जवळपास 25 हजार एकराचे पाणी पुणे शहरातील बारमाही शेतकऱ्यांना पुरेल या बाबतीत मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. पुणे शहरासाठी बंद पाईप लाईनमधून पाणी आणून पाण्याच्या अपव्यय टाळावयाचा आहे. पुणे महानगरपालिका याबाबतीतील टेंडर काढून लवकरात लवकर काम पूर्ण करेल, त्याच वेळेस सदर पाणी नगर रोडला मिळणार आहे. परंतु पाणी मात्र आरक्षित करुन ठेवलेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पुणे शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्या माणसांच्या लोंढयांचा प्रश्न उपस्थित केला आहे. आज सभागृहात दुष्काळावर चर्चा होणार आहे. राज्याचे प्रमुख म्हणून सदरहू दुष्काळाच्या बाबतीत केलेल्या उपाययोजनाच्या अनुषंगाने उत्तर देऊ. परंतु या बाबतीत राज्य सरकारची भूमिका अशी आहे की, मराठवाडयातील काही जिल्हयांमध्ये दुष्काळ आहे, विशेषत: सोलापूर, नगर, सातारा, सांगली, पुणे या जिल्हयांमध्ये सुध्दा दुष्काळ आहे. दुष्काळी जिल्हयातील माणसांचे लोंढे पुणे शहरात येऊ नयेत म्हणून त्या लोकांसाठी त्यांच्या मूळ गावी टँकरने पाणी पुरवठा करणे, रोजगार हमी योजनेची कामे उपलब्ध करुन देणे, तसेच ते लोक त्यांच्या मूळ गावी रहावेत यासाठी त्यांना आवश्यक त्या सुविधा देणे गरजेचे आहे, त्या देणे, यासाठी राज्य सरकार आग्रही आहे आणि तशा पध्दतीने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिलेल्या आहेत. 1972 साली पडलेल्या दुष्काळाला राज्य शासन सामोरे गेले आहे. 2003 साली पडलेल्या दुष्काळाला राज्य शासन सामोरे गेले आहे. एवढया उपायोजना करुनही पुणे शहरात माणसांचे लोंढे आले तर शेवटी त्यांना सुविधा देण्याच्या बाबतीत शासन तसूभरही कमी पडणार नाही, अशा प्रकारची खात्री मी सभागृहाला देतो.

श्री.जयंत प्र.पाटील : पुणे शहर अतिशय झपाटयाने वाढते आहे. पुणे शहरात मोठया प्रमाणात इमारतींचे बांधकाम होत आहेत. बांधकाम व्यवसायिकांनी इमारतींच्या बांधकामास लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था केल्यानंतरच नवीन इमारतींच्या बांधकाम करण्यास परवानगी देण्याबाबतचे शासन धोरण ठरविणार आहे काय ? जो पर्यंत पाऊस पडत नाही, तोपर्यंत पुणे शहरातील इमारतींचे होत असलेली बांधकामे थांबविण्याबाबतचा निर्णय शासन घेईल काय ?

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, कन्स्ट्रक्शनच्या बाबतीत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांना शासनाने सूचना दिलेल्या आहेत की, पिण्याचे पाणी कन्स्ट्रक्शनसाठी वापरु नये. पुण्यामध्ये पेशवेकालीन वेगवेगळ्या प्रकारचे पाण्याचे सोर्सेस उपलब्ध आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या काही भागामध्ये विंधन विहिरी घेतल्या तर त्या विहिरीतील पाणी पिण्यायोग्य नसते. परंतु ते पाणी बांधकामाला उपयोगी पडणारे असते. त्यामुळे पिण्याच्या पाण्यावर कोणताही परिणाम न करता इतर वेगवेगळ्या सोर्सेसमधून उपलब्ध होणारे व पिण्यास योग्य नसणारे पाणी वापरण्यास शासनाकडून कोणताही विरोध असण्याचे कारण नाही. उपलब्ध असणारे पाणी मात्र 31 जुलै, 2013 ही तारीख लक्षात ठेवून पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरासाठी आरक्षित ठेवले आहे. हे आरक्षित पाणी दोन्ही शहरातील नागरिकांनी काटकसरीने वापरावे एवढीच शासनाची अपेक्षा आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी सविस्तर उत्तर दिले आहे. पुणे महापालिकेकडून पुढील वर्षी रिसायकल करुन जनावरांना पिण्यायोग्य 6.5 टीएमसी पाणी देण्याच्या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. हे पाणी उपलब्ध करुन देताना करारामध्ये अंतर्भूत करावयाची अट शासनाने मान्य करावी. आज मुळशी धरणातून एकही टीएमसी पाणी पुणे महापालिकेला मिळत नाही. 100 वर्षापूर्वी ब्रिटिश काळात जो करार झाला होता त्या कराराला आजपर्यंत शासनाने हात लावलेला नाही. पुढील 25 वर्षाचा विचार करुन पुणे महापालिका आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेला मुळशी धरणातून किमान 4 ते 5 टीएमसी पाणी वापरण्यास देण्यासाठी पावले उचलली जातील काय?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मुळशी धरण हे टाटा कंपनीचे असून त्या धरणातील पाण्यावर वीज निर्मिती केली जाते व ही वीज विशेषत: मुंबई शहराला पुरविण्यात येते. मध्यंतरीच्या काळात आदरणीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांनी हस्तक्षेप करुन टाटा कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा केली व बोगदा काढून त्याद्वारे 1 टीएमसी पाणी नदीमध्ये सोडण्यास सुरुवात झाली. नदीच्या दोन्ही बाजूला जी गावे आहेत त्या गावांना बारमाही पाणी मिळेल अशी व्यवस्था केलेली आहे. आज देखील त्या नदीमध्ये पाणी सोडण्याचे काम सुरु आहे. मुळशी धरणातील 1 टीएमसी पाणी टाटा कंपनीकडून उपलब्ध झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी पुणे शहराची वाढ लक्षात घेऊन पाण्याचे नियोजन करण्याबाबत सूचना केली आहे. या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, भविष्यात कोणीही राज्यकर्ते असले तरी त्यांना पहिले प्राधान्य पिण्याच्या पाण्याकरिता द्यावे लागणार आहे. वापरलेले पाणी रिसायकल करुन शेतीला उपलब्ध झाले तर आज शेतीसाठी जे चांगले पाणी उपलब्ध करुन दिले जाते ते पाणी पुणे शहराला उपलब्ध करुन देता येईल. आज पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहर चारही बाजूंनी झपाट्याने वाढत आहे. दोन्ही शहरांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यामध्ये राज्य सरकारकडून कोणतीही अडचण येऊ दिलेली नाही. तशाच पध्दतीचे नियोजन पुढच्याही काळात राहील.

सभापती महोदय, पुणे शहराच्या वरच्या बाजूला एखादे धरण बांधण्याचा शासनाचा प्रयत्न होता. नवी मुंबई शहरासाठी मोरबे धरण बांधण्यात आले आहे. मुंबई महापालिकेने पिंजाळ, काळू, शाई धरण बांधण्याचा निर्णय घेतला त्यासाठी राज्य सरकारने मान्यता दिलेली आहे. आज पुणे शहराच्या वरच्या भागात धरण बांधण्यासाठी साईट उपलब्ध नाही. वरुन पडणारे पाणी अडवून वळविता येईल का? हा एक विचार करण्याचा मुद्दा आहे. शेवटी लवादाच्या प्रश्नाबरोबर इतरही प्रश्न आहेत. झपाट्याने लोकसंख्या वाढत राहिली तर राज्याच्या राज्यकर्त्यांना निर्णय घ्यावाच लागेल. कोयना धरण असेल, टाटा कंपनीचे मुळशी धरण असेल.....

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 37110.....

श्री. अजित पवार ....

या धरणातील पाणी पिण्यासाठी किंवा शेतीसाठी वापरले जात नाही परंतु त्या पाण्याचा उपयोग वीज निर्मितीसाठी केला जात असेल तर वीज निर्मितीसाठी लागणारे पाणी आपल्याला कमी करावे लागेल. ही वेळ आता आलेली नाही परंतु पुढे अशा प्रकारची वेळ आली तर निश्चितच त्याचा विचार केला जाईल. यासंदर्भात टाटा कंपनी किंवा इतर कोणत्याही कंपनीशी चर्चा करुन त्यातून शासन मार्ग काढण्याचा निश्चित प्रयत्न करेल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अरुणावती नदी प्रकल्प (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) येथील जलक्षोभनाशक कुंडाच्या दुरुस्तीच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

(2) * 36849 डॉ.रणजित पाटील , श्री.प्रवीण पोटे पाटील , श्री.विनोद तावडे : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अरूणावती नदी प्रकल्प (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) येथील जलक्षोभनाशक कुंडाच्या सन 2011-12 मध्ये मंजूर दुरुस्तीच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबतचे निवेदन सहाय्यक मुख्य अभियंता-1, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी पत्र क्रमांक 180/वै.धा/12, दि. 11/9/2012 विषयांकिताबाबत मुद्येनिहाय तक्रार कार्यकारी संचालक, नागपूर व सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर तक्रारीची मुद्ये निहाय चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, मुद्दे निहाय चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेंद्र मूळक, श्री.सुनील तटकरे, यांचे करिता : (1) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे या विषयीचे दि.11/9/2012 चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(2) क्षेत्रीय स्तरावर अन्वेषण कार्यवाहीत आहे.

(3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सदर प्रकल्पाच्या जलक्षोभनाशक कुंडाच्या सन 2011-2012 मध्ये झालेल्या कामात अनियमितत झाली असून यासंदर्भात सहाय्यक मुख्य अभियंता-1, जलसंपदा यांनी विदर्भ पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी संचालकांना तसेच सचिव जलसंपदा विभाग यांना मुद्दे निहाय तक्रार दिली होती. या प्रकल्पाच्या मूळ कामाला सन 2009-2010 मध्ये केवळ 80 पॅनलच्या कामाची निविदा देण्यात आली होती. या पॅनलचा खर्च 5.5 कोटी रुपये अपेक्षित होता व त्याप्रमाणे हे काम पूर्णही झाले. परंतु सन 2011-2012 मध्ये सदर काम 136 वाढीव पॅनलचे काम दाखविण्यात आले. सदर मूळ काम 80 पॅनलचे असतांना वाढीव काम 136 पॅनलचे दाखविण्यात आले. या वाढीव कामाची किंमत 7.5 कोटी रुपये दाखविण्यात आली असून त्याची कोणतीही निविदा न काढता हे काम जुन्या ठेकेदाराला दिले गेले. या विषयाच्या संदर्भात मी माहिती मागितली असता मला असे कळविण्यात आले की, या बाबत येथील ठिकाणचे श्री. राठोड अध्यक्ष, आर्नी तालुका विकास परिषद यांनी यासंदर्भात निविदन दिले होते. तसेच सन्माननीय मंत्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 36849 ....

डॉ.रणजित पाटील.....

महोदय श्री. शिवाजीराव माधे साहेबांनी सुध्दा या कामाची शिफारस केली होती असे दुसरे कारण देण्यात आले होते. तसेच तिसऱ्या मुद्यामध्ये सदर कामाचा ठेकेदार कुशाग्र बुध्दीचा त्याने सदर काम वेळेत कसे दिले याची माहिती दिली होती.

डॉ.रणजित पाटील.....

त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या वाढीव कामाबद्दल जी तक्रार करण्यात आली त्या तक्रारीबद्दल तपासणीही झाली परंतु यासंदर्भातील अहवाल सादर करणारे आणि काम करणारे अधिकारी एकच असतील तर आपण त्रयस्त यंत्रणेमार्फत या कामाची चौकशी करणार आहात काय, तक्रार प्राप्तीनंतर कंत्राटदाराला विदर्भ पाटबंधारे विभागाने किती निधी अर्जित केला, वाढीव कामाची फेर निविदा न काढता ज्या अधिकाऱ्याने वाढीव काम दिलेले आहे त्या संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापी महोदय, सन 2006 मध्ये ही घटना घडली होती. सदर घटना घडल्यानंतर जल क्षोभनाशक कुंडाचे नुकसान झाले होते व त्यामुळे सन 2009 मध्ये 80 पॅनलची दुरुस्ती करण्यात आली होती. सदर जलक्षोभनाशक कुंडाची दुरुस्ती करीत असतांना बाजूला ट्रायल पिट्स घेण्यात आले होते त्यावेळेस त्या भागाचेही नुकसान झाल्याचे आढळून आले होते. त्यामुळे नुकसान झालेल्या भागाचीही त्यावेळेस नुकसान भरपाई करण्यात आली. मध्यंतरीच्या काळात श्री. टेंभे यांनी या कामाच्या संदर्भात तक्रार केली होती. या तक्रारीच्या संदर्भात व्हीआयडीसीचे ईडी यांनी मुख्य अभियंता, अमरावती यांच्याकडे चौकशी करण्याचे काम दिले असून या चौकशीचा जो काही निकाल येईल त्यानुसार कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, सदर कामाची निविदा न काढता सदर काम त्याच ठेकेदाराला देण्यात आले असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. परंतु विभागाचे जे काही प्रचलित नियम आहेत त्या नियमानुसारच नवीन कामाची सुरुवात करण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 36849 ....

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,अरुणावती प्रकल्प हा विदर्भातील मोठा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे पाणी अडविण्याचे काम जवळ जवळ 20 वर्षापूर्वी झाले होते. परंतु या ठिकाणी अद्यापपर्यंत 25 टक्के इरिगेशन क्षमता निर्माण झालेली नाही. या ठिकाणच्या कॅनॉलची दुरुस्ती दर वर्षी केली जाते तसेच कॅनॉल बरोबर नसल्यामुळे पुढे पाणी जात नाही. त्यामुळे टेलपर्यंत पाणी नेण्याच्या संदर्भात राज्य शासनाकडून तत्काळ उपाययोजना करणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याकरिता आवश्यक असलेला निधी शासनाने देणे गरजेचे आहे. या कामावर सततचा अतिरिक्त खर्च करण्यात आलेला आहे. दरवर्षी कॅनॉल दुरूस्तीचे काम करण्यात येत आहे. त्यासाठी निधी आणायचा, तो विड्रॉ करायचा अशा प्रकारच्या अनेक तक्रारी वर्षानुवर्षा पासून होत आहेत. येथे जो विषय उपस्थित करण्यात आला आहे त्यासंबंधी एक स्वतंत्र वरिष्ठ अधिकारी नेमून त्यांच्या मार्फत काल मर्यादेत चौकशी करणे आवश्यक आहे. त्यांच्या चौकशीचा अहवाल राज्य शासनाकडे आला तर निश्चितपणे त्यात कोणी गैरव्यवहाराच्या कृती, अनियमितता केली आहे यासंबंधातील माहिती सदनाला मिळू शकेल. तेव्हा या प्रकरणाच्या संबंधातील चौकशी कोणत्या स्तरावरील अधिकाऱ्या मार्फत करण्यात येणार आहे, तो अधिकारी सदर चौकशी किती दिवसात पूर्ण करणार आहे, याबाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदय करतील काय ?

श्री.सुनील तटकरे : सन 1980 मध्ये अमरावती जिल्ह्यातील दिग्रस येथे अरूणावती नदीवर प्रकल्प सुरू करण्यात आला. सन 1994 मध्ये घळ भरणी पूर्ण करण्यात आली. डिसेंबर 1978 या कामाची मूळ प्रशासकीय मान्यता रूपये 19 कोटी 13 लाख होती. त्यानंतर प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या. प्रकल्पावर जानेवारी 2013 अखेर रूपये 295 कोटी 25 लाख इतका निधी खर्च झालेला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस आणि आर्णी या तालुक्यात 24 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असून 1995-96 पासून प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या धरणाचे 100 टक्के काम पूर्ण झाले आहे. कालव्याची, वितरण प्रणालीची 100 टक्के कामे पूर्ण झाली आहेत. भाग-1 ची कामे 80 टक्के पूर्ण झालेली आहेत. या कामासाठी देखील आम्ही गेल्या वर्षी 10 कोटी रूपयांचा नियतव्यय उपलब्ध करून दिलेला आहे. काही गावांचे पुनर्वसन करावयाचे होते. त्यासाठी भूसंपादन करावयाचे होते. ते देखील पूर्णपणे झालेले आहे.

माननीय राज्यमंत्र्यांनी सन्माननीय सदस्य डॉ.रणजीत पाटील, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, सन 2006 नंतर या कामामध्ये त्रुटी निर्माण झाल्या आहेत. त्यावेळी 80 पॅनलची दुरूस्ती करण्याचे ठरविण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

आले होते. प्रत्यक्षात हे काम सुरू करण्यात आले त्यावेळी असे लक्षात आले की, अधिक पॅनल नादुरूस्त झालेले आहेत. त्यावेळी हे देखील काम पूर्ण करून घेण्याची गरज होती. हे जे सहायक मुख्य अभियंता आहेत ते मुख्य अभियंता नाहीत. त्यांनी त्या संबंधात तक्रार केलेली आहे. याबाबत मुख्य अभियंता यांच्याकडून सखोल अहवाल मागविला आहे. तो अहवाल नुकताच कार्यकारी संचालक यांच्याकडे प्राप्त झालेला आहे. त्यांच्या स्तरावर या अहवालाची छाननी सुरू आहे. या संबंधातील अहवाल येत्या महिन्याभरात प्राप्त होणार आहे. मग प्राप्त झालेला अहवाल आणि त्यांनी केलेली तक्रार यामध्ये त्रुटी आहेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर त्याचा सुद्धा शासन पातळीवर योग्य तो विचार केला जाईल आणि आवश्यकता वाटल्यास श्री.टेंभे यांच्या तक्रारीत काही तथ्यांश आढळून आले तर निश्चितपणे त्यावेळच्या निर्णया नुसार कारवाई केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यांच्या पाठीमागे अभियंतेच लागले आहेत हे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे, हे बरे झाले. भ्रष्टाचार अभियंतेच करीत आहेत. येथे पण कोणी तरी पांढरे निघाला. आपल्याला दिनांक 11.9.2012 रोजी गैरव्यवहारा संबंधातील निवेदन देण्यात आले होते काय असा प्रश्न विचारलेला असता त्याच आपण होय, निवेदन देण्यात आलेले आहे असे उत्तर दिलेले आहे. पण निवेदन कसले आलेले आहे हे आपण सांगितलेले नाही. गैरव्यवहारासंबंधातील निवेदन दिनांक 11.9.2012 रोजी आलेले आहे. हा प्रकल्प 2006 रोजीचा आहे. आपल्या प्रशासनाने लेखी असे कळविले आहे की, आम्ही निविदा न काढता 8 कोटी रूपयाचे काम ठेकेदाराला दिलेले आहे. या कामासाठी माननीय मंत्री श्री.मोघे साहेबांनी शिफारस केली होती असे लेखी कळविले आहे. कुठल्याही माननीय मंत्र्यांनी शिफारस केल्यानंतर टेंडर प्रक्रिया बाजूला ठेवून ठेकेदारांना काम देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे काय, नसल्यास, संबंधित मंत्र्यांसंबंधी शासनाचे नेमके कोणते धोरण काय आहे ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 36849....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी दिशाभूल होत आहे. कोणीही लेखी निवेदन दिलेले नाही. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी प्रश्न विचारताना त्यांच्याकडे माहिती आहे असे त्यांनी सांगितले. दिनांक 11.9.2012 रोजी श्री.टेंभे, सहाय्यक मुख्य अभियंता....

डॉ.रणजित पाटील : श्री.टेंभे यांनी माझ्याकडे पत्र दिलेले आहे.

श्री.सुनील तटकरे : आपण ते पत्र माझ्याकडे द्यावे, आम्ही त्याची तपासणी करु.

सभापती : आपण ते पत्र माझ्याकडे पाठवून द्यावे. मी ते माननीय मंत्री महोदयांना देईन.

श्री.दिवाकर रावते : अभियंत्यांनी लेखी निवेदन दिलेले आहे आणि मंत्री महोदयांनी निविदा न काढता आठ कोटी रुपयांचे काम दिले असेल तर सरकारचे या संदर्भातील नक्की धोरण काय आहे, कोणत्याही मंत्री महोदयांनी शिफारस केल्यानंतर निविदा न काढता काम देण्यात येणार काय, तसे नसेल तर आपल्या प्रक्रियेमध्ये जी अव्यवस्था झालेली आहे त्याबाबत मंत्र्यांवर रोष ठेवणार काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, कोणत्याही कामाची निविदा काढल्याशिवाय काम देता येत नाही. आता आपण ई-टेंडरींगद्वारे काम देतो. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांच्याकडे जी माहिती आहे त्यांनी ती आपल्यामार्फत माझ्याकडे द्यावी. त्याबाबत संपूर्ण माहिती घेण्यात येईल. दिनांक 11.9.2012 रोजी श्री.टेंभे, सहाय्यक मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी कार्यकारी संचालकांना दिलेले पत्र माझ्याकडे आहे. आपण परवानगी देत असाल तर त्या पत्रातील मसुदा मी वाचून दाखवितो. त्या अनुषंगाने जी काही कार्यवाही केलेली आहे....

सभापती : आपण ते पत्र सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, या महत्वाच्या प्रश्नावर गांभीर्याने चर्चा होत आहे. यामध्ये दोनच महत्वाचे प्रश्न आहेत असे मला वाटते. दिनांक 30 मार्च 2012 रोजी सन्माननीय सदस्य श्री.रणजित पाटील यांनी याच विषयावरील लक्षवेधी सूचना विचारली होती. त्यावेळी देखील मंत्री महोदयांकडून आता या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे तसेच उत्तर दिले हाते. आपल्याकडे अहवाल आला आहे, मुख्य अभियंता चौकशी करणार आहे आणि त्यामध्ये काही तफावत आढळून आल्यास संबंधितांची चौकशी करण्यात येईल अशी उत्तरे एक वर्षानंतर देखील मिळत आहेत.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 36849....

ॲड.आशिष शेलार....

सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी आपल्याकडे लेखी रिपोर्ट दिलेला आहे. आपण तो रिपोर्ट मंत्री महोदयांना वाचायला द्यावा. सहाय्यक अभियंता यांनी माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांचे नाव घेऊन पत्राचा क्रमांक आणि पत्राचा नंबर सुध्दा दिलेला आहे. यावरुन असे दिसते की, बाजूला असलेले ट्रायपेड प्लीक्सचे नुकसान झालेले आहे. एखादे काम करताना आजूबाजूच्या गोष्टींचे नुकसान झाल्यास त्याच ठेकेदाराला काम दिले पाहिजे अशी अट निविदेमध्ये घालण्यात आली होती काय, नसेल तर माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांनी दिलेल्या पत्रामुळे ते काम दिले असेल तर त्या ठेकेदारावर काय कारवाई करणार आहात ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी वारंवार या ठिकाणी सांगितले की, श्री.टेंभे यांच्यावर दोषारोप पत्र बजावल्यानंतर त्यांनी या कामाच्या संदर्भात तक्रार केली. अरुणावती प्रकल्प केव्हा सुरु झाला, त्याचे काम केव्हा पूर्ण झाले याची माहिती मी दिलेली आहे. 80 पॅनेल्सची दुरुस्ती करताना असे लक्षात आले की उर्वरित पॅनेल्सची सुध्दा दुरुस्ती करणे आवश्यक आहे. हे काम पावसाळा सुरु होण्यापूर्वी पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे आणि कोणतेही डॅमेज न करता काम पूर्ण करावयाचे असल्यामुळे सन 2009 मध्ये ज्या ठेकेदाराने हे काम समाधानकारकपणे पूर्ण केले त्याच्याकडून हे काम करुन घेतलेले आहे. एकंदरीत 136 पॅनेल्सचे काम देण्यात येऊन ते काम पूर्ण करुन घेण्यात आलेले आहे. तरी सुध्दा या ठिकाणी जी काही तक्रार...

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

सभापती : सन्माननीय सदस्यांचा अचूक उत्तर मिळविण्याचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने येथे अनेक उप प्रश्न विचारण्यात आले. माननीय मंत्री महोदयांना सुध्दा या अनुषंगाने ज्या तीन-चार पध्दती वापरलेल्या आहेत,

यानंतर श्री.बोर्डे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.36849....

सभापती....

त्या बाबत माननीय मंत्र्यांचा त्यांच्याकडे असलेली माहिती या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न आहे. मी हा प्रश्न राखून न ठेवता, या प्रश्नाबाबत माझ्या दालनात सन्माननीय मंत्री व ज्यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या सन्माननीय सदस्यांना आणि ज्यांनी उपप्रश्न विचारले आहेत त्यांना बोलावून घेतो आणि चर्चा करतो. आता मी पुढील तारांकित प्रश्न क्रमांक 36863 पुकारतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलतात.)

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी एखादा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केल्यानंतर त्याबाबत उचित उत्तरे मिळावीत अशी त्यांची अपेक्षा असते. माननीय मंत्री त्यांच्याकडे असलेल्या माहितीवरुन सभागृहात उत्तर देत होते. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांचे आणि आपले देखील समाधान होत नव्हते. म्हणून मी चार-पाच उपप्रश्न विचारण्यास परवानगी दिली. तरी सुध्दा आपले समाधान झाले नाही. म्हणून मी अगोदर संगितल्याप्रमाणे सर्व संबंधितांना माझ्या दालनात बोलावून चर्चा करण्याचा निर्णय घेतला. या प्रश्नाची तड कशी लावता येईल या दृष्टीने मी प्रयत्न करतो. मी स्वत: पाटबंधारे मंत्री म्हणून काम बघितले आहे. त्यामुळे आपण म्हणता तसा एखादा फ्लो राहिला असेल तर तो पीक-अप करु या.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलतच असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्याकडे जी कागदपत्रे पाठविलेली आहेत त्यामध्ये कार्यकारी अभियंत्यांनी काही कारणे दिली आहेत. त्यात त्यांनी माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांच्या पत्राचे एक कारण दिले आहे. यावरुन यामध्ये नेमके काय घडले आहे हे स्पष्ट होते. महोदय, यावरुन स्पष्ट होते की, सरकार भ्रष्टाचाराला पाठीशी घालत आहे. सभापती महोदय, आपण असे होऊ देता कामा नये. माझी विनंती आहे की, आपण या बाबत निदेश द्यावेत. महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेला कळू द्यावे की, मंत्र्यांच्या सांगण्यावरुन विना टेंडर होणारे काम माननीय सभापतींनी थांबविले. माननीय सभापतींनी भ्रष्टाचार होऊ दिला नाही हा संदेश जनतेसमोर गेला पाहिजे. म्हणून आम्ही या ठिकाणी पोटतिडिकीने बोलत आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपल्या अपेक्षेप्रमाणे सभापतींना निर्णयाप्रत पोहोचावयाचे असेल तर त्या संदर्भात मला या विषयाची संपूर्ण माहिती समोर ठेवावी लागेल. शिवाय या प्रश्नाच्या चर्चेच्या निमित्ताने आपण मांडलेले मुद्दे माझ्या समोर असावयास पाहिजेत. एखाद्या सदस्यांना, एखाद्या सन्माननीय मंत्र्याना किंवा अन्य कोणाला एखादी सूचना द्यावयची असेल तर त्यामुळे त्या बाबीमध्ये काही हस्तक्षेप होतो काय हे सुध्दा मला बघितले पाहिजे. या सर्व बाबी तपासल्यानंतरच मला माझा निर्णय सभागृहामध्ये देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मी निश्चतपणे निर्णय देण्याचा प्रयत्न करीन. म्हणूनच त्यासाठी मला सर्व संबंधितांची बैठक घेणे आवश्यक आहे.

आता मी तारांकित प्रश्न क्रमांक 36863 पुकारतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलतच असतात.)

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सांगली-मिरजेच्या वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयातील गरीब रुग्णांचे जेवण बंद केल्याबाबत

(३) * ३६८६३ श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली-मिरजेच्या वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयातील गरीब रुग्णांचे माहे डिसेंबर, २०१२ पासून जेवण बंद करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरीब रुग्णांचे जेवण बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सांगली-मिरजेच्या या रुग्णालयात किती गरीब रुग्ण दररोज जेवण घेत होते,
(४) असल्यास, सदर रुग्णालयात गरीब रुग्णांना जेवण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) सध्या सरासरी दररोज ५० ते ६० गरजू आंतररुग्णांना आहाराचा पुरवठा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलतच असतात.)

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : मी आता पुढचा प्रश्न पुकारतो. प्रश्न क्रमांक 36962.....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी माझा प्रश्न पुकारलेला आहे.

तारांकित प्रश्न क्रमांक 36962

(प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धारगाव सर्कल (ता.कवठेमहाकाळ, जि.सांगली) या परिसरातील १६ गावांना टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी देण्याबाबत

(५) * ३८२९३ श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५८०४ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात. : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारगाव सर्कल (ता.कवठेमहाकाळ, जि.सांगली) या परिसरातील १६ गावांचा टेंभू उपसा जलसिंचन योजनांमध्ये समावेश करुन त्या गावांना पाणी देण्याचे शासनाने सन २००९ मध्ये मान्य करुनही अद्याप पाणी देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांना टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी देणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

##श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : (१) व (२) या संदर्भात दि. ०७-०७-२००९ रोजी मा.मंत्री, जलसंपदा (कृखोपाम.) यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीच्या कार्यवृत्तानुसार ढालगांव परिसरातील ८ गावांचा सामावेश टेंभू प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात नसून त्याकरिता आवश्यक असणारे अतिरिक्त पाणी टेंभू प्रकल्पाच्या मंजूर जल नियोजनानुसार उपलब्ध नसल्याने, कृष्णा भिमा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे भविष्यात उपलब्ध होणाऱ्या पाण्यातून याचा विचार करावा असा निर्णय झाला.

व्दितीय कृष्णा पाणी तंटा लवादाच्या डिसेंबर २०१० मधील निवाडयानुसार महाराष्ट्राला अनुज्ञेय केलेल्या पाणी वापरात कृष्णा भिमा स्थिरीकरण प्रकल्पाचा सामावेश नाही. लवादाने पुढील अहवाल अद्याप दिलेला नसून लवादाचा निर्णय केंद्र शासनाच्या राजपत्रात अधिसुचित झालेला नाही.

लवादाचा निर्णय केंद्र शासनाच्या राजपत्रात अधिसूचित झाल्यानंतर त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, कायम दुष्काळी अशा कवठेमहांकाळ तालुक्यातील ढालगाव सर्कलमधील 16 गावांचा समावेश टेंभू योजनेमध्ये करण्यात येईल आणि त्या टेंभू योजनेतून या 16 गावांना पाणी देण्यात येईल असे आश्वासन शासनातर्फे मंत्री महोदयांनी 2009 मध्ये दिलेले आहे. परंतु 2009 पासून आतापर्यंत त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. साधा सर्व्हे सुध्दा झालेला नाही. आज सुध्दा त्या 16 गावांपैकी जवळजवळ 11 गावांमध्ये पाण्याचे टँकर जात आहेत. आम्ही पिढ्या न पिढ्या दुष्काळाला सामोरे जात आहोत आणि अशा प्रकारचे आश्वासन देऊन सुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. या 16 गावांचा समावेश करण्याचे जे आश्वासन मंत्री महोदयांनी दिलेले आहे त्याची अंमलबजावणी किती दिवसात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38293 ..... श्री. रमेश शेंडगे....

करणार ? त्याचा सर्व्हे करण्याच्या कामाला किती दिवसात सुरुवात करणार, त्यासाठी निधीची उपलब्धता कधी करणार आणि कामाची सुरुवात कधी करणार ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, या संदर्भात सन्माननीय श्री. आर. आर. पाटील साहेब, श्री. रमेश शेंडगे साहेब यांच्या बरोबर बैठक झाली होती, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सर्व्हेचे आदेश लगेच दिले जातील. यामध्ये खरी अडचण अशी आहे की, टेंभूच्या मूळ 22 टीएमसी पाण्यात ढालगावची जी मागणी आहे त्यासाठी 0.70 टीएमसी पाणी लागणार आहे आणि त्याची तरतूद नसल्यामुळे लवादाचे निर्णय जेव्हा अंतिम होतील आणि जे 10 ते 12 टीएमसी अतिरिक्त पाणी कृष्णा स्थिरीकरणासाठी मिळण्याची शक्यता आहे त्यातून याची तरतूद करुन निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, प्रत्येक वर्षी कृष्णा नदीचे शेकडो टीएमसी पाणी पुरातून वाहून जाते. आपल्याला 0.70 टीएमसी पाणी पाहिजे. माझी अशी विनंती आहे की, पाण्याची उपलब्धता नाही हे कारण न देता कोयनेच्या धरणाकडे जो रेनफॉल होतो त्याचा जर सर्व्हे केला तर पाण्याची उपलब्धता आहे हे आपल्या लक्षात येईल. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, पाण्याची उपलब्धता आहे आणि पुरातून वाहून जाणारे पाणी वाचवून कायम दुष्काळी भागातील पाण्यावाचून तडफडणाऱ्या जनतेला न्याय देणार का आणि हे काम त्वरित सुरु करणार का ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, मी या संदर्भात उत्तर दिलेले आहे. कोयनेच्या, कृष्णा खोऱ्याच्या सर्व पाण्याचे वाटप झाले असल्यामुळे ढालगाव प्रकल्पाला पाण्याची उपलब्धता नाही. ते पाणी स्थिरीकरणातूनच द्यावे लागणार आहे. परंतु या संदर्भात आग्रही मागणी असल्यामुळे दरम्यानच्या काळात या बाबतीत सर्व्हे करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

सभापती : सभागृहाचे कामकाज मी 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.43 ते दुपारी 11.58 पर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मघाशी ज्या विषयामुळे सभागृहाचे कामकाज तहकूब झाले होते. त्यासंबंधी मी खुलासा करु इच्छितो. सन्माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांनी जलसंपदा विभागाला दिलेल्या एका पत्राचा सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी उल्लेख केला होता. सभागृहाच्या माहितीसाठी मी ते पत्र वाचून दाखवित आहे. दिनांक 22.7.2011 रोजी त्यांनी हे पत्र लिहिलेले आहे. त्या पत्रात असे नमूद केले आहे की, "अरुणावती प्रकल्पाचे लाभक्षेत्र माझ्या आर्णी विधानसभा मतदार संघात येते. अरुणावती धरणाच्या खाली दिग्रस आणि आर्णी तालुक्यातील बरीच मोठी गावे नदीच्या काठी असून, अरुणावती नदी ही आर्णी गावातून वाहते. धरणाच्या खालील क्षेत्रात मोठा पाऊस झाल्यास गावाला पुराचा धोका पोहचतो, असा वर्षानुवर्षाचा अनुभव आहे. याबाबत योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. पूर परिस्थितीच्या वेळी अरुणावती धरणात वरील क्षेत्रातील पुराचे पाणी काही काळासाठी तुंबून ठेवले जाते. त्यामुळे पुराचा धोका शहरास काही प्रमाणात नक्कीच कमी होतो"...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांचा खुलासा आपण ऐकून घेत असाल तर माझा प्रश्न देखील उपस्थित करण्यासाठी आपण मला परवानगी द्यावी.

सभापती : सन्माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांनी जलसंपदा विभागाला जे विशिष्ट पत्र दिले होते त्याबाबत सन्माननीय सदस्यांकडून आक्षेप घेण्यात आलेला आहे. ते पत्र मंत्री महोदयांना वाचून दाखविण्याची मी परवानगी दिलेली आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या पत्रात असेही नमूद केले आहे की, " माझ्या असे निदर्शनास आले आहे की, अरुणावती धरणाच्या सांडव्याला व सांडव्याच्या खाली पाण्याच्या टाक्यांना फार मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे. काही भागाची दुरुस्ती झाली आहे. तथापि, संपूर्ण दुरुस्तीची आवश्यकता आहे. अन्यथा धरणास धोका होऊन फार मोठ्या प्रमाणात नदी काठच्या खेड्यांना व आर्णी शहराला पुराचा धोका संभवतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यामध्ये मोठया प्रमाणात जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता राहील. याची वेळीच दखल घेण्याबाबत स्थानिक नागरिकांनी सातत्याने ही बाब माझ्या निदर्शनास आणली आहे. तरी योग्य उपाययोजना तातडीने करावी.

आपला स्नेहांकित"

अशा प्रकारचे पत्र जलसंपदा विभागाच्या सचिवाना लिहिलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांच्या पत्राचा वापर करुन 8 कोटीची कामे निविदा न काढता दिली गेली आहेत. यामध्ये कोण दोषी आहे ?

सभापती : मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांनी लिहिलेल्या पत्रासंबंधी या ठिकाणी चर्चा सुरु होती. त्यामुळे त्यांनी दिलेले पत्र या ठिकाणी वाचून दाखविण्यात आलेले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सन्माननीय पाटबंधारे मंत्र्यांनी, मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांचे पत्र वाचण्याची परवानगी माझ्याकडे मागितली होती आणि ती परवानगी मी त्यांना दिली. तेव्हा टेंडर न काढता कामे दिली गेली यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : या ठिकाणी मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे यांनी मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांचे पत्र वाचून दाखविले. हा प्रकल्प त्यांच्या मतदारसंघातील असल्यामुळे तो लवकर करण्यासाठी त्यांनी पत्र दिले. त्या पत्राचा आधार घेऊन 8 कोटी रु.ची कामे टेंडर न काढता दिली गेली आहेत. विनाटेंडर ही कामे का दिली गेली ?

श्री. सुनील तटकरे : ती कामे पावसाळयापूर्वी पूर्ण करावयाची होती...

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर आपणास मान्य की अमान्य हा भाग वेगळा. परंतु उत्तर देण्याचा मंत्री महोदयांचा अधिकार आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : जलसंपदा विभागाच्या चुकीच्या नियोजनामुळे राज्यात दुष्काळ पडला हा आक्षेप आहे...

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : 80 पॅनलच्या दुरुस्तीची कामे निविदा काढून दिली होती. ही दुरुस्तीची कामे सुरु झाली त्यावेळी आणखी 36 पॅनलच्या दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे लक्षात आले. पावसाळा जवळ आल्यामुळे आणि ठेकेदाराने कामे योग्य रीतीने केलेली असल्यामुळे त्या कामांना जोडून ही कामे देण्यात आली आहेत हे मी नाकारत नाही. सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, गेल्यावर्षी मार्च महिन्यामध्ये विचारलेल्या लक्षवेधी सूचनेला दिलेले उत्तर आणि आता प्रश्नाला दिलेले उत्तर एकच आहे. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, सहायक अभियंत्याला 11 सप्टेंबर 2012ला पत्र दिलेले आहे. त्यामुळे उत्तर एकच असणे संभवनीय नाही. कामाची तातडी होती, पावसाळा जवळ आला होता आणि ठेकेदाराला याआधी निविदा काढून कामे देण्यात आली होती. 80 आणि त्यानंतर 36 पॅनलच्या दुरुस्तीची कामे दिलेली आहेत ही वस्तुस्थिती आहे. या बाबतीत पूर्ण चौकशी करण्यात येईल. चौकशीमध्ये अनियमितता आढळली तर संबंधितावर कारवाई केली जाईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मला एक मुद्दा उपस्थित करावयाचा आहे...

सभापती : आज सभागृहात दुष्काळावर चर्चा होणार आहे, त्यामुळे अन्य विषयाची चर्चा उपस्थित करता येणार नाही. त्यामुळे कृपया सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी खाली बसावे.

श्री.विनायक मेटे : मी एका मिनिटात माझा मुद्दा संपविणार आहे..

सभापती : मी आपणास मुद्दा उपस्थित करण्यासाठी परवानगी देऊ शकत नाही. मी "नाही" असे आदेश दिल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी खाली बसावयाचे असते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व निनियमन)(सुधारणा) विधेयक.

मु.शी. :

L.C. BILL NO. I OF 2013

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA SELF-FINANCED SCHOOLS (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2012.)

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 1 महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, 2012 यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 1 मांडते.

सभापती :विधेयक मांडण्यात आले आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सन 2013 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 1 संबंधी</u>

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने मला माननीय मंत्री महोदयांकडून एका गोष्टीचा खुलासा हवा आहे.

सभापती : ज्यावेळी या विधेयकावर खंडश: चर्चा होईल, त्यावेळी आपण माननीय मंत्री महोदयांकडून खुलासा घेऊ शकता.

श्री.विनायक राऊत : ठीक आहे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेषाधिकारभंगाच्या सूचनेबाबत

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या विरोधात विशेषाधिकारभंगाची सूचना दिलेली आहे.

सभापती : आपण आज काहीही बोललात तरी तुमचे बोलणे मी रेकॉर्डवर घेणार नाही. मी आपणास सांगितले आहे की, या बाबतीत उद्या आपले विचार ऐकून घेऊन त्या बाबतीत निश्चितपणे निर्णय देईन.

माझ्या कार्यालयात आज सकाळी 10.35 वाजता सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उपमुख्य मंत्री, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, तसेच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते....

(सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप बसून आपसात बोलतात.)

सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, ही पध्दत योग्य आहे असे मी मानणाऱ्यांपैकी नाही.(अडथळा) सभागृहात तुम्ही गप्पा माराव्यात आणि मी सभागृहाचे कामकाज चालवावे ही कुठली पध्दत आहे.

श्री.विनायक मेटे : महोदय, माझ्यावर हा आरोप आहे.

सभापती : आरोप नाही, वस्तुस्थिती आहे.

श्री.विनायक मेटे : सन्माननीय सदस्य बसून माझ्यावर कॉमेटस् करतात ही कोणती पध्दत आहे?

सभापती : ती अव्यवहारी पध्दत आहे.

श्री.विनायक मेटे : सन्माननीय सदस्य हे शिवराळ भाषा वापरतात, अशा वेळी आम्ही गप्प बसावयाचे काय ? सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी अशा प्रकारची भाषा वापरली आहे.

सभापती : अशा गोष्टी तुम्ही माझ्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

मी सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, सभागृहाचे कामकाज चालविण्याकरिता सर्व सन्माननीय सदस्यांचे सहकार्य असणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे या विषयाच्या संदर्भात मला माझ्या दालनात येऊन भेटले होते. त्यावेळी तुमचा विषय मी आज सभागृहात मांडू देणार नाही. या विषयाच्या बाबतीत उद्या माझ्या दालनात त्यांनी यावे आणि सदर विषयाच्या बाबतीत काय करता येणे शक्य आहे ते आपण करु असे मी त्यांना सांगितले होते. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्या मनात जो विषय आला आहे आणि तो जरी एका सेकंदात सभागृहात मांडावयाचा असेल तर सदनाचे जे संकेत आहेत, त्यात ते बसत नाही असे माझे मत आहे.

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सभागृहात एखाद्या गोष्टीबद्दल माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांची मार्गदर्शन करण्याची इच्छा असेल तर त्यांनी सभागृहाची अनुमती घ्यावी आणि त्यानंतर मार्गदर्शनाला सुरुवात करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदनामध्ये माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी मुद्दा मांडण्याचा प्रयत्न करीत असताना माननीय मुख्यमंत्री यांच्याविरुध्द हक्कभंगाची सूचना दाखल केली असल्याचा उल्लेख त्यांनी केल्याचे आम्ही ऐकले आहे. कदाचित ते वक्तव्य रेकॉर्डवर आलेले नसावे. माननीय मुख्यमंत्र्यांविरुध्द आम्ही हक्कभंगाची सूचना दिलेली आहे असे ते म्हणाले. राज्यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आघाडी सरकार सत्तेवर आहे. सत्ताधारी पक्षातील सदस्यांची काही वेगळी भावना झाली असेल तर ती बाब माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्यापुढे मांडण्यात येते. माननीय मुख्यमंत्र्यांविरुध्द दाखल केलेल्या हक्कभंगाच्या सूचनेचा विषय सदनामध्ये उपस्थित करावयाचा असेल तर त्या विषयाबाबत प्रथम आमच्या स्तरावर चर्चा झाली पाहिजे. अशी चर्चा न करता सदनामध्ये विषय का उपस्थित केला जात आहे या संदर्भात माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांच्याकडे विचारणा करण्यात काही गैर होते असे मला वाटत नाही. अशा प्रकारची विचारणा केल्यानंतर माझ्या विरोधात कॉमेंट्स केल्या जातात असे माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी वक्तव्य करणे हे निरर्थक आहे, चुकीचे आहे एवढेच मला म्हणायचे आहे.

सभापती : हा विषय संपुष्टात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: दुष्काळाच्या विषयावर सदनामध्ये चर्चा घेण्यासंबंधी बोलावलेल्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयाबाबत

सभापती : आज सकाळी मी माझ्या दालनामध्ये सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उप मुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाचे गटनेते यांची एकत्रित बैठक एका अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत बोलावली होती. दुष्काळाच्या विषयावर तातडीने आणि गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे असा बैठकीचा विषय होता. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचा हा जीवाभावाचा विषय आहे. राज्यातील सर्वसामान्य समाजातील लोकांचे जीवन पुन्हा एकदा संकटातून वाचविण्याकरिता आपण जे प्रयत्न करीत आहोत त्या अनुषंगाने या विषयाला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. या संदर्भात बैठकीमध्ये साधकबाधक चर्चा झाली. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये सत्तारुढ पक्षाचा याच विषयावरील नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव चर्चेला दर्शविण्यात आला आहे. तसेच विरोधी पक्षाकडून नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना देण्यात आली असून त्या सूचनेचा विषय हा देखील दुष्काळासंबंधीचा आहे. सभागृहाचे संपूर्ण कामकाज तहकूब करुन दुष्काळाच्या विषयाला प्राधान्य देऊन सदनामध्ये चर्चा घेण्यात यावी अशी विरोधी पक्षाची भावना आहे.

बैठकीमध्ये झालेल्या चर्चेअंती माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व गटनेते या सर्वांच्या विचाराने असे ठरले की, या वर्षीचा दुष्काळ अत्यंत भयावह आहे. म्हणून या दुष्काळाच्या विषयाला सर्वोच्च प्राधान्य देऊन त्याबाबत तातडीने सदनामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. आज नियम 260 अन्वयेचा सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव आणि नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना हे दोन्ही विषय सभागृहामध्ये चर्चेला येण्याची शक्यता होती. हे दोन्ही विषय एकत्रित करावेत आणि दुष्काळी परिस्थितीबाबत ही चर्चा असल्यामुळे चर्चेची सुरुवात अपवाद म्हणून.....

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

विरोधी पक्ष नेत्यांनी करावी तसेच त्या नंतर दुसरे वक्ते हे सत्तारुढ पक्षाचे असतील असे सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांशी चर्चा केल्यानंतर ठरले आहे. दोन्ही बाजूने दिलेला विषय एकत्रित करुन दुष्काळावरील चर्चेला आता सरुवात करण्यात येईल. आज सहा वाजेपर्यंत ही चर्चा सुरु राहणार असून उद्या उत्तरासह ही चर्चा पूर्ण करावी असा आपण निर्णय घेतलेला आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपल्याला विनंती आहे की, 1972 चा दुष्काळ भयानक होताच परंतु त्या दुष्काळापेक्षाही या वर्षीचा दुष्काळ अतिशय भयानक आहे हे आपण सर्वांनी मान्य केलेले आहे. 1972 च्या दुष्काळाच्या वेळेस विरोधी पक्षाकडून त्यावेळच्या सरकारवर अविश्वासाचा प्रस्ताव आणला गेला होता. आज होणाऱ्या दुष्काळाच्या चर्चेवर वेळेचे बंधन ठेवू नये अशी माझी आपल्याला विनंती आहे. आजची दुष्काळाची चर्चा दोन दिवस करण्यात यावी अशी विनंती आहे.

सभापती : आजच्या दुष्काळाच्या चर्चेला दोन दिवस देण्यात आलेले आहेत. या चर्चेच्या संदर्भात सभागृहातील दोन्ही बाजूचे एकमत झालेले आहे. त्यामुळे दुष्काळाच्या चर्चेला आता सुरुवात करण्यात येणार असून ही चर्चा सलग दोन दिवस चालणार असून उद्या उत्तरासह पूर्ण केली जाणार आहे. आता आपण जो प्रस्ताव घेत आहोत तो नियम 97 खाली घेतला तर ती अल्पकालीन चर्चा होईल व नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चेला घेतला तर ही चर्चा व्यापक होईल. त्यामुळे नियम 260 अन्वये या चर्चेला आता सुरुवात करण्यात येत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती

मु.शी.: राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती, या विषयावर सर्वश्री सर्वश्री.विनोद तावडे, दिपकराव साळुंखे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, रामदास कदम, जयंत पाटील, राणा जगजितसिंह पाटील, सुभाष चव्हाण, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, सतिश चव्हाण, एम.एम.शेख, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री.संदिप बाजोरिया, जयप्रकाश छाजेड, रामनाथ मोते, विनायक मेटे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंवतराव जाधव, किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.कपिल पाटील वि.प.स. यांचा२६० अन्वये प्रस्ताव.

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात राज्यात भीषण वातावरण आहे. सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन आज आपण दुष्काळाची चर्चा करीत आहोत. दुष्काळाच्या संदर्भात या अधिवेशनात चर्चा व्हावी अशी राज्यातील जनतेची अपेक्षा असून चर्चा झाल्यानंतर जनतेला काही तरी ठोस मिळावे व त्या निर्णयाची ठोस अंमलबजावणी व्हावी अशी राज्यातील जनतेची अपेक्षा आहे.

दुष्काळाच्या संदर्भात आपण गेल्या चार अधिवेशनापासून चर्चा करीत आहोत. परंतु गेल्या तीन अधिवेशनात काय झाले आणि काय केले याची माहिती आपण सर्वांना आहे. त्यामुळे आता तरी दुष्काळाच्या संदर्भात शासनाकडून प्रामाणिक अंमलबजावणी होईल अशी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, आता मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती, राज्यातील १२००० गावे दुष्काळाच्या छायेत असणे, १९७२ च्या दुष्काळापेक्षा यावेळची दुष्काळी परिस्थिती भयानक असणे, ग्लोबल वॉर्मिंगमुळे प्रत्येक दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षी दुष्काळ पडण्याची शक्यता अधिक गडद होत असल्याने दुष्काळ निर्मूलनासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करण्याची आवश्यकता, बँकेकडून व खाजगी सावकाराकडून कर्ज काढून शेतकऱ्यांनी पेरणी करणे, राज्यातील बऱ्याच भागात पावसा अभावी शेतीमालाच्या उत्पादनात झालेली घट, त्यामुळे शेतकरी हवालदिल होणे, राज्यात उद्भवलेली तीव्र पाणी टंचाई, काही भागात १० दिवसातून एकदा पाणी पुरवठा करण्यात येणे, सध्या १२०५ गावातील ३७८९ वाड्यांना सुमारे २००० च्यावर टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

ही संख्या वाढण्याची निर्माण झालेली परिस्थिती, हंडाभर पाण्यासाठी महिला व लहान मुले वणवण भटकत असणे, मात्र मिनरल वॉटर मुबलक प्रमाणात उपलब्ध असणे, केंद्र शासनाची असलेली आरआरआर ही योजना प्रभावीपणे राज्यात राबविण्याची आवश्यकता, पाणी व चाऱ्या अभावी जनावरांचे होत असलेले हाल, शेतकऱ्यांना स्वत:ची जनावरे अत्यल्प किंमतीत बाहेरील राज्यात विकावे लागणे, राज्यात ४२० चारा छावण्या असणे, सर्वाधिक छावण्या अहमदनगर, सोलापूर व सातारा जिल्ह्यात असूनही त्या अपुऱ्या असणे, बीड जिल्ह्यात बीड व आष्टी व्यतिरिक्त गेवराई तालुक्यात त्याचप्रमाणे, जळगाव व नाशिक जिल्ह्यात मागणी असूनही तेथे चारा छावण्या उभारण्यात न येणे, चारा छावण्या उभारण्याच्या निकषात बदल करण्याची आवश्यकता, शेळया व मेंढ्यांसाठी राज्यात एकही चारा छावणी नसणे, वन्यप्राण्यांसाठी जंगलात सिमेंटच्या टाक्या बांधून त्यात टँकरने पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता, दुष्काळग्रस्त भागातील लोकांना रोजगार हमी योजनांची कामे मिळत नसल्यामुळे ते मुंबई, ठाणे व पुणे या भागात स्थलांतरीत होणे, रोजगार हमी योजनांची कामे मोठ्या प्रमाणात सुरु करण्याची त्याचप्रमाणे भविष्यकालीन उपाययोजनांवर भर देण्याची नितांत आवश्यकता, फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र पॅकेज देण्याची होत असलेली मागणी, शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीस स्थगिती देण्याचा व वीज बिलात सवलत देण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, या भीषण दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी त्याचप्रमाणे पाणी टंचाईवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, दुष्काळावर चर्चा सुरू असताना सत्ताधारी बाकावर कोणी काय खाल्ले याची विचारणा केली जात आहे. सत्ताधारी बाकांवर काय चालले आहे हे मला कळतच नाही. बहुधा तेथे खाण्याची चर्चा जास्त असते.

दुष्काळग्रस्त आणि टंचाईग्रस्त भागात आम्ही जाऊन आलो. माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम आपण या भागात किती वेळा गेलात हे आम्हाला माहीत नाही. पण आपले चिरंजीव आपल्यावतीने या भागात गेले. दुष्काळग्रस्त भागात दौरा करत असताना धरणातील कोरड्या पात्रामध्ये मुले क्रिकेट खेळतानाचे चित्र मी पाहिले. येथील लहान मोठ्या नद्यासुद्धा कोरड्या झालेल्या आहेत. गोदावरीच्या पात्रात देखील बाभळी उगवली आहे. एवढा दुष्काळ राज्यात पसरला आहे. आज गावोगावी प्रत्येक घरा समोर बैलगाडीवर पाण्याची टाकी असलेले चित्र पहावयास मिळत आहे. घरासमोर शेतकऱ्याने मोटर सायकल लावावी असे स्वप्न आपण बघतो. पण तेथे आज बैलगाडी व त्यावर पाण्याची टाकी असल्याचे चित्र पहायला मिळते. दुष्काळामुळे गावातील विहिरी कोरड्या पडू लागल्या आहेत. त्यामुळे पाण्यासाठी बायकांची दमछाक होताना दिसत आहे. एवढेच नव्हे तर वाळलेल्या फळबागा देखील दिसत आहेत. मध्येच कुठे तरी पाण्याचा टँकर येताना दिसतो. त्यावेळी चिपकाले सैया फेव्हीकॉल से.... हे गाणे ऐकायला येते.

दुष्काळग्रस्त भागाला दिलासा देऊ असे प्रशासन सांगत आहे. त्यासाठी प्रशासकीय बैठका घेतल्या जात असल्याचे चित्र देखील दिसत आहे. हे सर्व चित्र दुष्काळी भागात फिरत असताना दिसते. ज्यांची पाणी उपसण्याची ताकद अधिक तो अधिक श्रीमंत अशी नवीन व्याख्या दुष्काळी भागात रूढ झालेली आहे. टंचाईची दाहकता दोन प्रकारे पहायला मिळते. एक म्हणजे राजकीय बेमूर्वतखोरपणाची म्हणजचे सत्तेची आणि दुसरी नियोजनाच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती. याबाबत गेल्या दोन-तीन अधिवेशनात चर्चा झालेली आहे. त्यावेळी आश्वासनांची बरसात झाली. पण पूर्तता झालेली नाही. हे प्रत्यक्ष गावा-गावात फिरल्यानंतर, माहिती घेतल्यानंतर समजले. त्यासंबंधात आम्ही माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम यांना पत्र देखील लिहिले आहे. पण त्यास उत्तर आलेले नाही. या अंमलबजाणी न झाल्यामुळे शेतकऱ्यांची आजची जी परिस्थिती आहे त्याचे वर्णन श्री.भरत दौंडकर नावाच्या तरूणाने कवितेच्या रूपात केले आहे. ती कविता एका चॅनलवर सर्वांनी ऐकली असेल. ती कविता मी आपणा सर्वांना पुन्हा एकदा ऐकवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

ओंजळभर पाऊस पडला तर कवळभर पीक काढू
चिखलात अंकुर उगवला तर कुबेरालाही भीक काढू
असे म्हणणारा शेतकरी तरूण आता बनलाय गोफणीतून निसटलेला दगड
असे म्हणणारा शेतकरी तरूण आता बनलाय दुभत्या गाईच्या सडा जवळ तुटून पडलेला आसूड
अर्ध पीक खाणाऱ्या पाखरावर तो कधीच उगवत नाही सूड
तरीही या सरकारी परणीचा डोस त्याच्याच पाठीवर
आणि या शहराच्या गुरांचा भार तो सहन करतो आपल्याच पोटावर
अरे असे जपलेले पीकच आपल्या जीवावर उठले तर त्याने कोणावर उगारावे आसूड आणि
कोणाचा घ्यावा सूड ?
अर्ध पीक जनावरांना चारणारे शेतकऱ्यांच पोर कधीच जात नाही रास्ता रोको करण्यासाठी
त्या पेक्षा माणसांच्या मेंदूवर माजलेली तणकट उपसायची गरज त्यांना जास्त वाटते.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

कारण त्यांच्या कष्टाची इज्जत अशी रस्त्यावर काढणे !
त्यांना मरणाहूनही वाईट वाटतं !
एकवेळेस स्वत:च घर जळताना काहीच वाटणार नाही
पण आता हा घामाचा लिलाव बघवत नाही
दु:खाला वेशीवर टांगता येतं पण वावरातून पेरता येत नाही
गोफण बिंगवायला अजूनही हे हात सळसळतात
पण हळदीच्या अंगाची ताटं फडफडण्याआधीच जळून जातात
आयुष्याचं हे बटुक उपसताना आता
हाताला कापत नाही कवळ्या पिकांचा गळा
अन कित्येक दिवस झाले गच्च भरलेल्या कणसावरुन
फिरला नाही शेतकऱ्याचा विळा
आता वर्षातून कधीतरीच मळ्याच्या मळयामंदी पाटाच पाणी येतं
ते ही कर्जाच्या ढेकळात जिथल्या तिथ जिरुन जातं
वापसा होतो ! पण व्याजाच्या खारवटीत आता काहीच उगवत नाही
मातीवर एखादी हिरवी ओळ कोरण्याइतकी सुध्दा
आता शेतकऱ्याच्या हातात उरली नाही शक्ती
आणि भरल्या पिकाचं समाधान घेऊन विठ्ठलापर्यंत जाण्याइतकी
आता शेतकऱ्याच्या पायात उरली नाही भक्ती

या तरुणाने कवितेच्या माध्यमातून ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याचा आपण कुठेतरी गांभीर्याने विचार करणार आहोत की नाही ? त्यांनी आपल्या कवितेतून ज्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत त्याची पूर्तता या दोन दिवसाच्या चर्चेतून आपण काढण्याचा प्रयत्न करु या.

सभापती महोदय, सन 1972 पडलेल्या दुष्काळापेक्षा हा मोठा दुष्काळ आहे. दुष्काळावर चर्चा म्हटली की त्यामध्ये पाच-सहा विभाग येतात. परंतु हा दुष्काळ मोठा असल्यामुळे व त्याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्यामुळे या चर्चेला माननीय मुख्यमंत्री किंवा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

उप मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे यासाठी आम्ही आग्रह धरलेला आहे. आपण योग्य तो निर्णय घ्याल अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, दिनांक 11 एप्रिल, 2012 रोजी येथे दुष्काळावर चर्चा केली. त्यानंतर दिनांक 25 जुलै आणि त्यानंतर हिवाळी अधिवेशनात दिनांक 19 डिसेंबर रोजी चर्चा केली. आपण दुष्काळांवर चर्चा केली त्यावेळी माननीय मंत्री महोदयांकडून मोठमोठी आश्वासने देण्यात आली, परंतु जनतेच्या हालअपेष्टा वाढतच आहेत.

सभापती महोदय, सन 2011 मध्ये झालेल्या दुष्काळावरील चर्चेला उत्तर देताना डॉ.पतंगराव कदम यांनी उत्तर देताना सांगितले होते की, "या वर्षी स्व.यशवंतराव चव्हाण यांची जन्म शताब्दी साजरी करीत आहोत. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले त्यावेळी माडखोलकर यांनी त्यांना प्रश्न विचारला होता की, हे राज्य कोणाचे आहे ? माननीय यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना उत्तर दिले की, हे सर्वांचे राज्य आहे, महाराष्ट्रात राहणाऱ्या लोकांचे राज्य आहे, महाराष्ट्रातील सोन्सळ गावातून मी आलो आहे, तेव्हा कोणीही काळजी करु नये. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यास समान न्याय देण्यात येईल." परंतु आज प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. दुष्काळासाठी प्राप्त होणारा निधी काही विशिष्ट जिल्ह्यात खर्च होतो हे आपल्याच विभागातून आलेल्या पत्रातून मला कळले आहे आणि ते मी आपल्यासमोर मांडणार आहे. एवढेच नव्हे तर दुष्काळाच्या नावाखाली स्वत:च्या मतदार संघातील कामे मार्गी लावली जात आहेत, हे तर वाईट आहे. आपल्या अशा वागण्यातून भरत दौंडकर यासारखे कवि आपल्या भावना कवितेतून मांडतात.

सभापती महोदय, दिनांक 25 जुलै, 2012 रोजी दुष्काळावर चर्चा झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, पाण्याचा प्रत्येक थेंबन थेंब जिरविण्याला आमचे प्राधान्य राहील. पावसाचे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात अडवून, जिरवून खरिपाचे पिके वाचविणे हे आमचे पहिले उद्दिष्ट आहे. 10 हजार अतिरिक्त शेततळी निर्माण करणे व अस्तरीकरण करणे, पावसाचा प्रत्येक थेंब जागीच जिरविण्यासाठी सिमेंट बंधारे बांधण्याचा धडक कार्यक्रम हाती घेण्यात येईल. या संदर्भातील नियोजन पूर्ण होईल तेव्हा सर्व विरोधी पक्षातील गट नेत्यांची बैठक घेऊन पुढे कार्यवाही करण्यात येईल असे देखील त्यांनी सांगितले होते. परंतु

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

आज प्रत्यक्षात स्थिती काय आहे ? अन्नधान्य आणि खरिपाचे पीक वाचविणे हे आमचे कर्तव्य आहे असे आश्वासन माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिले असले तरी ज्वारीचे उत्पादन 26 टक्क्यांनी तर गव्हाचे उत्पादन 40 टक्क्यांनी घटले आहे. तेलबियांचे उत्पादन 71 टक्क्यांनी कमी झालेले आहे.

यांनतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

अतिरिक्त शेत तळी झाली नाहीत. जी नियोजित होती ती सुध्दा शासनाला पूर्ण करता आली नाहीत. ही माझी नव्हे तर शासनाचीच आकडेवारी आहे. आर्थिक सर्वेक्षणामध्ये या बाबतची आकडेवारी अधिकृतरित्या जाहीर होईल.

महोदय, सरकारच्या वतीने मागे विरोधी पक्ष नेते आणि गट नेत्यांची बैठक बोलाविण्यात येईल असे आश्वासन दिले होते. मला आणि गटनेत्यांना बैठकीचे आमंत्रण आजपर्यंत मिळाले नाही. परंतु सत्ताधारी पक्षातील आमदारांना बोलावून त्यांच्या मतदारसंघात कोट्यवधी रुपयांच्या कामांचे वाटप झाल्याचे मला कळले आहे. मागील अधिवेशनात 19 डिसेंबर रोजी माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की, दुष्काळी परिस्थितीमध्ये मागेल त्याला काम, जनावरांना पाणी आणि चारा मिळेल या बाबत अधिकाऱ्यांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच गेल्या वर्षी मोठ्या जनावरांना चाऱ्यासाठी 40 रुपये आणि छोट्या जनावरांना 20 रुपये दिले जात होते. ते वाढवून या वर्षी मोठ्या जनावरांना 80 रुपये आणि छोट्या जनावरांना 40 रुपये देण्यात येतील असे सांगितले. एका तालुक्यातील कार्यक्रमात माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी सांगितले की, विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी चारा वाहतुकीच्या बाबतीत इंटरेस्टींग आणि भयानक परिस्थिती निदर्शनास आणून दिली. या प्रकरणी सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले आणि माननीय गृहमंत्र्यांनी खालच्या स्तरावर ते आदेश पोहोचविले असे त्यांनी सांगितले. त्यावेळी बाजूला माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील बसले होते. ते पटकन उठले आणि म्हणाले की, या बाबत आय.जी.कडून चौकशी करुन 7 दिवसांत संबंधितांना अटक करण्यात येईल. त्यावेळी वर्तमानपत्रात माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे नावे आले, परंतु माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांचे नाव आले नाही. मी तर म्हणेन की, पटकन बातमी कशी उचलावी हे माननीय श्री.आर.आर.पाटील यांच्याकडून शिकावे.

महोदय, दुष्काळी भागाच्या जिल्हावार बैठका घेण्यात येतील आणि प्रत्येक जिल्ह्यात मी स्वत: जाईन असे मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी आश्वासन दिले होते. आज कित्येक गावांमध्ये जनावरे पाणी आणि चाऱ्यांअभावी मृत्युमुखी पडत आहेत. कित्येक कुटुंबांनी आपले पशुधन विकायला काढले आहे. हे वास्तव आहे. मोठ्या जनावरांना 80 रुपये आणि छोट्या जनावरांना 40 रुपये चाऱ्यासाठी देण्याचे आपण जाहीर केले होते. परंतु जानेवारी महिन्यामध्ये वित्त विभागाने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

80 रुपयाचे 40 रुपये आणि 40 रुपयांचे 30 रुपये केले. महोदय, 15 दिवसांत चारा घोटाळ्याची चौकशी करण्यात येईल असे माननीय गृहमंत्र्यांनी आश्वासन देऊन सुध्दा आजपर्यंत चारा घोटाळ्याची चौकशी झाली नाही. मराठवाडा, विदर्भातील बुलढाणा, खानदेशातील जळगाव, धुळे, पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग कायमस्वरुपी दुष्काळामुळे होरपळत असताना, मी माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना विचारु इच्छितो की, आपण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर किती जिल्ह्यांत गेला ? आपण दुष्काळी भागात गेला की नाही, हे मी दुष्काळी भागातील आमदारांना विचारले. मी सन्माननीय सदस्य श्री.मनीष जैन यांना विचारु इच्छितो की, जळगांव मध्ये माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम आले होते काय ? पण माननीय मंत्री जरी तेथे गेले नसले तरी श्री.विश्वजीत कदम पायपीट करुन दुष्काळी भागात जाऊन आले. मला वाटते त्यांना विधानसभेत उमेदवारी दिली तर ती सार्थकी लागेल.

महोदय, माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांनी सांगितले होते की, गावामध्ये एक गाव तलाव, एक पाझर तलाव झाले पाहिजेत. तसेच कोकणात खारपाणपट्टयाची कामे करण्यासाठी मापदंडात बदल करावा लागेल असे ते म्हणाले होते. दुष्काळामुळे होरपळत असलेल्या गावांमध्ये आज कोठेही गाव तलाव नाही. कोकणात खारपाणपट्टयाची कामे करण्यासाठी मापदंडात बदल करण्यात आल्याची चर्चा झाल्याचे माझ्या ऐकीवात नाही.

महोदय, पाणी पुरवठा मंत्री महोदयांनी या सरकारला नापास केले आणि सरकारने सुध्दा संपर्क मंत्री म्हणून त्यांना नापास करुन टाकले आहे. प्राध्यापक असलेली व्यक्ती सरकारला प्रत्येक वेळा नापास करीत आहे. माननीय मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे हे ढोबळमानाने जेवढे बोलायचे असते तेवढे बोलतात. त्यांनी सांगितले होते की, यासाठी आऊटसोर्सिंग करुन जीएसडीए विभागाच्या निवृत्त अधिकाऱ्यांना परत बोलावून त्यांच्याकडून सर्व्हे करुन आणखीन काही नवीन बोअर घेता येतील काय तसेच त्या ठिकाणी सौर ऊर्जेचे पंप बसविण्याचा विचार करता येईल काय या बाबत आम्ही काळजी घेतली आहे. तसेच बाष्पीभवनामुळे कमी होणारे पाणी थांबवावयाचे असेल तर त्यासाठी एक प्रकारची पावडर वापरली जाते...

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

की, ज्यामुळे बाष्पीभवन थांबविले जाते. अशी कोणती पावडर आहे हे माहीत नाही. हा प्रयोग यशस्वी झाला तर जेथे मोठा कॅचमेंट एरिया आहे किंवा मोठे धरण आहे तेथील पाणी वाचविण्याचे प्रयत्न करता आले तर त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करणार आहोत असे सांगण्यात आले होते. त्यानंतर किती बोअर झाल्या ? सौर ऊर्जा पंप, सोलर पॅनेल किती उभे केले ? काहीही केलेले नाही. बाष्पीभवन थाबविण्यासाठी आवश्यक असणारी पावडर बघण्यासाठी मी उत्सुक होतो. आपण ती पावडर पाहिली आहे का ? अशी पावडरच नाही. केवळ बोलत जायचे. चर्चा आली, बोलले, अधिवेशन संपले की मोकळे अशी परिस्थिती आहे.

दुष्काळात ज्या सुविधा दिल्या पाहिजेत त्यामध्ये आपण सहकारी कर्जाचे रुपांतर करीत आहोत का ? वीज बिलामध्ये 37 टक्क्याची सुट देत आहोत का ? परीक्षा शुल्कात माफी देत आहोत का ? शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती दिली आहे का ? गाव तेथे चारा डेपो काढण्याबाबत आपण पत्रक काढले परंतु तसे झाले आहे का ? बाधित शेतकऱ्यांच्या वीज जोडण्या थकित बिलामुळे खंडित न करणे आणि खंडित केली असेल तर ती पुन्हा जोडणे याबाबत कार्यवाही केली आहे का ? ज्या ठिकाणी आपण जातो त्या ठिकाणी जो भेटतो तो सांगतो की आमचे कनेक्शन कापले. कंपनीचा एक अधिकारी तर स्वत: मालकच होऊन बसला आहे. तो सरकारचे काही ऐकत नाही. वीज जोडण्या तोडण्यात येत आहेत.

माननीय राज्यपालांनी कालच्या अभिभाषणामध्ये लोडशेडींगबाबत उल्लेख केला. आपण असत्य बोलावयाचे पण माननीय राज्यपालांच्या तोंडी असत्य माहिती घालण्याचा काय प्रकार चालला आहे हे मला कळत नाही. माननीय राज्यपालांच्या कालच्या अभिभाषणात माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम, श्री. आर.आर.पाटील यांच्या गावांचा उल्लेख आला आणि केवळ आपल्याच गावांचा उल्लेख आहे असे वाटू नये म्हणून फक्त श्री. एकनाथ खडसे यांच्या मुक्ताईनगरचा उल्लख केला परंतु ज्या ठिकाणी सर्वात जास्त दुष्काळ आहे त्या मराठवाड्याचा एका शब्दानेही त्यामध्ये उल्लेख केलेला नाही. माननीय राज्यपालांचे जे अभिभाषण असते त्यातून राज्य सरकारची दिशा कळते. त्या अभिभाषणामध्ये मराठवाड्याबद्दल एकही शब्द नमूद केलेला नाही. याबाबत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. विनोद तावडे .....

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे बोलतील असे मला वाटले होते. सन्माननीय सदस्य प्रा. नवले सुध्दा काही बोलले नाहीत. किमान पत्रक तरी येईल असे मला वाटले होते. पण आज आमदार श्री. गोरंट्याल यांनी 50 हजार लोकांचा मोर्चा काढला. त्या ठिकाणी ट्रॅफीक जाम झाला आहे. सत्ताधारी पक्षाचे आमदार उपोषणाला बसले आहेत. मग असेच काही तरी श्री. राहूल गांधी यांना जाऊन सांगतात. वर्तमानपत्रात ते आले आहे.

सभापती महोदय, औरंगाबाद, पैठण व गंगापूर या शहरांसह सुमारे 200 गावांचे पिण्याचे पाणी, परळी औष्णिक केंद्र, औद्योगिक वसाहत आदींना जायकवाडी धरणातून पाणी पुरवठा होतो. जालना शहरास सद्यस्थितीत पाणेवाडी व शहागड केटीवेअर या उद्‌भवातून पाणी पुरवठा सुरु असला तरी पाणेवाडीमधील मृत व जिवंत असे दोन्ही पाणीसाठे संपले आहेत. शहागड केटीवेअर देखील आता कोरडा पडला आहे. जालना शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी जायकवाडी धरणातून शहागड केटीवेअरमध्ये पाणी सोडणे आता गरजेचे आहे. पण जायकवाडीमध्ये सध्या 84 द.ल.घ.मी. जिवंत पाणीसाठा आहे तसेच 738.10 द.ल.घ.मी. मृत पाणीसाठा असून एकूण 822.10 द.ल.घ.मी. एवढा पाणीसाठा जायकवाडी धारणात आहे आणि हा पाणीसाठा पिण्याच्या पाण्याकरिता सहा महिने पुरेल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

जायकवाडीतील मृत साठा 26 टीएमसी असला तरी त्यापैकी सुमारे 25 टक्के भाग गाळाने भरलेला आहे. औरंगाबाद व जालना शहरासह विचार केल्यास पुढील पावसाळ्यापर्यंत बिगर सिंचन वापरासाठी जवळपास 12 टीएमसी पाणी लागेल. यापैकी जवळजवळ साडेपाच टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होण्याची शक्यता असल्याने एकूण 17 टीएमसी पाणी जायकवाडी धरणामध्ये पोहोचले पाहिजे. पण केवळ 9 टीएमसी पाणी सोडल्याने मराठवाड्याचा प्रश्न सुटणार नाही. सध्या जायकवाडीत 3 टक्केच उपयुक्त जलसाठा असून बिगर सिंचन वापरासाठी तातडीने आणखी 8 टीएमसी पोहोचेल एवढे पाणी सोडणे आवश्यक आहे. जायकवाडीत वरच्या धरणातून किमान 8 टीएमसी पाणी सोडले नाही तर मराठवाड्यातील जनतेला पिण्यासाठी सुध्दा पाणी मिळणार नाही असे आजचे वास्तव आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

जायकवाडी धरणासाठी निश्चित केलेले 102 टीएमसी पाणी त्या धरणात येतच नाही. कारण वरच्या भागात धरणे बांधून पाणी अडविण्यात आलेले आहे. वरच्या भागात 115 टीएमसी इतक्या पाण्याचे नियोजन केलेले असताना तेथे 158 टीएमसी क्षमतेची धरणे बांधण्यात आली आहेत. येथेच जायकवाडी धरणाचा गळा दाबण्याची सुरुवात झाली आहे. प्रत्यक्ष ही धरणे भरल्यानंतर ते पाणी त्याच जिल्ह्यात सोडण्याऐवजी इतर जिल्ह्यांमध्ये सोडले जाते. वरच्या भागातील धरणाचा पाण्याचा साठा लक्षात घेता जायकवाडी धरणातील चालू वर्षातील पाण्याचा हक्क 33 टीएमसी उपयुक्त पाणी इतका आहे. जायकवाडी धरणाचे एकूण पाणलोट क्षेत्र 21,750 चौ.कि.मी.इतके आहे. त्यापैकी 14,000 चौ.कि.मी.हे मुक्त पाणलोट क्षेत्र आहे. पण या मुक्त पाणलोट क्षेत्रात अनेक लघु, मध्यम प्रकल्प झालेले आहेत. परंतु या मुक्त पाणलोट क्षेत्रात पडलेले पावसाचे पाणी जायकवाडी धरणामध्ये येत नाही. कारण मधल्या भागातील धरणामध्ये हे पाणी अडविले जाते.

2005 मध्ये राज्यामध्ये जलसंपत्ती नियमन प्राधिकरणासंबंधीचे विधेयक भरपूर चर्चा केल्यानंतर पारित केले होते. या प्राधिकरणाची महत्वाची कर्तव्ये काय होती तर पाटबंधारे विकास महामंडळांना नदी खोरे अभिकरणे म्हणून कार्यरत करणे. पाणी उपलब्धता प्रमाणपत्राच्या आधारावर खोरे, उपखोरेनिहाय पाणी वापर हक्काची निश्चिती करणे. नदी खोरे अभिकरणांतर्फे पाणी वापर हक्क प्रदान करणे, एकात्मिकृत राज्य जल आराखडा मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्य जल मंडळ तयार करणे. एकात्मिक राज्य जल आराखड्यास मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील राज्य जल परिषदेने मंजुरी देणे. पण जलसंपत्ती नियम प्राधिकरणाने गत 7 वर्षात याबाबतीत काहीच केले नसल्यामुळे पाण्याचे समन्यायी वाटप झालेले नाही. हे अनेक नेते मान्य करीत आहेत. पाण्याचे समन्यायी वाटप न झाल्यामुळे मराठवाड्यातील जनतेबरोबरच नगर व नाशिक जिल्ह्यातील जनतेमध्ये भांडणे लागलेली आहेत. दोन्ही भागातील जनतेला आपल्यावर अन्याय होत आहे असेच वाटत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी निधीच्या असमतोल वाटपाबाबत माझे विचार मांडणार आहे. मी शासनाच्या संबंधित खात्यांना जी पत्रे पाठविली होती त्याचा या ठिकाणी उल्लेख करणार आहे. याबाबत शासन कदाचित असे म्हणेल की, आम्ही निधीचे समन्यायी वाटप केलेले आहे. मे

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

महिन्यापर्यंत दुष्काळ निवारणावरील खर्च बहुतांश करुन चारा डेपोवर व चारा छावण्यांवर करण्यात आलेला आहे. केंद्र सरकारकडून आलेला पैसा कशासाठी व कसा खर्च केला आहे त्यावर मी नंतर बोलेन. जानेवारी, 2013 या महिन्यापर्यंत या बाबीवर 684 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. परंतु झालेल्या खर्चाचा जिल्हानिहाय तपशील पाहिला तर बहुतांश खर्च हा सातारा, सांगली, सोलापूर व अहमदनगर याच जिल्ह्यात झाल्याचे निदर्शनास येते. 684 कोटी रुपयांपैकी सातारा जिल्ह्यात 114 कोटी रुपये म्हणजे 18.65 टक्के, सांगली जिल्ह्यात 127 कोटी रुपये म्हणजे 16.69 टक्के, सोलापूर जिल्ह्यात 191 कोटी रुपये म्हणजे 27 टक्के, अहमदनगर जिल्ह्यात 176 कोटी रुपये म्हणजे 25 टक्के खर्च झालेला आहे. आतापर्यंत झालेल्या खर्चापैकी 90 टक्के खर्च केवळ या चार जिल्ह्यात करण्यात आलेला आहे. म्हणजे राज्यातील बाकीच्या जिल्ह्यांमध्ये दुष्काळ नाही असे शासनाचे मत असावे. परंतु या चार जिल्ह्यातील मंत्री मंत्रिमंडळात असल्यामुळे अधिक खर्च करण्यात आलेला आहे.

मराठवाड्यातील दुष्काळाची परिस्थिती खूपच गंभीर आहे. बहुतांश करुन मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प कोरडे पडलेले असताना मराठवाड्यातील दुष्काळी जिल्ह्यांमध्ये केवळ 4.60 टक्के एवढीच रक्कम खर्च झालेली आहे. त्याचबरोबर विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात तर एक पैसाही खर्च झालेला नाही. वास्तविक त्या जिल्ह्याची आणेवारी 50 पैशापेक्षा कमी असल्यामुळे तेथे अधिक खर्च करणे आवश्यक होते. त्यामुळे निधीचे समन्यायी वाटप केल्याचा दावा फोल ठरलेला आहे. मंत्री महोदय श्री.पतंगराव कदम हे यशवंतराव चव्हाण यांचे अनुयायी असल्यामुळे आज सकाळी ते कराडला जाऊन आलेले आहेत. निधीचे वाटप करीत असताना समन्यायी वाटपाच्या भावना आपल्या मनामध्ये होत्या किंवा नाही याबद्दल माझ्या मनामध्ये शंका आहे.

सभापती महोदय, मागील वेळी मंत्री महोदय श्री.पतंगराव कदम यांनी सभागृहात जे सांगितले तेच टी.व्ही.च्या चॅनेलवरुन जाहीर केले होते. मी दुष्काळाची झळ एकाही नागरिकाला सोसू देणार नाही. प्रत्येक मंगळवारी मंत्रिमंडळ उपसमितीची मी बैठक घेणार आहे. या बैठकीत तुम्ही तुमच्या समस्या सांगाव्या असेही त्यांनी सांगितले होते. मी त्यावर लगेच तोडगा काढीन. त्यानुसार मी त्यांच्याकडे बरीच निवेदने दिली होती. मी दुष्काळी भागातील दौरा करीत असताना

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

तेथील शेतकऱ्यांकडून निवेदने घेतली होती. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. परत आल्यावर मी इमाने इतबारे ती निवेदने मंत्री महोदयांकडे दिलेली आहेत. त्या निवेदनांपैकी एकाही निवेदनासंबंधी मला शासनाकडून उत्तर आलेले नाही. मध्यंतरी मी मंत्री महोदयांकडे एका बैठकीला गेल्यावर मंत्री महोदय श्री.नितीन राऊत यांनी त्यांच्या कानामध्ये काय सांगितले ते ठाऊक नाही. मंत्री महोदय श्री.नितीन राऊत हे मला असे म्हणाले की, विनोद तावडे तुमचे काम झाले का, तुमचे काम झाल्यावर माझ्या घरी जेवणासाठी यावे. मी मंत्री महोदय श्री.पतंगराव कदम यांना म्हटले की, तुम्हीच विरोधी पक्ष नेत्यांनी मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीला येऊन आपल्या समस्या मांडाव्यात असे सांगितले होते. मला असे वाटले होते की, मंत्री महोदय हे कार्यक्षम असल्यामुळे हा प्रश्न गंभीर असल्यामुळे काही तरी करतील.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

अमरावती विभागातील आणेवारीचा विषय असेल, बुलढाण जिल्हयातील पाण्याच्या टँकरचा विषय असेल, ठिबक सिंचनाचा विषय असेल या बरोबरच चारा छावण्या, फळबागा, कृषी पंप, वीज कनेक्शन तोडणे या सगळया विषयाची निवेदने मी मंत्री महोदयांकडे दिलेली आहेत. राज्यात 12 हजार गावे दुष्काळग्रस्त असताना केवळ 764 गावामध्ये 50 टक्क्या पेक्षा कमी आणेवारी घोषित केलेली आहे. ही सर्व निवेदने दिल्यानंतर त्यापैकी फक्त 4 निवेदनांबाबत मला मंत्री महोदयांची उत्तरे आली. म्हणजे अधिवेशनामध्ये विचारणा केली तर उत्तर दिले असे सांगता यावे म्हणून त्यांनी चार निवेदनांना उत्तरे दिली असावीत. त्यापैकी तीन निवेदनाबाबत नकारात्मक उत्तरे दिली. मी मंत्री महोदय डॉ.पंतगराव कदम यांना सांगू इच्छितो की, ते ज्या प्रमाणे घोषणा करतात त्याप्रमाणे त्यांनी कृती करावी. माझ्याकडे अर्थखाते नाही, अशी कारणे त्यांनी सांगू नयेत.

सभापती महोदय, दुष्काळाचे खरे लाभार्थी कोण आहेत ? पश्चिम महाराष्ट्रामधील चार जिल्ह्यामध्ये 684 चारा छावण्यांसाठी 90 टक्के रक्कम खर्च झालेली आहे. ही रक्कम कुणाच्या घशात गेली आहे ? 90 टक्के चारा छावण्या जवळच्या कार्यकर्त्यांना वाटण्यात आल्या. अहमदनगर, कर्जत, अशोक जायभाय, तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँगेस. नेताजी सुभाषचंद्र बोस वाचनालय, दुर्गाव, अशोक जायभाय, तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँगेस यांचे आणि इतरही अर्ज आलेले होते. त्यामधून राष्ट्रवादी काँग्रेसच्याच कार्यकर्त्यांना चारा छावण्या मिळाल्या.

सितपूर, कल्पतरू ग्रामीण विकास संस्था, दुर्गाव, अशोक जायभाय, तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँगेस. अंबिका सहकारी दूध उत्पादक संस्था, सोनाळवाडी, बापूसाहेब देशमुख, काँग्रेस-आय, हे मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात यांच्या जवळचे कार्यकर्ते आहेत. मजूर सहकारी संस्था, तापेखंडेश्वरी, किरण पाटील, विद्यमान उपसभापती, कर्जत पंचायत समिती. महसूलमंत्री समर्थक काँग्रेस-आय असे होर्डिंगवर लिहिलेले आहे. चापडगाव मजूर सहकारी संस्था, चापडगाव, प्रकाश शिंदे, तालुका पदाधिकारी, काँग्रेस-आय. काकासाहेब दापके प्रतिष्ठान, खांडवी, काका तापकीर, माजी तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस. माजी कार्यकर्त्यांना चारा छावण्या दिल्याचे दिसत आहे. खंडेश्वर ग्रामीण संस्था खळगाव, मोहन खेडकर, तालुका सरचिटणीस काँग्रेस-आय. संत कैकाडी महाराज सहकारी संस्था, आबा कदम, काँगेस-आय. यशवंत दूध

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सहकारी संस्था, मुकुंदराव काळे, काँग्रेस-आय. सिना मजूर सहकारी संस्था, अशोक निंबाळकर, काँग्रेस-आय. सुलक्षणी ग्रामीण बिगर शेती संस्था, दादा कानगुडे, काँग्रेस-आय. राजीव भोसले, काँग्रेस-आय. जामखेडमध्ये प्रकाश नवले, राष्ट्रवादी काँग्रेस. 90 टक्के रक्कम ही चारा छावण्यांच्या माध्यमातून दिलेली आहे. दुष्काळामध्ये अशी प्रचंड कमाई करण्याची संधी मिळत असेल तर कुणाला दुष्काळ नकोय. सभापती महोदय, हे तर देवळामध्ये जाऊन दुष्काळासाठी नवस करतात. महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यात आता दुष्काळ माफीया वाढायला लागले आहेत. पुढारी, टँकर लॉबी, चारा छावण्या, दुष्काळी गावासाठी मशिनरी पुरविणारे ठेकेदार अशा अनेकांचा यामध्ये समावेश होतो.

..नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम. 12:50

श्री.विनोद तावडे...

महोदय, राज्यात दुष्काळ पडला तरच वेगवेगळया लॉबींचा फायदा होतो. मी मघाशी सांगितले की, जनावरांच्या छावण्या आणि चारा यामध्ये कशा पध्दतीने भ्रष्टाचार झाला आहे, त्याची उदाहरणे मी देणार आहे. मी चारा वाहतूक करणाऱ्या वाहनांचे नंबर सोबत आणलेले आहेत. जे शेतकरी अस्तित्वात नाहीत, जे शेतकरी हयात नाहीत, या बाबत ग्रामसेवकांची तसेच सरपंचाची पत्रे तसेच इतर संबंधित कागदपत्रे मी सोबत आणलेली आहे. मी ज्या संस्थांचा मघाशी उल्लेख केला, त्या संस्थेने ज्या लाभार्थ्यांना लाभ दिला आहेत, त्यातील बरेच लाभार्थी हयातच नाहीत. या संस्था चालकांनी स्वर्गात नेऊन चारा पोहोचविला दिसतो,किती क्षमतावान कार्यकर्ते आहेत. म्हणून तर या कार्यकर्त्यांना सर्व गोष्टी जमतात. ज्या शेतकऱ्यांची जनावरे छावणीमध्ये आहेत, त्यांना चारा देण्यात येतो. परंतु जे शेतकरी स्वर्गवासी झाले आहेत, त्यांच्या जनावरांसाठी चारा स्वर्गात पोहोचविण्याचे काम या संस्थांनी केलेले आहे, यावरुन त्या संस्थांची कार्यक्षमता फार मोठी आहे असे दिसून येते. कदाचित चारा त्यांनी स्वर्गात अगोदरच नेऊन ठेवला असावा. हा शेतकरी आज ना उद्या मरणारच असल्याने त्याला त्या चाऱ्याचा उपयोग तेथे होईल. माझ्याकडे ग्रामसेवक आणि सरपंच यांचे अधिकृत पत्र आहे. त्यांनी आपल्या पत्रात स्पष्टपणे म्हटले आहे की, सदर शेतकरी हयात नाही, तो आमच्या गावात नाही. सदर शेतकरी हा चार वर्षापूर्वी मृत पावलेला आहे. पण खोटे लाभार्थी दाखवून शासनाच्या पैशांची मोठया प्रमाणात संस्था व कार्यकत्यांनी लूट केलेली आहे. या गंभीर प्रकाराच्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात माहिती द्यावी.

सभापती महोदय, दुष्काळ निवारणासंबंधीचा निधी मातब्बर मंत्र्यांच्याच मतदार संघात का जातो असा प्रश्न राज्यातील सामान्य माणूस विचारावयास लागला आहे. सातारा, सांगली जिल्हयातील कायम स्वरुपी दुष्काळ असलेल्या तालुक्यातील समस्या सोडविण्यासाठी टेंभू, ताकारी, म्हैसाळ या उपसा सिचंन योजनेला प्रशासकीय मान्यता देऊन त्या उपसा सिंचन योजनेचे काम सुरु केले आहे. त्या ठिकाणी उपसा सिंचन योजनेची निश्चितपणे गरज आहे, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. दुष्काळी भागासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देऊन तेथील समस्या दूर कराव्यात असा उद्देश होता. परंतु या योजनेतून मिरजला पाणी न देता माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या तासगावला पाणी दिले गेले. ही बाब उघड झाली आहे. आम्ही

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

मिरजेच्या पाण्याच्या संदर्भात मदत व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे बैठक आयोजित करण्याची विनंती केली. त्या विनंतीप्रमाणे त्यांच्या दालनात बैठक आयोजित केली गेली. पण त्या बैठकीसाठी दुसरे मंत्री येण्यास तयार नाहीत. दुष्काळाच्या बाबतीत कोणी राजकारण करावयाचे नाही असे नेत्यांकडून सांगितले जाते. नेत्यांचे म्हणणे आम्ही ऐकावयाचे. त्या मंत्र्यांनी सरळ सांगितले की, तेथील बैठकीस मी येणार नाही. त्या मंत्र्यांना दोन ते तीन वेळा विनंती केली, त्यानंतर ते मंत्री बैठकीस आले. त्यानंतर त्या बैठकीत दुष्काळावर चर्चा झाली. मी जी वस्तुस्थिती सांगतो आहे. ती खरी आहे किंवा नाही या बाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा.

डॉ.पतंगराव कदम साहेब, आपल्या तालुक्यातील माहुली पर्यंत पाणी येते. परंतु खानापूर पर्यंत पाणी जाते काय ?

डॉ.पतंगराव कदम : आता जाईल.

श्री.विनोद तावडे : खानापूरपर्यंत पाणी दुष्काळ संपल्यावर जाईल.

डॉ.पतंगराव कदम : सदरच्या कामासाठी 73 कोटी रुपये दिलेले असून काम सुरु देखील झालेले आहे.

श्री.विनोद तावडे : आपल्या तालुक्यापर्यंत प्रथम पाणी यावयास पाहिजे होते. शेजारचे तालुके कायम स्वरुपी दुष्काळी ठेवावयाचे आणि आपल्या तालुक्याचा विकास करुन घ्यावयाचा अशा प्रकारची वृत्ती ठेवणे बरोबर नाही. आपण मघाशी म्हणालात की, आता खानापूरपर्यंत पाणी जाईल. विधिमंडळ सभागृहात तुम्ही आहात, मी देखील आहे. जर खानापूर पर्यंत पाणी गेले तर त्या विषयी आपण सभागृहात पुन्हा चर्चा करु.

महोदय, या सगळया दुष्काळामध्ये मार्ग काढला पाहिजे तो काढला गेलेला नाही असे राज्यात फिरल्यानंतर मला कळून आले आहे. मी लातूर जिल्हयातील शिरुर अनंतपाळ येथे गेलो होतो. तेथे साकोळा पाणी पुरवठा योजना पूर्ण झाली आहे असे माननीय प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांच्या पाणी पुरवठा विभागाचे म्हणणे आहे. जिल्हाधिकारी यांचे म्हणणे आहे की, ही योजना पूर्ण झालेली नाही. त्यामुळे ती योजना आम्ही ताब्यात घेत नाही. आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सांगते की, आम्ही ती योजना सू-मोटो त्यांच्या ताब्यात देऊन टाकली आहे. त्या योजनेच्या कामावर

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

5 ते 7 लाख रुपये खर्च करावयाचा आहे. जिल्हा परिषद तो खर्च करीत नाही. जिल्हा परिषदेचे म्हणणे असे आहे की, आम्ही ती योजना अधिकृतपणे ताब्यात घेतलेली नाही. जर त्या योजनेवर आम्ही खर्च केला तर लेखा परीक्षण होईल, त्यावेळी आम्ही काय उत्तर देणार ?. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे म्हणणे आहे की, आम्ही सदर योजना जिल्हा परिषदेच्या ताब्यात दिलेली आहे. हा खर्च कोणीही करण्यास तयार नाही. परंतु टँकर व्दारे पाणी पुरवठा करण्यासाठी 12 लाख रुपये खर्च करण्यात आला. या योजनेवर 5 लाख रुपये खर्च कोणी करावयाचे या बाबतीत प्रत्येक विभाग टोलवा टोलवी करीत असताना टँकर व्दारे पाणी पुरवठा करण्यावर मात्र 12 लाख रुपये खर्च केला गेला. या बाबतीत माननीय पाणी पुरवठा मंत्री श्री.लक्ष्मणराव ढोबळे यांच्या दालनात बैठक बोलाविण्यास सांगितले, त्या प्रमाणे त्यांनी या विषयी बैठकही आयोजित केली.

महोदय,डॉ.पतंगराव कदम साहेब, तुम्हाला या बाबतीत निवेदन देऊन थांबत नव्हतो. त्या गावात मी स्वत: जाऊन आलो. तेथील प्रश्न समजून घेतला. त्यानंतर मी संबंधित मंत्र्यांना या विषयाच्या बाबतीत संबंधित अधिकाऱ्यासमवेत बैठक बोलाविण्याची विनंती केली होती. माझ्या विनंती प्रमाणे माननीय मंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यासमवेत बैठक आयोजित करुन संबंधित मंत्री महोदयांनी यासंबंधी सकारात्मक आदेश दिले आणि आम्ही तो प्रश्न मार्गी लावला.

डॉ.पतंगराव कदम : आपले काम योग्य दिशेने चालले आहे.

श्री.विनोद तावडे : आम्हाला सत्तेत येऊन ही कामे करावयाचीच आहेत. त्यामुळे आमची दिशा निश्चितपणे योग्य आहे. सभापती महोदय, मी कुंटेफळ-आष्टी येथे गेलो होतो.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

आष्टीला कुंठेफळ येथे उजनी धरणातून पाणी यायचे आहे. पाणी पुढे येण्यासाठी आवश्यक असणारा प्रकल्प होणे आवश्यक आहे. कुंठेफळ, आष्टी येथे पाणी यायचे आहे, त्यासाठीच्या प्रकल्पाचे अद्याप टेंडरिंग झालेले नाही. एस्टीमेट तयार झाले असले तरी काम काहीच झालेले नाही. कुंठेफळ प्रकल्पाच्या पुढे नेहती नदीवर प्रकल्प आहे. परंतु त्याच्या अगोदरचा प्रकल्प न केल्यामुळे पाणी या प्रकल्पात येणार आणि पुढच्या प्रकल्पात पाणी जाणार नाही. त्यामुळे तेथील गावकऱ्यांनी ओरड करावी लागणार आहे. कुंठेफळ प्रकल्पात उजनी धरणातून पाणी यायचे आहे. उजनी धरणात कोल्हापूरहून पाणी यायचे आहे. तेथून ते पुढच्या टप्प्यात आणि मग कुंठेफळ प्रकल्पात पाणी येणार आहे. परंतु काहीच काम झालेले नसताना 60 कोटी रुपये खर्च झालेला आहे. पुढील टप्प्यात पाणी यायचे आहे. मग यावर एवढा खर्च का झाला याबाबत चौकशी होण्याची आवश्यकता आहे. गरजूंना पाणी मिळत नाही. उजनी धरण 100 टक्के भरले असेल तर माढा तालुक्यातील माढा-सीना बोगद्यातून पाणी सोडण्यात येते. सीना बोगद्यातून पाणी सोडताना दोन साखर कारखाने, एक वायनरी व बारामती तालुक्यातील डेअरीसाठी पाणी सोडण्यात आल्याचे आझाद मैदानामध्ये उपोषणासाठी बसलेले शेतकरी सांगतात. ते शेतकरी माननीय मुख्यमंत्र्यांकडे निवेदन देण्यासाठी गेले होते. त्या शेतकऱ्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सुध्दा त्यांना न्याय मिळेल अशी स्थिती दिसत नाही. मुंबई शहरामध्ये हे शेतकरी 50 दिवसांपासून उपोषणासाठी बसलेले आहेत.

सभापती महोदय, जामखेड तालुक्यातील चोंडी साठवण तलाव म्हणजे राजकीय दादागिरीचा एक उत्तम नमुना आहे. नगर जिल्हयात दुष्काळजन्य स्थिती असून जामखेड तालुक्यातील पाझर तलाव कोरडा पडला आहे. चोंडी कोल्हापूर पध्दतीच्या पाझर तलावामध्ये कुकडी आवर्तनातून पाणी सोडण्याची मागणी स्थानिक जनता करीत आहे. स्थानिक आमदार प्रा.राम शिंदे यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे तशी मागणी केली आहे. चोंडी साठवण तलावात कुकडी धरणातून पाणी सोडण्यासाठी कुकडी पाटबंधारे विभागाच्या अभियंत्यांकडे 20 नोव्हेंबरला मागणी केली आहे. या मागणीमध्ये पोलीस संरक्षणात पाणीपुरवठा करावा असेही नमूद केले आहे.

सभापती महोदय, मी पोलीस महासंचालकांनी काढलेले परिपत्रक वाचले आहे. त्यात असे नमूद केले आहे की, पाण्यावरुन दंगे होतील, सावध रहा. पुरोगामी महाराष्ट्रात नियमाप्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

पाणीपुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी, तहसीलदार मागणी करतात, तरी सुध्दा राजकीय मोठ्या व्यक्ती त्याला विरोध करतात. ते पाणी थांबवून ठेवतात. कारण जामखेड हा विरोधी पक्षाचा मतदारसंघ आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात असे करता कामा नये.

सभापती महोदय, अहमदनगरचे जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या 23 नोव्हेंबरच्या पत्रात जामखेड तालुक्यातील पिण्याच्या पाणी टंचाईबाबत 550 दशलक्ष घनफूट आणि 24 नोव्हेंबरच्या पत्रान्वये 100 दशलक्ष घनफूट पाणी कुकडी धरणाच्या डाव्या कालव्यातून सोडण्याची मागणी अधीक्षक अभियंता, कुकडी पाटबंधारे प्रकल्प यांच्याकडे केली आहे. आदेश देऊनही पाणी सोडण्यास विलंब होत असल्यामुळे स्थानिक आमदारांनी उपोषण केले. जिल्हाधिकाऱ्यांना इशारा दिला. कुकडी पाटबंधारे प्रकल्प क्रमांक-2 चे कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्याबाबत नगरचे जिल्हाधिकारी यांनी जलसंपदा विभागाच्या सचिवांकडे मागणी केली. जिल्हाधिकारी यांनी सचिवांकडे मागणी करुनही आजपर्यंत काही कार्यवाही झालेली नाही.

सभापती महोदय, ज्या ठिकाणी गरज आहे तेथे छावणी नाही. गरज असूनही छावणी मंजूर झालेली नाही. कर्जत तालुक्यात 49 छावण्या मंजूर झाल्या. राजकीय पुढाऱ्यांच्या दादागिरीमुळे काही ठिकाणी दुप्पट छावण्या सुरु करण्यात आल्या.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

या ठिकाणच्या चारा छावण्यांमध्ये श्रीमंत शेतकऱ्यांची जनावरे असल्याचे मी स्वत: पाहिलेले आहे. श्रीमंत शेतकरी आपल्या पैशाने चारा घेऊ शकतो अशा श्रीमंत शेतकऱ्याची जनावरे चारा छावणीत होती परंतु जो गरीब शेतकरी चारा आणू शकत नाही अशा गरीब शेतकऱ्यांची जनावरे त्या चारा छावण्यांमध्ये आम्हाला आढळून आली नाहीत.

सभापती महोदय, चाऱ्याच्या संदर्भात माझी माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, जर्सी गायींच्या चाऱ्याच्या संदर्भात आपल्याला धोरणात्मक निर्णय करावा लागणार आहे. आज जर्शी गायींना 15 किलो चारा दिला जातआहे परंतु जर्सी गायींचे 15 किलो चाऱ्यामध्ये त्यांचे पोट भरणार नाही. त्यामुळे जर्सी गायींना चारा वाढवून देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, चाऱ्याच्या संदर्भात मी कर्जत येथील मुद्दा उपस्थित केला होता. यामध्ये आयजी लेव्हलचे अधिकारी ताबडतोब जात असतात त्याप्रमाणे श्री. मुक्त्यार हे ताबडतोब त्या ठिकाणी जाऊन आले. पहिले सात दिवस काम जोरात सुरु झाले परंतु नंतर हे काम मंद झाले. या अधिकाऱ्यांवर पदाधिकाऱ्यांचे दबाव येऊ लागले. काही शिष्टमंडळे माननीय गृहमंत्र्यांना भेटली. ही सर्व चौकशी 10 दिवसात पूर्ण करु असे माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी आश्वासन दिले होते परंतु हिवाळी अधिवेशन होऊन किती महिने उलटनू गेले याचा तुम्हीच विचार करा. परंतु कामाची गती मंद का झाली याची माहिती अधिकाऱ्यांनी द्यावयास सुरुवात केल्यानंतर हा विषय बंद झाला. खरे म्हणजे 12 जानेवारी पासून यासंदर्भातील सर्व तपास बंद आहे.

सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात बोगस वाहनातून चारा आणला गेला याची पाच उदाहरणे मी पुराव्यानिशी दिली होती. परंतु आता माझ्याकडे 100 च्या वर पुरावे आहेत. माझ्याकडे आता बोगस 100 वाहनाचे नंबर्स आहेत. परवा मला बजाज कंपनीचे मालक श्री. राहूल बजाज भेटले होते त्यांना मी सांगितले की, साहेब तुमची एम-80 तर 35 टन चारा घेऊन जाते त्यामुळे या गाडीची तुम्ही जाहिरात करा असे सांगितले असता ते केवळ हसले.

सभापती महोदय, बोगस वाहनातून चारा कशा प्रकारे आणला गेला आणि शासनाचे पैसे कसे लुबाडले गेले याची माहिती माझ्याकडे आहे परंतु सर्व माहिती वाचावयास वेळ जाईल त्यामुळे मी ही सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सभापती महोदय, जय भवानी दूध उत्पादक संस्थेमार्फत पुरविणाऱ्या चाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. या ठिकाणी लाभार्थी सुध्दा बनावट दाखविण्यात आलेले आहेत. जय भवानी दूध उत्पादक संस्था ही चेअरमन श्री. शिवाजी यांची असून त्यांनी आपल्या सहकाऱ्यांमार्फत चारा डेपो 10.6.2012 मध्ये सुरु केला होता. हा चारा डेपो चिंचोली, डिकसळ, टाकळी,खंडेश्वर, माही, जळगाव, नागलवाडी, नागपूर, सितपूर,आनंदवाडी, निंबोडी,करळगाव, बाभूळगाव अशा किती तरी गावांमध्ये सुरु केली. जळगाव येथील सात लाभार्थी हे जळगावमध्ये राहणारे नसून त्यातील एक लाभार्थी मयत आहे यासंदर्भातील माहिती सरपंच आणि ग्रामसेवकांकडून मला प्राप्त झालेली आहे. बाभूळगाव येथील 25 लाभार्थी त्या गावातील रहिवाशीच नाही. या ठिकाणी असणारे लाभार्थी आणि त्यांच्या जनावरांच्या संख्येत तफावत असल्याचे लाभधारकच सांगतात एवढेच नव्हेतर ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामसेवकांचे यासंदर्भातील पत्रही माझ्याकडे आहे. नागपूरच्या डिसेंबरच्या अधिवेशनात याच तालुक्यातील भ्रष्टाचाराच्या संदर्भात चर्चा झाली होती. परंतु वाईट एवढेच वाटते की, चर्चा होऊनही त्या ठिकाणी तोच प्रकार सर्रास सुरु आहे. या सभागृहात भ्रष्टाचाराची चर्चा होते पण तेथील कार्यकर्ते, अधिकारी पुन्हा तोच प्रकार सुरु करतात याचे आम्हाला वाईट वाटते.

यानंतर श्री. भारवि....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.विनोद तावडे...

डिकसळला 104 लाभार्थी आहेत. त्यातील एक लाभार्थी खरा असून 103 लाभार्थी बाहेरचे आहेत. या 103 लाभार्थींना कधीच पाहिले नाही, ते कधी दिसले नाहीत अशा प्रकारची माहिती सरपंच नव्हे तर ग्रामसेवक माहितीच्या अधिकारात लिखित स्वरूपात देत आहेत. चिंचोळी काळदात येथे 1 ते 23 जुलै रोजी लाभार्थींना चारा वाटप करण्यात आले. ते चारा वाटप या गावातील लोकांना करण्यात आले नाही अशा प्रकारचे पत्रच गावातील लोकांनी मला दिलेले आहे. मी लाल दिव्याच्या गाडीतून गेलो होतो. त्यांना वाटले की, मी सरकारचा प्रतिनिधी आहे. मी त्यांना सांगितले की, मी विरोधी पक्ष नेता आहे. ते मलाच निवेदन देत होते. गावकरी म्हणाले आमची ही तक्रार आहे. ती आपण घ्यावी. नागलवाडी येथील 25 व्यक्ती त्या गावच्या नसल्याने बोगस जनावरांची नोंद करण्यात आली असून प्रत्यक्ष गावातील खऱ्या लाभार्थ्यांना केवळ 4 दिवस चारा वाटप करण्यात येत आहे. बाकी सगळे वाटप बोगस आहे.

तरडगावमध्ये देखील हीच परिस्थिती आहे. आता मला देखील लाज वाटते. चौकशीचे आदेश देऊन सुद्धा चौकशी होत नाही. भ्रष्टाचाराला संरक्षण द्यायचे असेल तर आपण हा फार्स कशासाठी करीत आहात ? कशाला नाटक करता ? आम्ही आमच्या कार्यकर्त्यांना चरण्यासाठी लालू यादवांचे शिष्यत्व दिले असून चारा खा आणि पैसे कमवा अशी योजना सुरू करीत आहोत असे जाहीर करावे. अशी योजना आपण अधिकृत सुरू केल्याने काहीच बिघडत नाही. तहसीलदार, एसडीओ, पुनर्वसन अधिकारी यांच्या विरूद्ध कोणतीच कारवाई होत नाही. या सभागृहाने माननीय श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या पासून श्री.शरद पवार यांच्या पर्यंत फार मोठ मोठी नेते मंडळी पाहिली आहे. या सभागृहात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होत नसेल तर हा प्रश्न मांडावयचा की नाही हाच मुद्दा आमच्या समोर उभा राहतो.

कालच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाद्वारे 400 पेक्षा अधिक चारा छावण्यांमधून 3 लक्ष 39 हजार 799 जनावरांना चारा देण्याची व्यवस्था केली आहे असे सांगितले आहे. परंतु,प्रत्यक्षात दुष्काळी जिल्ह्यामध्ये कमीतकमी 30 लक्ष एवढे पशुधन आहे. आपण सर्वांना चारा, देणार आहात काय ? दाह पैकी एका जनावराची व्यवस्था आपण या माध्यमातून करीत आहात हे त्यातील वास्तव आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

पाण्याचा टँकर आल्यानंतर काय चित्र दिसते ते आपणास सांगतो. मी उस्मानाबाद जिल्ह्यातील बाभळी गावात गेलो होतो. येथील चित्र भयानक आहे. टँकर येण्याची वेळ आली की, गावाच्या वेशी बाहेर सर्व पुरूष मंडळी पाईप घेऊन उभे राहतात. टँकर आल्यानंतर त्यावर उड्या मारतात व वर जाऊन बसतात. तो टँकर गावातील मध्यभागी महिला जेथे पाण्यासाठी उभ्या असतात तेथे येतो. त्यावेळी भरपूर धावपळ होते. चेंगराचेंगरी होते. आपल्या घरातील पुरूष टँकरवर कुठे आहे हे ती महिला बघते. त्यावेळी त्या महिलेचे लक्ष टँकरच्या टायरकडे देखील नसते. ती महिला आपल्या हंड्यात पाणी भरण्यासाठी हंडा मागे-पुढे करीत असते. तो पर्यंत ती गाडी थांबते. त्यानंतर लगेच वरून पाईप येतो आणि भराभर पाणी भरले जाते. त्यावेळी तेथे 2-3 म्हातारा-म्हातारी उभी होती. त्यांना मी विचारले की, आपण पाणी भरत नाही का ? ते म्हणाले की, आमच्याकडे पाईपच नाही. त्यांचे एक भांडे भरून झाल्यानंतर दुसरे भांडे लागायच्या मध्ये जो दोन सेकंदाचा वेळ मिळतो त्यामध्ये आम्ही आमचे भांडे सरकवतो. हे वास्तव मी डोळ्याने पाहिले आहे. आपण टँकर दिल्याने पाणी मिळते असे होत नाही. आज दुष्काळी भागात किती भयानक परिस्थिती आहे हे टँकर आल्यानंतर पहायला मिळते.

2013 चा दुष्काळ हा इतिहासामध्ये पुढे जाऊन कलंक म्हणून लिहिला जाऊ नये असे प्रामाणिकपणे मला वाटते म्हणून ह्या सर्व गोष्टी मी सांगत आहे. त्यावेळी कुणाच्या सरकारचा दुष्काळ होता असे लोक म्हणणार नाही. त्यावेळी दुष्काळ होता पण राजकीय व्यवस्थेने नीट उपाययोजना केली नाही असे म्हणून आपल्या नावावर कलंक लावतील. तेथे फिरल्यानंतर जे वास्तव दिसले ते मी येथे सांगत आहे. टँकर भरण्यासाठी किती वेळ लागतो हे मी ड्रायव्हरला विचारले असता तो म्हणाला की, दीड तास लागतो व रिकामा करण्यासाठी किती वेळ लागतो असे विचारले असता तो म्हणाला की, 7 ते 10 मिनिटात टँकर रिकामा होतो. एवढा स्पीड आहे. म्हणजे पाणी किती कमी येते ते बघा.

आज आपल्याकडे 2012 च्या जनगणनेची आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे सन 2002 च्या जनगणनेची लोकसंख्येची आकडेवारी गृहीत धरून गावांना पाणी पुरवठा करीत आहोत. त्यामुळे गावांना 15 दिवसांनी, 16 दिवसांनी पाणी जाणारच.

या नंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

मी आपणास गावांची नावे सांगतो. मी आपणास तेथे घेऊन जातो. प्रत्येक व्यक्तीला रोज 20 लीटर पाणी मिळायला पाहिजे तर ते का मिळत नाही ?... हा इतका लाईट विषय नाही. माणसे पाण्यासाठी कशी मरतात हे पाहून आपण याच राजकीय व्यवस्थेमध्ये काम करीत आहोत याची आम्हाला लाज वाटते.

सभापती महोदय, दुष्काळी भागात टँकर पुरविण्यात येतात त्याची एक गोष्ट येथे सांगतो. औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.सुखदेव बनकर यांनी अचानक पैठण तालुक्यातील दुष्काळी गावात दौरा केला. रांजणगाव येथे टँकर सुरु असल्याचे त्यांना समजले. रांजणगावला पाणी पुरवठा करणाऱ्या सार्वजनिक विहिरीवर मुबलक पाणी असल्याचे समजल्यावर त्यांना धक्काच बसला. विहीर तर पाण्याने भरलेली आहे आणि त्या ठिकाणी टँकर सुरु होता. मी आपणास अधिकाऱ्यांची नावे सांगतो. मी गावा गावामध्ये फिरलो आहे. जी वस्तुस्थिती मला दिसली ती मी येथे मांडत आहे. विहिरीला मुबलक पाणी असताना टँकर कसा सुरु करण्यात आला असा प्रश्न मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विचारला. टँकरचा प्रस्ताव देणाऱ्यापासून तो मंजूर करण्या अधिकाऱ्यापर्यंत सर्वांची खातेनिहाय चौकशी करणार असल्याचे श्री.बनकर यांनी सांगितले. पाण्याची गरज नसताना टँकर मंजूर करणाऱ्या बीडीओ आणि तहसीलदारावर मागील दीड महिन्यात कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. कारवाई करण्यासाठी दीड महिना लागतो काय ? ही चौकशी कोणी थांबविली ? यामागे कोण होते हे आपण शोधून काढावे.

सभापती महोदय, शासकीय टँकरमध्ये भरण्यात येणारे डिझेल हा प्रकार तर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी तपासला पाहिजे. सरकारी टँकरने पाणी पुरवठा करायचा असेल तर 150 लीटर डिझेल आणि एक लीटर ऑईल लागते तर त्याच गावामध्ये खाजगी टँकरने पाणी पुरवठा करायचा असेल तर 60 लीटर डिझेल लागते. दोन्ही टँकरची पाणी आणण्याची साईट एकच आहे. कमी -जास्त अंतर नाही. परंतु सरकारी टँकर असेल तर 150 लीटर डिझेल लागते. सरकार पाणी घालून डिझेल देते काय ? आष्टी तालुक्यातील एकाच पेट्रोल पंपावर सरकारी टँकर आणि खाजगी टँकरमध्ये उधारीवर डिझेल भरले जाते. माझी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण बीडीओ कार्यालयातील सर्व रेकॉर्ड मागवून ते तपासून घ्यावेत. किती खायचे यालाही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

काही प्रमाण असते. डिझेलची बिल तयार करुन डिझेल न भरता पैसे उचलले जात आहेत. पेट्रोल पंपावर जेवढे डिझेल भरले असेल तेवढे डिझेल पंपावर असले पाहिजे.

सभापती महोदय, मागील तीन महिन्यात अमुक एका पेट्रोल पंपावर किती डिझेलचा पुरवठा केला याची माहिती मी एका ऑईल कंपनीकडून घेतली.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्या कंपन्यांनी मला आकडेवारी दिली. माझ्या निदर्शनास आले की, शासकीय टँकरच्या नावाखाली उचललेले बिल मोठ्या रकमेचे आहे. शासकीय यंत्रणांना पुरविलेल्या इंधनापैकी अर्धे इंधन सुध्दा त्या पेट्रोल पंपावर आले नव्हते. या सरकारकडून वारंवार सांगितले जाते की, आम्ही गरिबांना मदत करतो. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, सरकारची मदत प्रत्यक्षात त्यांच्यापर्यंत पोहोचते काय ? आष्टी येथील हा सर्व प्रकार आहे. आष्टी येथील पेट्रोल पंपाचा मालक कोण आहे, त्याला कोणाच्या काळात पेट्रोल पंप मिळाला हे सुध्दा मी सांगू शकतो. महोदय, सीसीटी आणि व्हॅटचा नंबर नसलेली बिले आहेत. ती सर्व कागदपत्रे मी घेऊन आलो.

महोदय, मी दौऱ्यानिमित्त एका शाळेमध्ये गेलो होतो. तेथील मुले आरडोओरड करुन शिक्षकांना सांगत होती की, आम्हाला घरी जाऊ द्या. मुलांचे म्हणणे होते की, आम्हाला छावणीवर जाऊन बसले पाहिजे, नाही तर आम्हाला वडील मारतील. महोदय, या मुळे शाळा लवकर सोडावी लागत आहे. शाळेतील मुलांना सकाळी 11 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत छावणीत जाऊन बसावे लागते, अशी स्थिती आज महाराष्ट्रात आहे. हा महाराष्ट्र फुले-शाहू-आंबेडकरांचा आहे असे आपण वारंवार सांगता. मी तर म्हणेन की, छावणीवर जाऊन बसणाऱ्यांना दावणीवर पैसा द्या. परंतु शेतकरी दारु पितात या नावाखाली आपण दावणीवर पैसा देत नाही. दावणीवर पैस दिले तर लोक आपापली व्यवस्था करतील. आज मुलांना आपले शिक्षण सोडून छावणीवर धुळीत जाऊन बसावे लागत आहे. शिवाय त्यांच्या आरोग्याचा विषय पुढचा आहे. या सर्व बाबी मी वर्तमानपत्रात किंवा टी.व्ही.चॅनेल्सवर पाहिल्या नसून, प्रत्यक्षात अनुभवल्या आहेत.

महोदय, बागांना मदत करण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली. परंतु ही घोषणा अगोदर केली असती तर निदान बागा वाचल्या असत्या. बागा जळून गेल्यानंतर सरकारने बागांना कर्ज देण्याची घोषणा केली. मला वाटते सरकारमध्ये नियोजनाचा अभाव आहे. शेतकऱ्यांच्या बागा जगाव्यात असे सरकारला जर प्रामाणिकपणे वाटत होते तर त्यांनी अगोदरच शेतकऱ्यांना कर्ज देण्याची घोषणा करावयास हवी होती. आज पाणी उपलब्ध नसल्यामुळे संपूर्ण बागा जळून गेल्या आहेत. सांगलीमध्ये 10,314 हेक्टर, नगरमध्ये 21 हजार हेक्टर, जालन्यात 27 हजार हेक्टर, उस्मानाबादमध्ये 10 हजार हेक्टर बागा जळून गेल्या आहेत. वेळ निघून गेल्यानंतर बाग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

उत्पादकांना मदत करणे म्हणजे पेशंट मेल्यानंतर औषधे पोहोचविण्याचा प्रकार आहे. वेळ निघून गेल्यानंतर मदत केल्यामुळे खरोखरच बाग उत्पादकांना आधार मिळेल काय या बाबत विचार केला पाहिजे.

महोदय, शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील संपूर्ण पीक वाया गेले. शेतकरी रब्बी मोसमात थोड्याफार प्रमाणात उत्पादन घेण्याचा प्रयत्न असताना पाणी उपलब्ध नसल्यामुळे खरीप पिकांबरोबरच त्याचे रब्बी पीक सुध्दा वाया गेले. त्यामुळे ज्वारीची घट 47 टक्के, बाजरीची घट 56 टक्के, मूगाची घट 34 टक्के, उडीदाची घट 35 टक्के आणि भुईमुगाची घट 43 टक्के झाली.

महोदय, जालना जिल्हा हा मोसंबीचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या वर्षी जालना जिल्ह्यातील मोसंबीच्या बागा जवळजवळ संपूर्णत: नष्ट झाल्या आहेत. मी तर म्हणेन की, या पुढे जालना जिल्हा हा मोसंबीचा जिल्हा आहे हे विसरावयास पाहिजे. काकडे कंडारी गावातील शेतकरी श्री.श्रीकृष्ण काकडे याने मोसंबीच्या बागेसाठी विहीर खणण्याचे ठरविल होते. गेल्या वर्षी एप्रिल-मे महिन्यामध्ये पाण्याची अडचण जाणवल्यामुळे त्याने टँकरने पाणी देऊन मोसंबीची झाडे कशीबशी वाचविली. त्याच्या वडिलाने 6 वर्षांपूर्वी मोसंबीची बाग लावली होती. एक एकर मोसंबी पिकाच्या उत्पन्नात श्रीकृष्ण काकडे याचे लग्न उरकले होते. शिवाय घरात दोन समारंभ पार पडले. एवढेच नव्हे तर घरात मोटर सायकल आली. त्यांनी सांगितले की, एका एकरात आम्ही इतके उत्पन्न घेतले होते. त्या काळात फळबागाचा त्यांना खरोखरच मोठा आधार होता. हे खरे आहे की, फळबागांना शेतकरी जीवापाड जपतात. परंतु पावसाने दगा दिल्यामळे त्यांची बाग पूर्णपणे करपली.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. विनोद तावडे .....

तुळजापूर तालुक्यातील कसई येथील शेतकऱ्यांची 4 एकर डाळिंबाची बाग संपूर्ण नष्ट झाली. त्यांचा पंचनामा झालाच नाही. मी सगळी नावे घेणार नाही. धाराशीवमधील मौजे आंबोवाडी येथीली श्री. वसंत गोडसे या शेतकऱ्याने आठ वर्षापूर्वी लावलेली 1 हेक्टर द्राक्षाची बाग पूर्णपणे नष्ट झाली. त्यांना नुकसानभरपाई मिळालेली नाही. पंचनामा झालेला नाही. मघाशी मी पाण्याच्या बाबतीत उल्लेख केला त्या गावाचे नाव बेंबळी आहे. बुलढाणा जिल्ह्यातील नांदूरा तालुक्यातील पोटळी या 100 टक्के शेतीवर अवलंबून असलेल्या गावचा कांदा प्रसिध्द आहे. या गावात सुमारे अडीच हजार जनावरे आहेत. शेतकऱ्यांना नाईलाजाने 2 किलोमीटर शेतात दूर जाऊन पाणी आणावे लागत आहे. येथील जुन्या विहिरीतील सांडपाणीयुक्त दूषित पाण्याचे सेवन केल्यामुळे त्यांच्या मुलांना कर्करोग तसेच किडनीच्या आजाराने पछाडले आहे असे तेथील सरकारी डॉक्टर सांगतो.

या दुष्काळाचे जे दीर्घकालीन परिणाम असतात त्यामध्ये पारंपारिक बियाणांचा नाश झाला आहे. सध्या मद्रास-तामिळनाडूमधून बोअरवेल खणणारे मोठ्या प्रमाणावर येत आहेत आणि मोठ्या प्रमाणावर बोअर खणण्याचे काम चालू आहे. कारण आपले बिल अजून थांबले आहे. ही तत्कालीन गरज आहे हे समजू शकतो. पण यामुळे महाराष्ट्राच्या जमिनीची चाळणी होणार आहे. चाळणी झालेलीच आहे आणि हे कोणी थांबवू शकत नाही. दुष्काळाचे राजकारण करु नये असे आवाहन आदरणीय श्री. पवार साहेबांनी केले आणि आम्ही ते मानतो. कारण त्यांचा तो हक्क आहे. तिलारी भूकंपाच्या वेळी स्वत: त्या ठिकाणी मुक्काम ठोकून त्यांनी काम केले. राजकारण कोण करीत आहे असा खरोखरच मला प्रश्न पडला.

सभापती महोदय, मराठवाड्यातील दुष्काळाच्या पाहणीकरिता केंद्रीय कृषी मंत्री गेले असता दुष्काळाच्या मदतीसाठी राज्याने प्रस्तावच पाठविला नाही असे त्यांनी सांगितले. थोड्याच वेळात चॅनेलवाल्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांचे विधान दाखविले की, आम्ही प्रस्ताव आधीच पाठविलेला आहे. कोणाचे खरे आहे हे आम्हाला काहीच कळत नाही. माहिती नाही असे जर म्हटले तर माहिती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

नाही असे असूच शकत नाही आणि माहीत असताना असे ते बोलणार सुध्दा नाहीत. यामध्ये खरे काय आहे ते सभागृहाला कळले पाहिजे. मिरज पूर्वेचा बोसा साठवण तलाव आहे. मघाशी मी या बाबत उल्लेख केला. राजकारण आम्ही करत नाही. आबा असे म्हणाले की, डॉ. पतंगराव कदम यांनी त्यांच्या केबिनमध्ये बोलविलेल्या बैठकीला येणार नाही. सिनियॉरिटीचा क्रम काय आहे तो एकदा आम्हाला सांगा. मिरजेच्या पाण्याचा प्रश्न आहे. त्याबाबत त्या ठिकाणी उपोषण झाले. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या बाबतीत हस्तक्षेप करुन त्या संदर्भात बैठक घ्या आणि हा विषय सोडवा असे सांगितले. त्याप्रमाणे बैठक घेण्याचे ठरले.

सभापती महोदय, रेल्वेने पाणीपुरवठा कसा करणार ? मी नियोजनाचा अभाव म्हणतो तो हा आहे. बुलढाणा, बीड या दोन दुष्काळग्रस्त जिल्ह्यात रेल्वे जात नाही. अशा ठिकाणी पाणी पुरवठा कसा करणार ? रेल्वेकडून आपल्याला एक पत्र आले आहे त्यात असे म्हटले आहे की, मागणी केल्यानंतर 60 दिवसात पाणी पुरवठा करण्यात येईल. रेल्वे प्रशासनाने पाठविलेल्या त्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे. मागणी केल्यानंतर 60 दिवसाने आम्ही तुम्हाला टँकर पुरवू, वेळेत कळवा, पाणी कोठून उचलावयाचे ते कळवा असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. असे जे सविस्तर पत्र रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी लिहिले आहे ते माझ्याकडे आहे. पण त्याबाबत शासनाने त्यांना काही कळविले नाही. ते म्हणतात की, अभी कुछ आया नही सर. I have not got a single letter from the Government. म्हणजे बहुतेक ज्या ठिकाणी रेल्वे रुळ नाहीत त्या ठिकाणी ते टाकणार आणि पाणी पाठविणार असे शासनाचे नियोजन दिसते. आपण याचा आराखडाच तयार केलेला नाही. गावामध्ये पिण्यासाठी पाणी नाही. पण त्या ठिकाणी बिस्लेरीच्या कारखान्यांना कोठून पाणी मिळते याचे सुध्दा नमुने आहेत. ज्या शहराचा संपूर्ण पाणीपुरवठा टँकरवर चालतो त्या ठिकाणी प्लास्टीकच्या बाटलीतून पाणी देण्याचे 22 उद्योग उभे राहिले. हा पाणी उद्योग एवढा कसा बहरतो ? 20 लीटर पाण्याच्या बाटल्या दमण, हैद्राबाद येथून आणल्या जातात.

श्री. अजित पवार : त्या शहराचे नाव सांगावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : मी आपल्याला पत्र देतो. ते पाणी भरुन वाटले जाते असे यामध्ये म्हटले आहे. काही सन्माननीय सदस्य जालन्याचा उल्लेख करीत आहेत. त्यांचे म्हणणे खरे आहे. यामध्ये जालना आणि आणखी एक जिल्हा असेल. सरासरी 1 लिटर शुद्ध बाटलीबंद पाण्यासाठी अडीच लिटर पाणी लागते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

उद्योजकांनी विहिरी खणल्या, बोअर घेतले आहेत.

औरंगाबाद जिल्ह्यातील एमआयडीसीमधील पाण्याचे वाटप कसे होत आहे ते सांगतो. जालना जिल्ह्याची औरंगाबाद जिल्ह्यासारखी परिस्थिती झालेली आहे. औषध कंपन्या, ॲटोमोबाईल कंपन्या, बिअर तयार करणाऱ्या कंपन्यांना देण्यात येणाऱ्या पाण्यात कपात करण्यात आली आहे याची मला माहिती मिळालेली आहे. यासंबंधी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केल्यानंतर जी माहिती समोर आली आहे ती मी या ठिकाणी सांगतो. बजाज ॲटोमोबाईल कंपनीला जानेवारी, 2012 मध्ये 89 हजार लिटर पाणी दिले होते आता ते 45 हजार लिटरवर आले आहे. लिलासन्स इंडस्ट्रीज या कंपनीला 9 हजार लिटर पाणी दिले होते आता 7 हजार लिटर दिले जात आहे. अभिजय इंजिनिअरिंग कंपनीला 121 हजार लिटर पाणी दिले होते आता 101 हजार लिटर दिले जात आहे. बी.डी.ए.लिमिटेड, चिखलठाणा या कंपनीचे पाणी 3 हजार लिटरवरुन 1 हजार लिटरवर आले आहे. शेतकरी बळीराजा शुगर लिमिटेडचे 60 हजार लिटरवरुन 33 हजार लिटरवर आले आहे. ज्या कंपन्यांचा पाणी पुरवठा वाढविला आहे त्यांची नावे मी सांगतो. स्क्रोल ब्रेव्हरिज कंपनीचे 25 हजार लिटरवरुन 28 हजार लिटर झाले आहे. मिलेनियम बिअर इंडस्ट्रीज कंपनीचे पाणी 12 हजार लिटरवरुन 22 हजार लिटर झाले आहे. औरंगाबाद ब्रेव्हरिज कंपनीचे पाणी 14 हजार 3 लिटर होते ते 14621 लिटर झाले आहे. फोस्टर इंडिया कंपनीचे पाणी 8887 लिटर होते ते 10 हजार लिटर झाले आहे. इंडो-युरोपीयन ब्रेव्हरिज कंपनीचे पाणी 2,521 लिटर होते ते 4701 झाले आहे. म्हणजे दुष्काळी भागातील जनतेने दुष्काळ विसरला पाहिजे. बजाज ऑटोमोबाईल सारख्या कंपन्यांचे पाणी कमी करण्यात आले आणि या सर्व दारुच्या कंपन्यांचे पाणी वाढविले आहे. बिअर व औषधे यापैकी कोणती गोष्ट जीवनावश्यक आहे ? ते एकदा सरकारने स्पष्ट केले पाहिजे.

सभापती महोदय, मी जाता जाता एवढेच सांगेन की, मुख्यमंत्री सहायता निधी हा सर्वसाधारण निधी आहे. या निधीच्या संदर्भात मला जो जो भेटतो तो असे सांगत असतो की, आम्ही मुख्यमंत्री सहायता निधीसाठी फंड देऊ इच्छितो, परंतु यासाठी स्वतंत्र अकाऊंट उघडले

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ MMP/ D/

श्री.विनोद तावडे.....

गेले पाहिजे. या फंडाची माहिती नेटवर टाकली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री हे नेटसॅवी आहेत. त्यामुळे आलेला पैसा या स्वतंत्र अकाऊंटमध्ये जमा झाला तर अधिक लोक मदत करण्यासाठी पुढे येतील.

काही मंत्री महोदयांनी दुष्काळ मदत निधीसाठी शासनाकडे धनादेश जमा केले आहेत. त्याच्या प्रसिध्दीसाठी कॅमेऱ्यांसह सर्व जय्यत तयारी करण्यात आल्याचे दिसून आलेले आहे. मी देखील दुष्काळ मदत निधीसाठी 29 ऑगस्टला धनादेश दिला होता. परंतु मी त्याची बातमी केली नव्हती. माझा तो चेक परत आला. चेक परत करणाऱ्या इसमाने मला असे सांगितले की, सगळयांकडून धनादेश आल्यावर तुम्ही तुमचा धनादेश द्यावा. मी त्यांना असे विचारले की, माझा धनादेश परत का करण्यात आला. त्यावर ते मला म्हणाले की, फक्त तुमच्याकडूनच धनादेश आला आहे. त्यामुळे फक्त तुम्हीच धनादेश दिला आहे असे दिसेल. त्यामुळे सगळयांचे धनादेश एकत्र करु. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.एकनाथराव खडसे यांनीही धनादेश दिला होता. परंतु मंत्री महोदय श्री.आर.आर.पाटील यांच्याकडून प्रसिध्दी कशी मिळवावयाची याबाबत सर्व मंत्री महोदयांनी त्यांच्याकडे शिकवणी लावावी. आम्ही मात्र प्रसिध्दीपासून लांब राहिलो. आम्हाला या गोष्टीतून प्रसिध्दी मिळविण्याची आवश्यकता नाही, कारण आम्हाला सार्वजनिक कामातून प्रसिध्दी मिळते. (अडथळा)

मागील वेळी आम्ही असे म्हटले होते की, आता दुष्काळामुळे अनेक तलावातील गाळ काढण्याची सुवर्णसंधी मिळाली असल्यामुळे त्यातील गाळ उपसण्यात यावा. रोजगार हमी योजनेच्या निकषानुसार गाळ काढण्याच्या कामासाठी मजुरांना 50 रुपये सुध्दा मजुरी मिळत नाही. त्यामुळे गाळ काढण्याच्या कामावर कोणीही येण्यास तयार नाही. अशा परिस्थितीत शासनाने सध्याचे निकष बदलले पाहिजेत.

केंद्र सरकारकडून ज्या कामासाठी निधी येतो तो त्याच कामावर खर्च होत नाही. ही बाब महालेखापरीक्षकांच्या निदर्शनास आल्यानंतर केंद्रीय वित्त मंत्री मा.श्री.चिदंबरम यांनी शासनाचे कान ओढले.

यानंतर श्री.शिगम....

अशोधित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ D/ D/ MMP/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:30

श्री. विनोद तावडे...

केन्द्राने दिलेला पैसा निकषाप्रमाणे खर्च केला पाहिजे. अन्यथा ऑडिटमध्ये आक्षेप घेतले जातात. जो निधी बागायती पिकांसाठी मंजूर करण्यात आला तो खर्च झाला नाही. निधी खर्च होत नसल्यामुळे केन्द्राकडून राज्याला फटका बसतो. सभापती महोदय, या दुष्काळामध्ये काही गोष्टी आग्रहाने केल्या पाहिजेत. गावनिहाय चारा छावण्या मंजूर करण्यात आल्या असल्यातरी शेतक-यांना जनावरनिहाय अनुदान दिले गेले पाहिजे. यामध्ये अडचणी येत असतीलही. चार चांगल्या गोष्टी होत असताना एखादी वाईटही होते. पण आज या दुष्काळाचा जो ताण शासनावर पडलेला आहे तो तरी जनावरनिहाय अनुदान दिल्यामुळे कमी होऊ शकेल. शासनाने फळबागांच्या नुकसानीबाबत अनुदान मंजूर केले. हे अनुदान अद्याप शेतक-यांपर्यंत पोहोचलेले नाही. त्यामुळे बागांचे संरक्षण करणे शेतक-यांना शक्य होत नाही. तेव्हा फळबागांच्या नुकसानी बाबतचे अनुदान शेतक-यांना 10 दिवसाच्या आत दिले गेले पाहिजे.

सभापती महोदय, नरेगा योजनेअंतर्गत जॉब कार्डाचे नूतनीकरण करण्यासाठी विशेष मोहीम राबविली पाहिजे. बँकेमध्ये किंवा पोस्टामध्ये नोंदणी करण्यासाठी केवळ एक क्लार्क असतो. आष्टी तालुक्यामध्ये 30 हजारापेक्षा जास्त मजुरांची नोंदणी झालेली नाही. मंत्री महोदय श्री. जयदत्त क्षीरसागर यांच्या बीड जिल्ह्यामध्ये 5 हजार पेक्षाही जास्त नोंदणी झाली नाही. अर्ज पडून आहेत. (अडथळा).. जॉबकार्डासाठी बँकेत किंवा पोस्टात खाते उघडावे लागते. दरवर्षी 50-60 लोक असायचे. पण आता. 800-900 लोकांची नोंदणी करण्यासाठी एकच क्लार्क आहे. काम केल्यानंतर कामाची तपासणी करण्यासाठी केवळ 3 कर्मचारी आहेत. हे तीन कर्मचारी 50-60 लोकांनी केलेल्या कामाची तपासणी वेळच्या वेळी करीत होते. परंतु आता 800-900 लोकांनी केलेल्या कामाची तपासणी वेळेत करणे शक्य होत नाही.

आता नरेगा योजनेबाबत लोक अशी घोषणा देतात की, "नरेगा करेगा तो भी मरेगा और नही करेगा तो भी मरेगा. कारण याचे ऑडिट फार कडक होते. झालेले काम तपासले जाते. 900 मजुरांची कामे तपासण्यासाठी 25-30 दिवस लागतात. मजूराला महिनाभर पैसे मिळत नसतील तर तो कामावर कशासाठीर जाईल ? आपण स्टाफ का वाढवत नाही ? जर राजकीय नेतृत्व तालुका आणि गावपातळीपर्यन्त गेले नाही तर अडचणीमधून मार्ग निघत नाही.

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

मी भोकरदनला जाऊन मंत्री महोदय श्री. राजेश टोपेना सांगितले की, जिल्हा कार्यालयामध्ये बसून बैठका न घेता खाली गावपातळीपर्यंत जाऊन वस्तुस्थिती समजून घ्या. भोकरदनला 3 मीटर x 30 इंच खोदण्याचे काम दिले जात होते. हे काम करीत असताना मध्ये खडक लागला तर त्या मजुराने नियमाप्रमाणे आणखी खोदायचे नाही. त्याने फक्त 30 मीटर x 20 इंच इतकेच खोदकाम करायचे. त्यावेळी त्या कामाचे त्याला 145 रु. ऐवजी 100 रुपये मिळत होते. मी त्या बाबतीत असे सुचविले की, मजुराला 4 मीटर x 30 इंच खोदकाम द्यायचे, त्याने 30 इंचापर्यंत खाली खोदकाम केले तर त्याने 3 मीटर खोदकाम करायचे आणि 20 इंच खोदकाम केले तर 4 मीटर खोदकाम करायचे. अशा प्रकारचा तोडगा ब्युरोक्रसी काढत नाही. राजकीय नेतृत्व खाली गेले तर असे मार्ग निघू शकतात. त्यानंतर भोकरदन आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये तो पॅटर्न सुरु झाला. आता लोकांना जी 165 रुपये मजुरी मिळते ती अत्यंत कमी आहे. ही मजुरी कमीत कमी 200 रुपये केली पाहिजे. जो मिस्त्रीच्या हाताखाली काम करतो त्याला 200 ते 225 रु. मजुरी मिळते आणि खोदकाम करणा-या मजुराला 165 रु. मजुरी मिळते.

राष्ट्रीय फलोत्पादन योजनेअंतर्गत अल्पभूधारक शेतक-यांना शेततळयाचा लाभ दिला जातो. परंतु अल्पभूधारकाची जमीन इतकी कमी असते की त्या जमिनीमध्ये तो शेततळे करु शकत नाही. म्हणून अल्पभूधारकाच्या बाबतीतील निकष थोडे शिथिल करणे आवश्यक आहे. अल्पभूधारक शेतक-यांमध्ये 10 एकरापर्यंतच्या शेतक-यांचा समावेश केला तर आपल्याला अधिक शेतक-यांना या योजनेअंतर्गत जगविता येईल. 2012 च्या पावसाळी अधिवेशनामध्ये दुष्काळ निर्मूलन उपाययोजनेअंतर्गत जाहीर केलेल्या 2600 कोटीच्या पॅकेजमध्ये शेततळयाकरिता प्लॅस्टिक आवरणासाठी 75 कोटी अनुदान मंजूर केले. हे अनुदान आजपर्यंत दिले गेले नाही. चालू वर्षी ठिबक सिंचनाची एकही योजना सुरु झाली नाही.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

महोदय, शेतकऱ्यांच्या घरात पैसे नाहीत म्हणून ते आपल्या मुलींची लग्ने पुढे ढकलतात. अशा वेळी लहान शेतकरी कुटुंबातील मुलीच्या लग्नासाठी काही तरी अनुदान देता येईल काय याचा शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी परवा सांगितले की, दुष्काळ निवारण करावयाचे नसून दुष्काळाचे निर्मूलन करावयाचे आहे. सध्या शॉर्ट टर्म उपायोजना करण्यात येत आहेत. पण प्रत्क्षातलाँग टर्न उपाययोजना करणे आवश्यक आहे. दुष्काळ निर्मूलनासाठी प्रत्येक अधिकाऱ्यास टार्गेट निश्चित करुन दिले पाहिजे. हिरवे बाजार पॅटर्न यशस्वी होऊ शकतो, शिरपूर पॅटर्न यशस्वी होऊ शकतो. तो पॅटर्न संपूर्ण राज्यातील गावांमध्ये का यशस्वी होऊ शकत नाही याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. प्रत्येक अधिकाऱ्यास काही टार्गेट ठरवून ठरवून दिले तर दुष्काळ निर्मूलनाचे काम यशस्वीपणे होऊ शकते. पाऊस पडला की आपण दुष्काळी परिस्थितीला विसरतो. पुढील वर्षी पुन्हा दुष्काळी परिस्थिती उद्भवली तर तात्पुरत्या स्वरुपाच्या उपाययोजना करतो. म्हणून प्रत्येक अधिकाऱ्याला टार्गेट ठरवून देऊन दुष्काळ निर्मूलनासाठी कायम स्वरुपी उपायोजना हाती घेण्यात याव्यात व दुष्काळग्रस्तांसाठी 9 हजार कोटीचे पॅकेज घोषित करावे अशी माझी विनंती आहे.

महोदय, पुर्नभरण उपाययोजनेसाठी 500 कोटी, विभागीय पाणी पुरवठा योजनेसाठी 500 कोटी रुपये, टँकर,विशेष दुरुस्ती, बोअरवेल यावरील खर्चासाठी 500 कोटी, पाणी पुरवठा योजनांच्या थकीत विद्युत बिलाविषयी तरतूद 100 कोटी, गुराच्या छावण्यांसाठी 1000 कोटी, सूक्ष्मसिंचनाकरिता आवश्यक असलेला निधी 1000 कोटी, फळबागांच्या पुनरुज्जीवनासाठी आवश्यक असलेला निधी प्रति हेक्टर 30 हजार या प्रमाणे यासाठी 500 कोटी, शेततळयांना प्लास्टीक कव्हर लावण्यासाठी आवश्यक असलेला निधी 500 कोटी, बागायतदारांना नुकसान भरपाई (8 हजार रुपये प्रति हेक्टर) 1 लाख 42 हजार,225 हेक्टरसाठी 1000 कोटी, चेक डॅम बांधण्यासाठी 500 कोटी, जलसंधारणाच्या इतर योजना राबविण्यासाठी 400 कोटी, शेततळी यासाठी 400 कोटी, सिमेंट नाला बांधाचे खोलीकरण व गाळ काढण्यासाठी 400 कोटी, पिकांचे नुकसानाकरिता द्यावयाची भरपाई यासाठी 2000 कोटी रुपये असे एकूण 9000 कोटी रुपयांचे पॅकेज शासनाने तातडीने घोषित केले तर हा दुष्काळ राज्याला कलंक होता असे आपल्या इतिहासात लिहिले

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

जाणार नाही.

महोदय,धाराशिव येथे शेतीतून उत्पन्न मिळाले नाही म्हणून काल एका शेतकऱ्याच्या मुलाने आत्महत्या केली. आपल्या मुलाने आत्महत्या केली म्हणून त्याच्या आईने आज आत्महत्या केली. मराठवाडयात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे लोण वाढलेले आहे. ते थांबविण्याची आवश्यकता आहे.

महोदय, मी सुरुवातीला जी कविता वाचून दाखविली, त्या कवितेचा शेवट करुन मी माझे भाषण संपविणार आहे.

" मी कुठल्या बँकेचा थकबाकीदार आहे, म्हणून काय मला विचारता ?
माती साठी मातीत गेली, इतकीच माझी थकबाकी पुरेशी नाही काय ?
की देऊ पुरावा मी जन्माला आलो तेव्हाच सावकाराच्या 7/12 वर मरुन गेला,
किती जणांच्या आत्महत्यांचे Fixed Deposit मी विदर्भाच्या खात्यावर भरुन आलो,
अरे ज्यांनी महापॅकेज दिले, त्यांनाच सांगता आले नाही, अगोदर दिलेले पॅकेज कुठे गेले
कळत नाही हे लोडशेडींग आहे की आत्महत्यांचे नवे शेडींग आहे,
विषाचा बाटलीत बुडाला बाप, आईचे विहिरीत जाणे पेंडींग आहे,
आता, नको कुठल्याच परतफेडीचा कडू घास, हवाय फक्त काहीही करुन मातीचा वास,
सरकार, द्यायचेच असेल तर मला झिजण्यासाठी थोडे चंदन द्या,
पण मी दिलेली जमीन Plase मला आंदण द्या.
पिकण्याआधीच झाडावरुन आम्ही का आणि कसे गळून पडलो?
याचा पंचनामा न करताच तुम्ही निघालात कोठे?
तुमच्या हरीतक्रांतीच्या महापुरात आमच्या आयुष्याचे झाड उभाळून मेले,
त्याची खरी नोंद लावा,
आता तुम्ही काहीही करा, माणसं पिकवा नाहीतर माती सुकवा
पण आधी आमच्या बापांच्या आत्महत्येचे बील चुकवा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

या वर्षी पडलेल्या भीषण दुष्काळा संदर्भात राज्य शासन काय उत्तर देणार आहे याची वाट राज्यातील 11 कोटी जनता पहात आहे. राज्यातील दुष्काळी भागातील जनतेच्या हिताचे उत्तर शासनाकडून देण्यात येईल अशी अपेक्षा करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.10 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी 1.39 ते 2.10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>मध्यंतरानंतर</u>

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये गणपूर्ती नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

उप सभापती : सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.20 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.12 ते 2.20 पर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

<u>हरकतीच्या मुद्याबाबत</u>

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्दा असा आहे की, आज सभागृहात दुष्काळावर चर्चा सुरु आहे. स्वत: माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेब सांगत आहे की, 1972 च्या दुष्काळापेक्षा या दुष्काळाची दाहकता गंभीर आहे. सभागृहात दुष्काळावर चर्चा सुरु असतांना सभागृहात मात्र मंत्र्यांचा दुष्काळ पडलेला आहे. या ठिकाणी मोजून दीड मंत्री बसलेले आहेत. क्रीडा मंत्र्यांचा दुष्काळाशी तसा काहीच संबंध नाही. राज्याच्या दृष्टीने दुष्काळ हा विषय अत्यंत गंभीर विषय आहे. दुष्काळामध्ये माणसे मरत आहेत, शेतकरी आत्महत्या करीत आहेत,जनावरे खाटीकखान्यात जात आहेत असे असतांना मात्र सभागृहात मंत्र्यांची उपस्थिती नाही ? त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, हे शासन दुष्काळाच्या संदर्भात किती उदासीन आहे हे महाराष्ट्रातील जनतेला कळू द्यावे यासाठी आपण दिवसभरासाठी सभागृहाचे कामकाज स्थगित करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या शासनाला दुष्काळाची जाणीव नाही. महाराष्ट्रात दुष्काळ पडलेला असतांना महाराष्ट्रातील दुष्काळग्रत जनतेवर मीठ चोळण्याचे काम या सभागृहात सुरु आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. आजच्या दुष्काळाच्या चर्चेत सात मंत्र्यांचा समावेश होतो असे असतांना सभागृहात केवळ दीड मंत्री उपस्थित राहतात हे काही योग्य नाही. त्यामुळे दिवसभरासाठी सभागृहाचे कामकाज तहकूब करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

उप सभापती :सभागृहात ज्यावेळी महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु असते त्यावेळी शानाचा प्रतिनिधी म्हणून एका तरी मंत्रिमहोदयाने सभागृहात उपस्थित रहाणे आवश्यक असते त्यामुळे यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी अशी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. सभागृहामध्ये दुष्काळावर चर्चा सुरु असतांना माननीय मंत्री महोदय कोठे आहेत याची माहिती घेतली असता आम्हाला असे आढळून आले की, खालच्या सभागृहात मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे खालचे सभागृह देखील बंद पडलेले आहे. याचा अर्थ मंत्रीमहोदय खालच्या सभागृहात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

नाही, वरच्या सभागृहात नाही म्हणजे या मंत्र्यांना नेमके झाले तरी काय ? या दुष्काळाच्या चर्चेमध्ये भाग घेण्याचा अधिकार सत्तारुढ पक्षाला नाही हे मी काल सुध्दा बोललो होतो. सर्व मंत्री सप्त तारांकित हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलेले आहेत अशी माहिती आम्हाला मिळाली आहे. दुष्काळाच्या चर्चेचे गांभीर्य सरकारला असले पाहिजे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण ऐकण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित होते हे पाहून आम्हाला आनंद वाटला परंतु नंतर चर्चा सुरु असतांना सभागृहात एकही मंत्री उपस्थित नसणे हे काही बरोबर नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, दुष्काळाच्या चर्चेसाठी सभागृहापुढील आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन दुष्काळाच्या विषयावर चर्चा सुरु करण्याचा निर्णय सर्वानुमते घेऊन दुष्काळाच्या चर्चेला सुरुवात झाली. दुष्काळाच्या चर्चेचा निर्णय झाल्यानंतर ज्यावेळेस माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणाला सुरुवात झाली त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उपमुख्य मंत्री देखील सभागृहात उपस्थित होते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

त्यांनी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे संपूर्ण भाषण ऐकले. तो पर्यंत ते बाहेर गेले नाहीत. या चर्चेमध्ये सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव देखील जोडला गेला आहे. त्यामुळे त्यावर चर्चा होणे हे सभागृहाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे, गरजेचे आहे. मंत्री मंडळातील एक मंत्री येथे उपस्थित आहे. ही चर्चा महत्त्वाची आहे. त्या चर्चेचे संपूर्णपणे रेकॉर्डींग होत आहे. मिनिटस तयार होणार आहेत. या चर्चेत सर्व सन्माननीय सदस्यांची सहभागी होण्याची इच्छा आहे. त्यामुळे माननीय सभापतींनी आज आणि उद्या यावर चर्चा होईल अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. एवढा वेळ माननीय सभापतींनी या विषयासाठी दिलेला असल्यामुळे हा वेळ आपण सत्कारणीच लावला पाहिजे. तेव्हा या सभागृहाचे कामकाज व्यवस्थित सुरू करावे अशी मी आपणास विनंती करतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कामकाज करण्याला माझी अडचण नाही. माननीय सभापतींनी दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊनच दोन दिवस चर्चेसाठी दिलेले आहेत. त्यासाठी मी त्यांचे सकाळी आभार मानले. वाटल्यास, आता पुन्हा आभार मानतो. पण माननीय सभापती महोदयांनी असे सांगितले नाही की, या दुष्काळाच्या विषयाशी संबंधित असे सात विभाग येतात त्या विभागाच्या माननीय मंत्र्यांनी सभागृहात बसू नये. दुष्काळावर चर्चा सुरू असताना माननीय मंत्र्यांनी ऑबेरॉय हॉटेलमध्ये जाऊन जेवण घ्यावे असे सांगितले नाही. माझा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावा. रेकॉर्डवर येण्यासाठी आपण चर्चा करत असाल तर ती चर्चा वांझोटी ठरेल. जर ही चर्चा वांझोटी ठरणार असेल तर मग त्याला काय अर्थ आहे ? येथे संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित असतील तर त्यांना आम्ही जाब विचारू शकतो.

उप सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.दीपक साळुंखे यांनी बोलण्यास सुरूवात करावी. त्यांनी दुष्काळावरच बोलावे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती
मु.शी.: राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती, या विषयावर सर्वश्री सर्वश्री.विनोद तावडे, दिपकराव साळुंखे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, रामदास कदम, जयंत पाटील, राणा जगजितसिंह पाटील, सुभाष चव्हाण, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, सतिश चव्हाण, एम.एम.शेख, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री.संदिप बाजोरिया, जयप्रकाश छाजेड, रामनाथ मोते, विनायक मेटे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंवतराव जाधव, किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.कपिल पाटील वि.प.स. यांचा२६० अन्वये प्रस्ताव.

श्री.दीपक साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, या राज्यात सातत्याने पावसाचे प्रमाण कमी होत आहे.

श्रीमती विद्या चव्हाण (बसून) : सभापती महोदय, ऑबेरॉय हॉटेलमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते गेले आहेत.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दुष्काळग्रस्त भागातील सिनिअर मोस्ट सदस्य भाषण करण्यास उभे आहेत. आपण त्यांचे म्हणणे ऐकून घेऊ या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ऑबेरॉय हॉटेलला कोण गेले आहेत अशी विचारणा येथे करण्यात आली आहे. तेथे फोटोग्राफर पाठविले आहेत. पण जर जास्त चर्चा केली तर ते आम्हाला रेकॉर्डवर आणावे लागेल. त्यामुळे सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य शांत राहिलेत तर बरे होईल.

श्री.दीपक साळुंखे : सभापती महोदय, या राज्यामध्ये गेल्या दोन वर्षापासून पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे राज्यातील बहुतांशी भागामध्ये खरीप व रब्बीच्या पेरण्या झालेल्या नाहीत. उन्हाळ्याची तीव्रता वाढत चालली आहे. पर्यावरणाचा बिघडलेला समतोल, अवकाशात निर्माण झालेले ओझोन वायुचे चिलखत आणि त्यामुळे कमी झालेले पर्जन्यमान या सर्व अस्मानी संकटाच्या कचाट्यातून जेवढा पडेल तेवढा पाऊस पदरात पाडून घ्यायचा असेल तर पडलेल्या पावसाचा प्रत्येक थेंब-न-थेंब अडवला पाहिजे. नाहीतर आपल्या महाराष्ट्रात सोमालिया पेक्षा भयानक परिस्थिती निर्माण होईल. दुष्काळाला तोंड देण्यासाठी सर्व पक्षांची आणि जनतेची सरकारला

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपक साळुंके .....

सहकार्य करण्याची भूमिका आहे. दुष्काळाचे कायमचे निर्मूलन करायचे असेल तर त्याची जबाबदारी सर्वांवरच आहे असे मला वाटते.

पाणी म्हणजे जीवन आहे. य विषयाकडे अत्यंत गांभीर्यपूर्वक विचार करण्याची वेळ आली आहे. आता प्रत्येक पाण्याचा थेंब अडविला पाहिजे अशा प्रकारचे नियोजन आपल्याला करावे लागणा आहे.

1962 साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्यावेळी प्रत्येक खात्यावर सरकारने आक्रमण निधी लावून पैसे गोळा केले. एस.टी.ची तिकिटे, सिनेमाची तिकिटे, इत्यादीवर सरकारने आक्रमण कर लावला होता.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपक साळुंखे.....

माझी सरकारला विनंती आहे की, अशा भयानक दुष्काळी परिस्थितीमध्ये "जलनीती कर" वेगवेगळ्या ठिकाणी लावून त्यातून कोटयवधी रुपये सरकारकडे कसे जमा होतील याचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, या दुष्काळी परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातील खेडी ओस पडू लागली आहेत. टँकर मंजूर होऊनही गावाला आठ-दहा दिवस पाणी मिळत नाही. पाणी मिळेल याची शाश्वती नसल्यामुळे खेड्यापाड्यातील माणसे शहराकडे स्थलांतर करु लागली आहेत. रोजगारासाठी माणसे मिळत नसल्यामुळे ग्रामीण भागातून जे थोडेफार उत्पादन येण्याची जी साधने आहेत ती दुष्काळामुळे बंद होऊ लागली आहेत.

सभापती महोदय, दुष्काळ निवारणासाठी सरकारने काहीच केले नाही असे माझ्या सारखा कार्यकर्ता म्हणणार नाही. कारण जत आणि कवठेमहांकाळ या दुष्काळी तालुक्याला मागील 50 वर्षात पाणी मिळत नव्हते म्हणून म्हैसाळ धरणाचे पाणी गिरणा तलावात सोडून जत सारखा दुष्काळी भाग टँकर मुक्त करण्याचे नियोजन केले आहे. खेडेगावातील माणसे खेडेगावातच रहावी असे आपणास वाटत असेल तर त्यासाठी शासनाने प्रथम पिण्याच्या पाण्याचे नियोजन केले पाहिजे.

सभापती महोदय, टँकरच्या बाबतीत परिस्थिती अतिशय गंभीर आहे. तेव्हा या बाबतीत सरकारने विशेष लक्ष घातले पाहिजे. त्याच बरोबर तेथील अधिकाऱ्यांमध्ये समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन 1972 च्या दुष्काळामध्ये ग्रामीण भागात पाझर तलाव घेण्यात आले होते. ते पाझर तलाव आता बुजले आहेत. त्यामध्ये पाणी साचत नाही. अशा पाझर तलावांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. रोजगार हमी योजनेच्या कामातून या पाझर तलावांतील गाळ काढला पाहिजे. तसेच काही पाझर तलावांचे पुनर्भरण करण्याचा उपक्रम शासनाने सुरु केला पाहिजे.

सभापती महोदय, काही ठिकाणी चारा छावण्यांच्या बाबतीत गैरसमजुतीचे चित्र असले तरी माझ्या मतदारसंघात चारा छावण्या सुरु केल्यामुळे जी जनावरे खाटकाकडे जात होती आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपक साळुंखे.....

जनावरे विकत घेण्यासाठी व्यापारी देखील येत नव्हते अशा भागात जनावरे सुरक्षित राहिली आहेत. परंतु चारा छावणीच्या बाबतीत राज्य सरकारने सुरुवातीला 80:40 चा रेशिओ ठेवला होता. आता तो 60:30 वर आणला गेला. ते प्रमाण थोडे विषम आहे असे माझ्या सारख्या कार्यकर्त्याला वाटते. हा रेशिओ 70:35 करावा अशी विनंती आहे. काही ठिकाणी चारा छावण्यांमध्ये टँकरने पाणी पुरवठा केला जातो परंतु त्यासाठी पैसे द्यावे लागतात.

सभापती महोदय, माझ्या तालुक्यामध्ये 93 चारा छावण्या काढण्यात आल्या असून त्यामध्ये 1 लाख 10 हजार जनावरे मागील वर्षाच्या मार्च महिन्यापासून आहेत. चारा छावण्यांसाठी दिला जाणारा निधी अपुरा पडत आहे. तेव्हा या गोष्टीकडे सरकारने लक्ष घालून वाढीव निधी द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, 1972 च्या दुष्काळामध्ये रोजगार हमीच्या माध्यमातून फळबागांचा मोठा कार्यक्रम राबविण्यात आला. त्यामुळे अनेक भागांमध्ये बागांचे प्रमाण वाढले. परंतु सततच्या दुष्काळामुळे आणि वारंवार पडणाऱ्या रोगामुळे त्या बागा उजाड झालेल्या आहेत. या बागांना टँकरने पाणी पुरवठा करुन सरकारने या बागा जगविल्या आहेत. तेव्हा टँकरसाठी सरकारने सबसिडी देण्याचा निर्णय घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकार आणि राज्य सरकारने एमआरईजीएसमध्ये काही ठराविक कामांचा समावेश केलेला आहे. या योजनेंतर्गत शेततळी सारखा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविला तर शेतकऱ्याला आपल्या शेततळयामध्ये किमान सहा महिने किंवा वर्षभर ड्रीप पध्दतीने चार-पाच एकर शेतीला पाणी देता येईल. अशा प्रकारचे काही प्रयोग आमच्या दुष्काळी भागामध्ये आम्ही केलेले आहेत. सबसिडीच्या माध्यमातून शेततळ्याचा कार्यक्रम राबविला तर शेतकऱ्यांना निश्चितपणे मदत होऊ शकेल.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिपकराव साळुंखे....

महोदय, सध्या माण पट्टयात पाण्याची पातळी खूप खाली गेली आहे. 700 ते 1200 फूट बोअर घेतला तरी शेवटी फुफाटाशिवाय दुसरे काहीच निघत नाही. अशी भयानक परिस्थिती त्या भागात निर्माण झाली आहे. शिवारातील पाणी शिवारात राहिले पाहिजे या साठी राज्य सरकारने सर्व निधी जलसंधारणाच्या कामांवर खर्च केला पाहिजे. अशा प्रकारे निधी खर्च करुन ती कामे उत्कृष्ट दर्जाची केली तर हा प्रश्न मार्गी लागेल.

महोदय, दुसरी बाब अशी की, दुष्काळी तालुक्यांमध्ये, जिल्ह्यांमध्ये अधिकाऱ्यांची कमतरता आहे. आमच्या भागात पाझर तलाव, नालाबंडींग, सिमेंट बंधाऱ्यांची कामे सुरु आहेत. ही कामे करण्यासाठी चार-पाच अधिकाऱ्यांची आवश्यकता असताना तेथे एकही अधिकारी नाही. या बाबत राज्य सरकारने गंभीर दखल घेऊन दुष्काळी भागात अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. ग्रामसेवक, तलाठी हे दुष्काळाशी निगडित काम करणारे आहेत. दुष्काळाच्या परिस्थितीत त्यांनी गावातच राहिले पाहिजे या बाबतचे आदेश वरिष्ठ पातळीवरुन देण्याची गरज आहे.

महोदय, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शिरपूर पॅटर्न पध्दतीचे बंधारे बांधण्याचा निर्णय घ्यावयास पाहिजे. आज शिरपूर पॅटर्न बंधाऱ्यांचा चांगला अनुभव आलेला आहे. शिरपूर पॅटर्न संपूर्ण राज्यात राबवावा अशा प्रकारचा तो महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देऊन, प्रत्येक गावात किमान 4 शिरपूर पॅटर्नचे बंधारे घेतले तर किमान पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटू शकतो. माझी विनंती आहे की, अशा प्रकारचे नियोजन या निमित्ताने झाले पाहिजे.

महोदय, सरकारची विसंगती या निमित्ताने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. सांगोला तालुक्यासह चार तालुक्यांसाठी टेंभू योजना करण्यात आली. गेल्या दोन वर्षांपासून आम्ही सांगोला तालुक्यातील टेंभू योजनेसाठी 110 कोटी रुपयांची मागणी करीत आहोत. जेणेकरुन ती रक्कम या योजनेवर खर्च केल्यानंतर सांगोला तालुक्यातील निम्मा भाग टँकरमुक्त होईल आणि इतर जिल्ह्यांना चारा पुरविता येईल. परंतु सरकारने या योजनेसाठी 110 कोटी न देता, दुष्काळी परिस्थितीवर 165 कोटी रुपये खर्च केले आहेत. चारा डेपोवर 50 कोटी रुपये, चारा छावण्यावर 108 कोटी रुपये, पाण्यावर 4 कोटी रुपये आणि रोजगार हमी योजनेच्या कामांवर 3.5 कोटी रुपये, अशा प्रकारे एकूण 165 कोटी रुपये खर्च केले आहेत. टेंभू योजनेसाठी 110 कोटी रुपये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिपकराव साळुंखे....

दिले असते तर किमान 25 गावे टँकर मुक्त आणि इतर ठिकाणी चारा पुरविण्याची क्षमता निर्माण झाली असती. आपल्याला दुष्काळाचे निर्मूलन करावयाचे आहे. या संदर्भात योग्य प्रकारे नियोजन केले तर दुष्काळाला सामारे गेल्यासारखे होईल.

महोदय, माझ्या भाषणाचा समारोप करताना एवढेच सांगू इच्छितो की, जर आपण वेळीच या दुष्काळाचे निर्मूलन केले नाही तर मंगल देशा, पवित्र देशा, जय जय महाराष्ट्र देशा !! असे म्हणण्या ऐवजी दुष्काळी देशा, दरिद्री देशा, महाराष्ट्र देशा !! असे म्हणण्याची वेळ येईल. त्यामुळे शासनाने दुष्काळाचा विषय गांभीर्याने घ्यावा असे मला वाटते.

महोदय, या प्रस्तावावर बोलताना मी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्या बाबत शासनाने नियोजन करुन, योग्य ते आदेश द्यावेत अशा प्रकारची विनंती करतो व येथेच थांबतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. दुष्काळ हा शब्द उच्चारल्यानंतर दुष्काळामधून भयसूचकता ध्वनित होते. दुष्काळ हा भयवर्धक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले दुष्काळावर बोलण्यासाठी उभे आहेत. या महाराष्ट्रामध्ये दुष्काळाच्या संदर्भात एका जिल्हाधिकाऱ्याच्या बदलीचे जे प्रकरण संपूर्ण महाराष्ट्रभर आणि देशभर गाजले आणि सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी शूरवीरासारखी त्यांची बाजू घेतली. ते प्रकरण या ठिकाणी आले पाहिजे असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

प्रा. सुरेश नवले : दुष्काळ हा अतिशय भयानक स्वरुपामध्ये महाराष्ट्रात आणि विशेषत: मराठवाड्यामध्ये आहे. गेली काही अधिवेशने दुष्काळाभोवती फिरत आहेत. पृथ्वी सूर्याभोवती फिरते. अधिवेशने दुष्काळाभोवती फिरत आहेत. अधिवेशनाभोवती दुष्काळ घोंगावत आहे. हे चित्र अतिशय विदारक आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये दुष्काळावर चर्चा झाली पण नागपूर अधिवेशनाच्या वेळी दुष्काळाची दाहकता कमी होती. तो थंडीचा काळ होता पण आज प्रचंड उन्हाळा आहे आणि दुष्काळाच्या प्रत्यक्ष झळा लोकांना बसत आहेत. सूर्यनारायणाने प्रत्यक्ष आग पेरण्यास सुरुवात केलेली आहे. माती प्रत्यक्ष भाजून निघालेली आहे. माणसे आणि जनावरे होरपळून निघतील की काय अशा प्रकारचे चित्र निर्माण झालेले आहे. जमीन भेगाळलेली आहे. भेगाळलेल्या जमिनीतून बाहेर पडणाऱ्या वाफा आणि उन्हाच्या झळा या दोन्हीचा परिणाम म्हणून मातीमधील जीवसृष्टी, जीवजंतू यांची जीवनसाखळी धोक्यात आलेली आहे. एकीकडे माणसांचे स्थलांतर होत आहे तर दुसरीकडे या जीवांचे स्थलांतर सुरु आहे. साप, गांडूळ, सापसुरळी यांनी पाण्याच्या दिशेने स्थलांतर करण्यास सुरुवात केलेली आहे. हे सर्व पश्चिम महाराष्ट्राच्या दिशेने निघालेले आहेत. कारण पाण्याचा स्त्रोत तिकडे आहे. विसव्याचे ठिकाण तिकडे आहे. मधमाशा, फूलपारखे, होले, कावळे, बगळे, साळुंक्या स्थलांतर करीत आहेत. चिमण्या तर संपलेल्याच आहेत. दुष्काळाचा परिणाम कोणाकोणावर होत आहे ? दुष्काळ हा फक्त माणसांवरच आक्रमण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

प्रा. सुरेश नवले ....

करीत आहे अशातील भाग नाही. दुष्काळामुळे संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात आलेली आहे. त्यामुळे ही जीवसृष्टी पाण्याच्या दिशेने दरपोच, दरमुक्काम करीत निघालेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

जान है तो जहान है, सर सलामत तो पगड़ी पचास. दुष्काळाचा विषय अतिशय गंभीर आहे. आज मराठवाड्याची माती पेटलेली आहे. मराठवाड्याच्या मातीचा पान्हा आटलेला आहे. पान्हा टाहो फोडतो आहे. कान्हा टाहो फोडतो आहे. परंतु काळ्या मातीच्या वात्सल्याचे पाण्यात रुपांतर होत नाही.

सभापती महोदय, मराठवाड्यातील एक काळ असा होता की, श्रावणाची एखादी सर पडल्यानंतर मातीचा सुगंध दरवळत असे. त्या सुगंधामुळे गरोदर मातांना माती खाण्याचे डोहाळे लागत असे. माझ्या लहानपणाची ही गोष्ट आहे. आता माती रसायनयुक्त झालेली आहे. मातीचा स्वाद संपलेला आहे. डोहाळे लागण्याचे चित्र नाही. या सगळया गोष्टींचा दुष्परिणाम होऊन माणसांचे जीवन धोक्यात आलेले आहे.

सभापती महोदय, आमच्या भागात परवा एक घडलेली घटना सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो. एका मुलाच्या आईने आपल्या मुलाला पोहरा घेऊन विहिरीतून पाणी शेंदून घेऊन ये असे सांगितले. मुलगा पाणी आणण्यासाठी विहिरीवर गेला. घरातून मुलगा विहिरीवर जाऊन अर्धा तास झाला, एक तास झाला तरी न आल्यामुळे आईला चिंता वाटू लागली. त्यानंतर ती आई त्या आडाजवळ गेली होती. तिने त्या आडात पाहिले असता तो मुलगा त्या आडात पडल्याचे तिला दिसले. ते दृश्य पाहून आईने टाहो फोडला, मुलाला बाहेर काढण्यासाठी त्या आईनेही आत उडी घेतली. या आडामध्ये दोघांचाही मृत्यू झाला होता. हा दुष्काळाचा दुष्परिणाम आहे. मराठवाड्याच्या वाट्याला हे चित्र नेहमीच येते. हा कशाचा परिणाम आहे ?

स्वातंत्र्यानंतर राजकीय कार्यकर्त्यांची उदासिनता, राजकर्त्यांचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, प्रभावीपणे न राबविलेल्या योजना याचा परिणाम म्हणून मराठवाड्यात आज भीषण दुष्काळ आहे. ही एकट्या शासनाची जबाबदारी नाही. म्हणून राजकीय पक्षाची, राजकीय कार्यकर्त्यांची, समाजात काम करणाऱ्या समाजधुरिण्यांची, संस्थांची आहे. हे सगळे कर्तव्य पराड़मुख झाल्यामुळे आज मराठवाड्याला दुष्काळाने ग्रासून टाकलेले आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

प्रा.सुरेश नवले.....

मध्यंतरीच्या काळात आपण सर्वांनी त्सुनामीची लाट पाहिली होती. ती त्सुनामीची लाट अनेक शहरांना गिळंकृत करुन गेली. परंतु वस्तू, निर्जीव वस्तू, सजीव प्राणी या सगळ्यांना गिळंकृत करणारी ही त्सुनामी मराठवाड्यामध्ये दुष्काळाच्या रुपाने आज तांडव नृत्य करीत आहे. हे तांडव नृत्य थांबवावयाचे असेल तर शासनाला ठोस उपाययोजना कराव्या लागतील.

सभापती महोदय, आमच्याकडे नाथांची परंपरा आहे. मुक्या प्राण्याला पाणी देणारे नाथ होते. त्यांच्या नावाचा नाथसागर हा मराठवाड्यात आहे. मराठवाड्याला हा नाथसागर थोड्याफार प्रमाणात उपयोगी पडत आहे. नाथसागर धरणाचे जनक स्व.शंकरराव चव्हाण हे आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे औरंगाबाद, जालना, परभणी, बीड या जिल्ह्यातील लोकांना आज किमान पिण्यासाठी तरी पाणी मिळत आहे. या धरणाबाबत काही लोकांची अशी प्रतिक्रिया होती की, त्या काळात हे धरण बांधून चूक केली आहे. मला असे वाटते की, प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्यांच्या मनामध्ये मराठवाड्यासंबंधी पूर्वग्रहदूषित भाव असला पाहिजे. कारण नाथसागर धरण नसते तर मराठवाड्यात भयानक परिस्थिती ओढवली असती.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

आज जालना जिल्ह्यामध्ये काय परिस्थिती आहे ? या जिल्ह्यातील मोसंबी आणि संत्र्याची 6 ते 7 लाख झाडे जळून गेली आहेत. शेतक-याने या झाडांचे आपल्या मुलापेक्षाही जास्त संगोपन केलेले आहे. झाडे जळून गेली यामध्ये शेतक-याचा काय दोष ? ही जळालेली झाडे उघड्या डोळयांनी पाहणे एवढेच त्याच्या हाती आहे. एखाद्या हरिणीच्या पुढ्यातील पाडसावर वाघाने झडप घालावी आणि त्या हरिणीने नुसते पहात रहावे अशा प्रकारे मराठवाड्यातील शेतकरी दुष्काळाकडे पहात आहे. हे चित्र आमच्या बीड जिल्हयातील आहे. निजामाच्या काळापासून अस्तित्वात असलेली जी विहीर 1972 च्या दुष्काळामध्येही कधी आटली नव्हती आणि जिच्या पाण्यावर 525 एकर जमीन ओलिताखाली येत होती ती विहीर देखील आज आटलेली आहे. आता ही परिस्थिती आहे. तर मग एप्रिल, मे या महिन्यामध्ये शेतक-याने कसे जीवन जगायचे ? सुदैवाने जूनमध्ये पाऊस पडला तर ठीक. पण त्यानंतर काय ? असा गंभीर प्रश्न शासना समोर आहे. या प्रश्नांचे शासनाला समर्पक उत्तर द्यावे लागेल.

सभापती महोदय, पत्र्याच्या घरामध्ये राहाणारी माणसे उन्हाळयामध्ये आपल्या अंगणातील झाडाखाली विसावा घेत असतात. पण आज त्यांच्या अंगणातील झाड जळून गेलेले आहे. त्यामुळे त्यांचा विसाव्याचा आधार संपलेला आहे. अनेक खेड्यापाड्यामध्ये ही परिस्थिती आहे. अमेरिकेमध्ये जो मिलो गाढवाना, घोडयांना खाऊ घालतात तो मिलो 1972 च्या दुष्काळामध्ये शेतक-यांनी आनंदाने खाल्ला. 1972 ला अन्नधान्याचा दुष्काळ होता. आता पाण्याचा भीषण दुष्काळ आहे. मागील 60-65 वर्षाच्या काळामध्ये आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो असलो तरी पाण्याच्या बाबतीत आपण अजूनही परावलंबी आहोत. हे परावलंबित्व कधी संपणार याचे उत्तर शासनाने दिले पाहिजे.

सभापुती महोदय, मराठवाड्यामध्ये शहराच्या बाहेर पडल्यानंतर सगळीकडे मृगजळ दिसते. पूर्वी मृगजळ पाहण्यासाठी लोक राजस्थानमध्ये जात असत. आता मृगजळ पाहण्यासाठी लोकांनी मराठवाड्यामध्ये यावे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे मराठवाड्यामध्ये फिरत असतात. मराठवाड्यामध्ये रानावनात गेल्यानंतर सर्वत्र मृगजळ दिसते. हे मृगजळ नष्ट करण्याचा प्रयत्न शासन करणार आहे काय ? मराठवाड्यातील पशुधन धोक्यात आहे. अनेक ठिकाणी छावण्या सुरु

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

झालेल्या असल्या तरी अनेक ठिकाणी छावण्यांची मागणी आहे. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे हे प्रत्येक अधिवेशनामध्ये शेळया-मेंढया जगविल्या पाहिजेत असे टाहो फोडून सांगत असतात. परंतु राज्य शासनाने शेळया-मेंढ्यांचा विषय गांभीर्याने घेतलेला नाही. शेळीचे दूध हे संजीवनी आहे. एकटी शेळी हे जनावर असे आहे की ते दुर्गंधीला कधीही स्पर्श करीत नाही. शेळी वनस्पती खाते. त्यामुळे तिच्या दुधातून वनस्पती पाझरत असते. निकोप जीवनासाठी शेळीचे दूध आवश्यक आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

महोदय,आमच्या मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्हयात उत्तम दर्जाच्या शेळया आहेत. आमच्या विभागात कुंभार समाज मोठ्या प्रमाणात आहे. तो समाज गाढवांचे पालन करतो. महाराष्ट्रात लक्षावधी भटक्या समाजाचे लोक आहेत, त्यांच्याकडे गाढवे आहेत. या गाढवांच्या खाद्या बाबतीत राज्य शासन काय करणार आहे ? गाढवांसाठी चाऱ्यांच्या छावण्या उभ्या करुन देणार आहात काय ? जो आग्रही घटक आहे. सन्माननीय सदस्य श्री. भोसले साहेब, हा विषय अतिशय गंभीर आहे, हा विषय हसण्यावारी नेण्यासारखा नाही. कारण ज्या घटकाला आवाज बुलंद करता येत नाही त्याकडे आपण नेहमी दुर्लक्ष करतो. आपण गाढवांची खाण्याची व्यवस्था करु शकलो नाही आणि अशा वेळी गाढवाने लाथा झाडल्या तर त्याचा दोष त्यांना देता येणार नाही. त्या जनावरांना देखील वाचविणे आवश्यक आहे.

महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी छावण्यांविषयी उल्लेख केला. एखाद् दुसऱ्या गुरांच्या छावणीमध्ये भ्रष्टाचार होत असेल. तो भ्रष्टाचार खणून काढा. याचा अर्थ असा नव्हे की, छावण्याच सुरु करावयाच्या नाहीत. पण ज्या स्वयंसेवी संस्था पुढे येत असतील, त्या गुरांसाठी छावण्या करण्यास तयार आहेत, छावण्या चालविण्यास तयार आहेत. तर अशा संस्थांना एका मापात तोलण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्रात अशा शेकडो संस्था आहेत की ज्या समाजसेवेने प्रेरित झालेल्या आहेत. त्यांना लोकांची सेवा करावयाची आहे. निष्पाप जीवांना जगवावयाचे आहे, अशांना जगविण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. ती जबाबदारी राज्य शासनाने पार पाडावी असा आग्रह मी या निमित्ताने करणार आहे.

सभापती महोदय, जून-जुलै नंतर प्रत्यक्ष पाऊस पडण्यास सुरुवात होणार आहे.त्यावेळी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती कशी असणार आहे, शेतकऱ्यांना बी-बियाणे कशा पध्दतीने उपलब्ध करुन देणार,त्यावेळी बी-बियाणे खरेदी करुन शेतीमध्ये पेरण्याची क्षमता शेतकऱ्यांमध्ये रहाणार आहे काय या सगळया गोष्टींचे शासनाने आज नियोजन करण्याची गरज आहे. या गोष्टींचे आज नियोजन केले तरच शेतकऱ्यांना जून-जुलैमध्ये आधार देता येऊ शकेल. या गंभीर बाबीकडे शासनाने लक्ष घालावे अशा प्रकारची माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी दोन-तीन मागण्या शासनाकडे करणार आहे. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुराला 165 रुपये दर जाहीर केला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

आमच्या बीड शहरातील शेत मजुराला बाहेर काम केल्यानंतर 250 रुपये मजुरी मिळते. अशा वेळी आपल्या राज्यातील रोजगार हमी योजनेची कामे करण्यासाठी कोणता शेतमजूर तयार होईल. माझी आग्रहाची विनंती आहे की, रोजगार हमी योजनेवरील काम करणाऱ्या मजुराला किमान 200 रुपये प्रति दिन मजुरी दिली तर राज्यात रोहयोची कामे मोठ्या प्रमाणात होऊ शकतील. दुष्काळ ही इष्टापती ठरावी यादृष्टीने नियोजन करणे गरजेचे आहे.

महोदय, मी गेल्या दोन-तीन अधिवेशनात मागणी करतो आहे की, टँकरमुक्त महाराष्ट्र करावयाचा असेल तर किमान एका गावात 100 पाझर तलाव झाले पाहिजेत. त्यादृष्टीने शासनाने काय प्रयत्न केलेले आहेत. पाझर तलाव करावयाचा असेल तर शेतकरी अर्ज करतात. परंतु कृषी अधिकारी त्यांना नियमामध्ये बसवून त्यांच्या अर्जांची विल्हेवाट परस्पर लावतात. महाराष्ट्रातील टँकर लॉबी मोडून काढावयाची असेल तर त्याला पाझर तलाव हा समर्थ पर्याय आहे. गाव तलाव हा देखील समर्थ पर्याय होऊ शकतो. विदर्भात मोठ्या प्रमाणात मालगुजारी तलाव आहेत. त्यावेळी राजाला कळले होते की, आपण मालगुजारी तलाव केले तर आपली जनता भविष्यामध्ये कितीही मोठा दुष्काळ पडला तरी जगू शकेल. अशा प्रकारे राज्य शासनाने प्रायोगिक तत्वावर 1 हजार लोकवस्तीचे गाव असेल तर त्या गावाला पाणी किती लागते, त्या प्रमाणात कृत्रिम तलाव करु शकलो तर त्या गावाला टँकर लावण्याची आवश्यकता भासणार नाही. याकडे देखील शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या काळात देखील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. 2013-14 मध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेणार आहेत, त्यांच्या शिक्षणाची मोफत व्यवस्था करावी कारण आज राज्यातील शेतकरी आर्थिक दृष्टया कंगाल आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले .....

पावसाळा सुरु झाल्यानंतर त्याची आर्थिक क्षमता वाढेल असे काही चित्र निर्माण होणार नाही त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांचा तसेच त्यांच्या मुलांचा देखील अतिशय गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. जून मध्ये पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांना खत पुरवठा करणे, बी-बियाणे देणे, शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने काही गोष्टी कराव्यात अशा प्रकारचा मी आग्रह करणार आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात विरोधी पक्ष नेत्यांनी सर्वंकष भाषण केलेले असल्यामुळे आता पुन्हा त्या मुद्यांचा परामर्श घेण्याची आवश्यकता मला वाटत नाही. दुष्काळाच्या संदर्भात राज्य शासनाने गांभीर्याने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. जे अधिकारी दुष्काळाकडे नकारात्मक दृष्टीने पाहत असतील त्यांच्यावर कठोर वज्र मूठ आदळून दणका दाखवला तरच आपण दुष्काळावर उत्तम प्रकारे मात करु शकू असा आशावाद मी या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, माझे मित्र कवी प्रशांत मोरे हे लोकप्रिय कवी असून साहित्य संमेलनामध्ये दुष्काळाच्या संदर्भातील त्यांची ही कविता अतिशय गाजलेली आहे. दुष्काळामुळे सूर बेसूर होण्याची शक्यता आहे त्यामुळे कवितेचा आशय समजेल याची मी काळजी घेईन. या कवितेला लोकांनी डोक्यावर घेतली असून ती पुढील प्रमाणे आहे.

नाही ओठावर साय डोळा पावसाच पाणी
हंडा रिकामा घुमे दे रे आभाळा दे पाणी

आता आभाळ काही पाणी देईल अशी शक्यता नाही. जून नंतर बहुतेक पाऊस पडायला सुरुवात होईल.

हंडा रिकामाच घुमे दे रे आभाळा दे पाणी
हंडाभर पाण्यासाठी माझी यमुना दिवाणी

यमुनेला सुध्दा आता हंडाभर पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आलेली आहे एवढे प्रदूषण आपल्याकडे झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले .....

हंडाभर पाण्यासाठी माझी यमुना दिवाणी
कोरडया हौदापासी माझा ज्योतिबा ग ऊभा
त्याच्या डोळयात जमली खाऱ्या आसवांची सभा
ओझ रिकाम्या हंडयाच मायच उचलाव कोणी
दे रे ....
रोहिणी नदीचा ग बाई मिटलाय वाद

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

रोहिणी नदीचा ग बाई मिटलाय वाद
राजा सिद्धार्थाचा चाले आता पाण्यासाठी शोध

आता येथे राजा सिद्धार्थ जरी आला तरी त्याला पाण्यासाठी हंडा घ्यावा लागेल. हाच सिद्धार्थ राजा नंतर भगवान गौतम बुद्ध झाला. त्याने बुद्धाची शिकवण जगभरात पसरली. तो राजा येथे आला तरी त्याला पाण्यासाठी हंडा घ्यावा लागेल. म्हणूनच मी सांगितले की, आता रोहिणी नदीचा मिटलाय वाद.

रोहिणी नदीचा ग बाई मिटलाय वाद
राजा सिद्धार्थाचा चाले आता पाण्यासाठी शोध.

महाडच्या तळ्याकाठी आता नवीन कहाणी
दे रे आभाळा दे पाणी....
कुठ गुडूप झालीया बाई उसळणारी लाट.

आता तर लाटच दिसत नाही.

कुठ गुडूप झालीया बाई उसळणारी लाट
पाणी दांडातल कुठ, कुठ रूंजझुंजू पाट

पावससाचे 40 टक्के पाणी आज कोकणात पडते. पण नंतर ते समुद्राला जाऊन मिळते. तो सागर सगळे पाणी गिळंकृत करतो आणि तो तुमच्याकडे पहात राहतो की, तुम्ही काय करता ?

कुठ गुडूप झालीया बाई उसळणारी लाट...
पाणी दांडातल कुठ, कुठ रूंजझुंजू पाट.
गाणार हे हिरव रान, माय जाळल ग कुणी.
दे रे आभाळा दे पाणी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

अशी आर्त हाक मी त्या आभाळाला मारतो आणि राज्यकर्त्यांना सांगतो की, ग्रामीण भागामध्ये आपण जरा फिरावे. माय माऊलींच्या डोक्यावर पदर नाही, त्यांच्या डोक्यावर पाण्याचे हंडे आहेत.

त्या वण वण फिरत आहेत. त्या टँकरच्या पाठीमागे पळताहेत. टँकरच्या पाठीमागे पळत असताना त्यांच्या बोटाला ठेच लागल्यामुळे त्या खाली पडताहेत. पडल्यामुळे पायात माती जाऊन धनुर्वात होत आहे. त्यामुळे त्यांचा मृत्यू होत आहे, हे सगळे विदारक चित्र बदलण्यासाठी राज्यकर्ते म्हणून आपण प्रयत्न करावेत एवढी आग्रहाची विनंती करतो आणि थांबतो.

.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते व सत्ताधारी पक्षांनी मिळून मांडलेल्या प्रस्तावावर सभागृहात नियम 260 अन्वये जी चर्चा सुरू आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मराठवाडयाने आता पर्यंत 18 वेळा दुष्काळ पाहिला आहे. या दुष्काळाची झळ मराठवाड्यातील जनता आजही सोसते आहे. मात्र, त्याची झळ शासनाला अजून पोचलेली नाही. मराठवाड्यातील दुष्काळासंबंधीचा साधा नामोल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही.

मराठवाड्यामध्ये फार पूर्वी सतत 12 वर्षे म्हणजे दुगार्डीचा दुष्काळ पडला होता. 1918 व 1972 मधील मराठवाड्यातील दुष्काळ भयानक होता. आता तर दर सहा सहा वर्षानी दुष्काळ येत आहे. सन 2001, 2007, 2013 मध्ये दुष्काळ पडला. म्हणजे सन 2018 मध्ये दुष्काळ येणार हे निश्चित होत आहे. यावरून असे दिसते की, दर सहा सहा वर्षांनी दुष्काळ पडलेला आपल्याला पहायला मिळत आहे.

सभापती महोदय, ठेच लागल्यानंतर माणूस शहाणा होतो.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

पण इतके सलग दुष्काळ पडत असताना देखील पाण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना झालेल्या नाहीत. मी तर असे म्हणेन की या सरकारच्या अकलेचा दुष्काळ पडला आहे की काय ? दुष्काळ निवारण्यासाठी जे काम करावे लागते त्यामध्ये हे शासन कमी पडले आहे असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, दुष्काळावर चर्चा असली की प्रत्येक वेळी 1972 सालच्या दुष्काळाचा उल्लेख होतो. आपण त्या दुष्काळातून काय शिकलो असा माझ्यापुढे प्रश्न आहे. त्या वेळी सरकारने निसर्गा विरुध्द पूर्ण ताकदीनिशी लढा दिला होता असे मी म्हणेन. तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक होते तर श्री.यशवंतराव चव्हाण केंद्रामध्ये अर्थमंत्री होते. त्यावेळी दुष्काळा बाबतचे निवेदन 6 डिसेंबर रोजी झाले होते. म्हणजे दुष्काळ पडण्याच्या अगोदर सहा महिने नियोजन झाले होते. त्यावेळी शासनाची वार्षिक योजना 212 कोटी रुपयांची होती. तर दुष्काळाच्या नियोजनासाठी केंद्राकडे 150 कोटी रुपयांचे अर्थसाह्य मागण्यात आले होते. म्हणजे दुष्काळाची परिस्थिती ओळखून त्यांनी अगोदर नियोजन केले होते. आज आपण स्व.यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक यांची नावे घेतो. त्यांची जयंती साजरी करतो. परंतु त्यांच्याकडून आपण काय शिकलो ? त्यावेळी 212 कोटी रुपयांची वार्षिक योजना असताना देखील केंद्र सरकारकडून 150 कोटी रुपयांचा निधी आणून सरकारने दुष्काळाचा सामना करण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, 9 डिसेंबर 1972 रोजी टंचाई निवारण समिती स्थापन करण्यात आली. आता मार्च महिना सुरु आहे आणि दुष्काळाबाबत कोणत्या उपाय योजना केल्या पाहिजेत त्याची चर्चा आता आपण येथे करीत आहोत. त्यावेळी केंद्रीय पाहणी पथकाने दुष्काळी दौरा दिनांक 4 व 5 मार्च रोजी केला होता. परंतु आता मार्च महिन्यात केंद्रातून पाहणी पथक आले होते काय ? मग आपण चार महिने झोपून काढले काय, आम्ही याबाबत नेमके काय केले ?

सभापती महोदय, 1972 च्या दुष्काळामध्ये 22 डिसेंबर रोजी सरकारने स्थलांतरित धोरण जाहीर केले होते. तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांनी दुष्काळाशी सामना करण्यासाठी कोणत्या उपाय योजना केल्या होत्या हे यावरुन स्पष्ट होते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

सभापती महोदय, सन 1972 च्या दुष्काळाचे गांभीर्य ओळखून तत्कालीन पंतप्रधान स्व.श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्वत: त्या भागांचा दौरा केला होता. पण आताचे पंतप्रधान दुष्काळी भागांना भेटी देण्यासाठी आले काय ? ते माणसे मेल्यावर सहानुभूती मिळविण्यासाठी अत्यंदर्शनासाठी येणार. दुष्काळग्रस्त भागातील लोकांना जगविण्याची जबाबदारी जेवढी मुख्यमंत्र्यांची आहे तेवढीच जबाबदारी माननीय पंतप्रधानांची नाही काय ? तत्कालीन पंतप्रधान स्व.श्रीमती इंदिरा गांधी यांनी दुष्काळाचे गांभीर्य ओळखले होते म्हणून त्यांनी टंचाईग्रस्त भागातील कुटुंब दत्तक घेण्याची योजना जाहीर केली होती.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

याचे गांभीर्य खरोखरच आमच्या सरकारला आहे काय ? नाही. 1972 मध्ये दुष्काळावर उपाययोजना करताना तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांनी दुष्काळाचे आव्हान स्वीकारले होते. त्यांची प्रशासनावर सुध्दा उत्तम पकड होती. देशाचे तत्कालीन अर्थ मंत्री स्व.यशवंतराव चव्हाण आणि तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांनी स्वत: दुष्काळी भागाचा दौरा केला. त्यांनी स्वत: निरनिराळ्या कामांना भेटी दिल्या आणि वस्तुस्थिती जाणून घेतली. केवळ दिल्लीत बसून पैसा मंजूर केला नाही. तर देशाचा निधी कशा पध्दतीने खर्च केला जात आहे, किंबहुना कशा प्रकारे खर्च करावा या बाबत स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. परंतु आज सर्व मंत्री मंत्रालयात बसून आहेत. चारा छावण्या, चारा डेपोमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे सांगितले जात आहे. महोदय, दुष्काळी परिस्थितीत लोकांना आधार देण्याची जबाबदारी कोणाची आहे ? ही जबाबदारी प्रामुख्याने सरकारची आहे.

महोदय, 1972 च्या दुष्काळात दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक आणि परीक्षा फी माफ करण्याचा निर्णय स्व.वसंतराव नाईक यांनी डिसेंबर-जानेवारी महिन्यामध्ये घेतला होता. आज मार्च महिना आलेला असताना आम्ही केवळ बोंबलत आहोत. एवढेच नव्हे तर त्या काळात विद्यार्थ्यांना शाळेमध्ये जेवणाचा डबा पोहोचविण्याचे काम त्या वेळच्या शासनाने केले होते. त्या स्वरुपाच्या उपाययोजना खरोखरच आज होत आहेत काय ? दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना जेवण मिळते की नाही याचा विचार केला जात नाही. दुष्काळी भागातील शाळा सुरु ठेवाव्यात की बंद कराव्यात असा प्रश्न आज उभा आहे.

महोदय, आज दुष्काळी भागातील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करीत आहेत. काही लोक तर मुंबईला येऊन भीक मागत आहेत. ही बाब या सरकारला खरोखरच लाजीरवाणी आहे.

महोदय, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एखादा निर्णय घ्यावयाचा असल्यास अगोदर बैठक घेतली जाते. त्यानंतर सरकारचा जी.आर. निघतो. तो जिल्हाधिकाऱ्यांकडे गेल्यानंतर त्यांच्याकडून प्रांताधिकाऱ्यांकडे जातो. प्रांताधिकाऱ्यांकडून तहसीलदार आणि त्यांच्याकडून तलाठी, ग्रामसेवक यांच्याकडे जातो. परंतु 1972 च्या दुष्काळात वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना ते स्वत: उभे राहून आवश्यक ती कामे करुन घ्यायचे. त्या बाबतचा जी.आर. नंतर काढला जाईल असे सांगायचे. यावरुन त्यांनी त्या काळात दुष्काळ किती गांभीर्याने घेतला होता हे दिसून येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणत्याही परिस्थितीत भूक बळी होऊ देणार नाही, शेतकऱ्यांना आत्महत्या करु देणार नाही अशी भावना त्यांच्या मनामध्ये होती आणि त्या अनुषंगाने काम करण्याचा प्रयत्न स्व.यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांनी त्या काळात केला.

महोदय, दुष्काळाच्या परिस्थितीत घेतलेले निर्णय त्या क्षणापासून लागू करण्याचे काम तत्कालीन शासन आणि मुख्यमंत्र्यांनी केले होते, हे मला मुद्दाम या ठिकाणी निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

महोदय, मी माहिती घेतली त्यावरुन राज्यात दुष्काळी भागात 2 लाख 80 हजार मजूर कामावर आहेत. 1972 च्या दुष्काळामध्ये 30 लाख लोक रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करीत होते. त्या काळात वसंतराव नाईक यांनी मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती केली. रोजगार हमी योजनेच्या संकल्पनेचा उगम खऱ्या अर्थाने दुष्काळापासून झाला. त्यानंतर आता सबंध देशात ती लागू झाली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिपकराव साळुंखे यांना मी सांगू इच्छितो की, दुष्काळी परिस्थितीत कशा प्रकारचे काम करु शकतो हे त्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांनी दाखवून दिले. त्या काळात रोजगार हमी योजनेच्या कामावर प्रचंड प्रमाणावर खडी फोडली गेली. सलग पुढील 10 वर्षे रस्त्याच्या कामासाठी ती खडी उपयोगात आली. दुष्काळ संपला तरी त्या काळात फोडली गेलेली खडी रस्ते, पाझर तलावाच्या कामावर वापरली गेली आणि ती कामे मार्गी लागली. परंतु आज आपण नियोजन न करता, केवळ स्व.यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिवस साजरा करीत आहोत.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

तुमची ही नाटके कशाला हवीत ? त्यांच्याकडून आपण नेमका काय आदर्श घेतला ? त्यांनी जनतेची जी सेवा केली, जी कामे केली, जो आदर्श समोर ठेवला त्यापैकी आपण काहीही घेत नाही. फक्त दिखावा करण्याचे काम होत आहे. त्यांच्या पुतळ्याला हार घालावयाचा, फोटो काढून घ्यावयाचे, त्यांच्या जयंतीच्या नावाने मोठमोठे कार्यक्रम घ्यावयाचे, हे कशासाठी, त्यामागचा उद्देश काय आहे ?

सभापती महोदय, 1972 च्या दुष्काळाच्या वेळी मोठ्या प्रमाणावर खडी फोडली गेली. त्यावेळी जवळजवळ 2 हजार पाझर तलाव रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून केले गेले. आता या चार महिन्यामध्ये किती पाझर तलाव झाले याची आकडेवारी माझ्याकडे नाही. पण एखाद्या माणसाला जर अशक्य गोष्ट शक्य करुन दाखवावयाची असेल तर ती होऊ शकते हे 1972 च्या दुष्काळाच्या वेळी त्यांनी दाखवून दिलेले आहे. आम्ही फक्त कागदी घोडे नाचवत आहोत. जिल्हाधिकाऱ्यांना सक्त सूचना दिलेल्या आहेत, एस.पी.ना सक्त सूचना दिलेल्या आहेत, तहसीलदारांना सक्त सूचना दिलेल्या आहेत, असे सांगितले जाते. आम्हाला फक्त घोषणांचे बुडबुडे ऐकावयास मिळतात.

सभापती महोदय, 1972 मध्ये 2 हजार पाझर तलाव झाले. त्यावेळी नाला बंडींगची शेकडो कामे झाली. पाऊस पडल्यानंतर त्यामध्ये पाणी साचले. 1972 सालामध्ये भूगर्भामध्ये पाणी जिरवले गेले. आता नाला बंडींगची कामे फक्त कागदावर दाखवून पैसे काढले जात आहेत. मी फार जबाबदारीने बोलत आहे. फक्त कागदावर कामे दाखवून बिले काढली जातात. सर्व पैसे तुमचे अधिकारी खात आहेत. अशा पध्दतीने जनतेचा पैसा कोणाच्या घशात जात आहे हे एकदा तपासून बघावे म्हणजे आपल्याला माहिती मिळेल.

सभापती महोदय, 1972 साली पिण्याच्या पाण्यासाठी टँकर लावले, ट्रॅक्टर लावले तसेच बैलगाड्या देखील लावल्या आणि त्या त्या गावांमध्ये पाण्याची व्यवस्था केली. त्यावेळी पशुधन वाचविण्यासाठी छावण्या सुध्दा चालू केल्या होत्या. आज आपली रोजगार हमी योजनेची कामे कशा पध्दतीने सुरु आहेत ? त्यांच्या लहान मुलांना कोण विचारतो, एखादा माणूस आजारी पडला तर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

त्याला कोण विचारतो ? पण 1972 मध्ये खडी सेंटरवर खडी फोडण्यासाठी आलेल्या कामगारांसाठी आठवड्यातून दोन वेळा जिल्हा परिषदेचे डॉक्टर्स आणि नर्सेस जात होत्या आणि त्या माणसांना तपासले जात होते. प्रत्येक कामावरील मजुरांच्या आरोग्याची काळजी घेतली जात होती. आता कोणी कोणाला विचारत नाही. आता डॉक्टर्स, नर्सेस कोठे आहेत ? अशी सर्व अवस्था आहे. खरे तर या ठिकाणी या चर्चेची सुध्दा आवश्यकता नाही. 1972 सालामध्ये ज्या उपाययोजना केल्या त्या जरी आपण डोळ्यासमोर ठेवल्या आणि त्याची आपण अंमलबजावणी केली तरी देखील या सभागृहाचा हा सर्व वेळ वाचला असता. झोपलेल्याला जागे करु शकतो पण झोपेचे सोंग घेतलेल्याला कसे जागे करणार ? अशी आज या शासनाची अवस्था झालेली आहे असे मी म्हणेन.

सभापती महोदय, त्यावेळी रस्त्यांची आणि खडीकरणाची कामे मोठ्या प्रमाणावर झाली. त्या रस्त्यांमुळे वाड्या, तांडे जिल्हा रस्त्याला जोडले गेले. दळणवळण चालू झाले. पाऊस पडल्यानंतर पाणी साठवून पुनर्भरण झाले. त्यामुळे पुन्हा शेती, बागायती व्यवस्थित झाल्या आणि पशुधन देखील वाढले. आम्ही 1972 च्या दुष्काळाचे उदाहरण देतो आणि त्यापेक्षाही आजचा दुष्काळ भयानक आहे असे आम्ही सर्व बोलतो. पण 1972 सालामध्ये ज्या उपायोजना केल्या त्यामधून आपण काय शिकलो आणि त्याप्रमाणे अंमलबजावणी का होत नाही याचे उत्तर या ठिकाणी मिळत नाही. 1972 मध्ये जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या सभापतीसह सर्व पदाधिकारी, जिल्हा परिषदेचे सर्व कर्मचारी, सर्व शिक्षक यांनी सहा महिन्यांपर्यंत प्रत्येक महिन्याच्या पगारातून रक्कम काढून मदत केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

मंत्री महोदय, मंत्रिमंडळामध्ये मंत्री महोदयांनी एक महिन्याचा पगार दुष्काळ निवारण निधीसाठी देण्याचे ठरले असेल. परंतु त्यामध्ये भत्ता किती असतो त्याची मला माहिती आहे. 1972 साली राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, विषय समित्यांचे सभापती, सर्व पंचायत समित्यांचे सभापती, शिक्षक, कर्मचारी या सगळयांनी 6 महिने दुष्काळासाठी मदत केली होती. त्यातून महिला व मजुरांच्या लहान मुलांना दूध व औषधांचा खर्च भागविला गेला होता. 1972 सालामध्ये महापालिकेच्या क्षेत्रातील सर्व निमसरकारी संस्था, टाटा, मफतलाल उद्योगासह अनेक कामगार संघटना, अनेक उद्योगपती यांनी दुष्काळाचे निवारण करण्यासाठी, मदत करण्यासाठी सक्रिय सहभाग घेतला होता.

1972 साली मफतलाल उद्योगाने सुकडीचे वाटप केले होते. परंतु आज मार्च महिन्याचा दुसरा आठवडा सुरु झालेला आहे. 1972 मध्ये सर्व गोष्टी शक्य झाल्या होत्या. मग 2013 मध्ये हे का शक्य होत नाही असा प्रश्न मला सरकारला विचारावासा वाटतो. केल्याने होत आहे रे , आधी केलेची पाहिजे, मग ते का केले जात नाही, काय अडचण आहे, असा मला प्रश्न पडला आहे. त्यावेळी सर्व यंत्रणा खडबडून जागी झाली होती. एखाद्या अस्मानी संकटाचा मुकाबला प्रशासन व लोकप्रतिनिधी कसा करु शकतात त्याचे जीवंत उदाहरण त्यावेळी दाखवून दिलेले आहे. त्यावेळी आम्ही सर्वजण एक झालो होतो. दुष्काळ हा राजकीय विषय होऊ शकत नाही. कोण सत्ताधारी पक्षाचा आहे, कोण विरोधी पक्षाचा आहे असा विषयच उपस्थित होऊ शकत नाही. या दुष्काळासाठी आम्ही सर्वजण एक आहोत, आम्ही सर्वजण एक होऊन दुष्काळाचा सामना करु, आमच्यातील माणुसकी जिवंत आहे, दुष्काळी भागातील माझ्या एकाही बांधवाला प्राण गमवू देणार नाही. ही भूमिका सगळ्यांनी घेणे अत्यंत आवश्यक आहे. एकमेकांवर ताशेरे ओढण्याची गरज नाही असे मला वाटते. परंतु दुर्दैवाने तसे घडत नाही.

सभापती महोदय, एक गोष्ट मला मुद्दाम मांडावयाची आहे. 1972 साली दुष्काळासंबंधी डिसेंबर महिन्यामध्ये समिती स्थापन झाली होती. तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांनी दि.6.12.1972 रोजी केंद्र सरकारकडून 150 कोटी रुपयांची मदत मिळण्याबाबतचा प्रस्ताव पाठविला होता. पण या दुष्काळाच्या वेळी मात्र अशा प्रकारचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविला नाही,

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.रामदास कदम.....

डिझास्टर मॅनेजमेण्ट ॲक्ट, 2005 हा कायदा आहे. या कायद्याच्या तरतुदीनुसार जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे. त्या समितीचे प्रस्ताव देण्याचे काम आहे. या ॲक्टच्या कलम 30 नुसार ज्यांनी येणाऱ्या भीषण संकटाचे गांभीर्य ओळखले नाही, ज्यांनी हलगर्जीपणा केला, टाळाटाळ केली, एवढेच नव्हे तर जाणीवपूर्वक हेतूपुरस्सरपणे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जनतेला दुष्काळाच्या खाईत लोटले आहे त्यांच्याविरुध्द कडक कारवाई केली पाहिजे. यामध्ये विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मंत्री महोदय देखील दोषी असतील तर या सगळ्यांविरुध्द गुन्हा दाखल झाला पाहिजे. दोषी असणाऱ्यांना जेलमध्ये घातले पाहिजे. मी नियमांच्या बाहेर जाऊन बोलत नाही. मी या विषयाचे राजकारण करीत नाही. परंतु नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला असता तर केंद्र सरकारचे पथक राज्यात आले असते. 1972 च्या दुष्काळात तसे पथक राज्यात पाहणी करण्यासाठी आले होते. त्याप्रमाणे आताही पथक आले असते आणि दुष्काळावर उपाययोजना झाल्या असत्या.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

परंतु दुर्दैवाने जनतेच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे. खरे म्हणजे 2005च्या डिझास्टर मॅनेजमेण्ट ॲक्टनुसार संबंधितांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. या दुष्काळाच्या बाबतीत राज्यमंत्री महोदय श्री. प्रकाश सोळंके हे जबाबदार असतील तर त्यांनी देखील स्वत:वर गुन्हा दाखल करुन घेतला पाहिजे. सभापती महोदय, मी येथे सांगू इच्छितो की, जर माननीय मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेतली नाही तर मला न्यायालयात जावे लागेल. महाराष्ट्रातील जनतेच्या जीवनाची होळी करण्याचे काम जिल्हाधिका-यांनी केलेले आहे आणि त्याचे शासन त्याना झाले पाहिजे. आज महाराष्ट्राच्या पश्चिम महाराष्ट्रातील 44 तालुके, मराठवाड्यातील 36 तालुके, खानदेशमधील 18 तालुके आणि विदर्भातील 59 तालुके दुष्काळग्रस्त आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी आतापर्यन्त 413 कोटी 98 लाख रु., जनावरांच्या चा-यासाठी 684 कोटी 39 लाख रु. खर्च झालेले आहेत. छावण्यातील जनावरांची संख्या 3 लाख 82 हजार 607 इतकी आहे. या संख्येमध्ये आता वाढ झालेली असेल.

मघाशी माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी जी वस्तुस्थिती सांगितली ती मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये सांगितली होती. त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले होते. चाराडेपोमध्ये 100 कोटीचा भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी ताबडतोब चारा छावण्या बंद करण्याचा निर्णय घेतला. परंतु महाराष्ट्रातील भ्रष्टाचार थांबविण्याचे काम माननीय मुख्यमंत्री करु शकले नाहीत. त्यांच्यावर देखील दबाव आणला गेला. शेतकरी मेला तरी चालेल, परंतु आपल्या राजकीय कार्यकर्त्यांना जगविण्यासाठी, उद्याच्या येणा-या निवडणुका जिंकून पुन्हा सत्ता मिळविण्यासाठी मेलेल्या माणसाच्या टाळूवरचे लोणी खाण्याचे काम हे शासन करीत असेल तर न्याय कुणाकडे मागायचा ? चारा छावण्याच्या बाबतीत काही नियम होते. ज्या संस्थेकडे 15 लाख रुपये जमा असतील अशाच संस्थेला चारा छावणीचे काम देण्याचे नियम होते. परंतु जिल्हाधिका-यांवर दबाव आणून 15 लाख रु.चा निकष 6 लाखापर्यंत खाली आणला गेला. सर्वच ठिकाणी भ्रष्टाचार होत आहे असे मी म्हणणार नाही. एका जिल्हाधिका-याने एका आमदाराच्या बिलातील सव्वादोन कोटी रुपये कमी केले आहेत.

सभापती महोदय, या दुष्काळाच्या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, जे जुने पाझर तलाव आहेत, जी नालाबंडिगची, केटीवेअरर्सची कामे केलेली आहेत त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

गाळ साचून राहिलेला आहे. हा गाळ नियम शिथिल करुन जेसीपी, पोकलेन मशीन लावून काढावा जेणेकरुन पुढे पाऊस पडला तर पाण्याचा साठा वाढण्यास मदत होईल. तेव्हा याबाबतीत तातडीने निर्णय घ्यावा. 1972च्या दुष्काळामध्ये यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक यांच्यासारखी मंडळी जे जे निर्णय घेत होते त्यांची ताबडतोबीने अंमलबजावणी होत होती. 1972 च्या दुष्काळामध्ये इंदिरा गांधी आल्या होत्या. दुष्काळी भागामध्ये वसंतराव नाईक तळ ठोकून बसले होते. आपणही त्याप्रमाणे दुष्काळी भागात जाऊन बसावे असे मी म्हणणार नाही. परंतु माझे म्हणणे एवढेच आहे की, अशा भीषण दुष्काळाच्या वेळी सभागृहामध्ये वांझोटी चर्चा करण्याची वेळ पुन्हा येऊ नये.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

तलावातील गाळ काढण्याच्या संदर्भातील निकष बदलून ती कामे तातडीने हाती घ्यावीत. त्यासाठी कायदा थोडा बाजूला ठेवा. त्या कामांमध्ये भ्रष्टाचार होणार नाही एवढी काळजी घ्यावी. या संदर्भात पैसे न खाणारी समिती नेमा. तलावातील गाळ काढण्याची कामे तातडीने हाती घ्यावीत अशी माझी शासनास विनंती आहे.

महोदय, गुरांच्या छावण्यांमध्ये शेतकऱ्यांचे बैल ठेवले जातात. जी जनावरे छावणीमध्ये आहेत, त्यांनाच चारा देण्यात येतो. परंतु एखाद्या शेतकऱ्यास शेत नागरावयाचे असेल व त्यासाठी त्याने आपली बैलजोडी शेतात नेली तर त्या शेतकऱ्यांच्या बैलजोडीस चारा उपलब्ध करुन देण्यात येत नाही. त्या शेतकऱ्यांने आपली शेती नागरावयाची नाही काय ? शेतकऱ्यांच्या छावणीत असलेल्या बैलजोडीला चारा उपलब्ध करुन देण्यासबंधीचे नियोजन व्यवस्थितपणे केले गेलेले नाही. शेतकऱ्याने शेत नागरले नाही तर पावसाळयात तो शेती कशी काय करेल ? यासंदर्भात पूर्णपणे चुकीचे नियोजन केलेले आहे. त्या नियोजनात सुधारणा करावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, एखाद्या शेतकऱ्याने आपली जनावरे छावणीत ठेवलेली आहेत, तो शेतकरी आपल्या जनावरांचे शेण छावणीत घ्यावयास आला तर त्यास शेण दिले जात नाही. छावणीत जमा होणारे शेण देखील संस्थेच्या मालकीचे होते. मी जी माहिती सांगतो आहे, ती शासनाने तपासून घ्यावी. जनावरांच्या मालकांना शेण दिले नाही तर तो शेतकरी आपल्या शेतात शेण खत कसे टाकेल. शेतकऱ्यांच्या पुढच्या अडचणींचा काहीही विचार शासन करीत नाही. पूर्वीच्या काळात राज्य शासनाने शेण कशा पध्दतीने खाल्ले आहे याचे उदाहरण सगळयांना माहिती आहे. शेतकऱ्यांच्या मालकीच्या जनावरांचे शेण त्यांना देण्यात आले पाहिजे, ते शेण छावणीतून घेऊन जाण्याचे अधिकार त्यांना दिले पाहिजेत. सेंद्रीय खत टाकून शेतीतून उत्पन्न काढण्याची शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आता राहिलेली नाही, त्यांना छावणीत ठेवलेल्या जनावरांचे शेण दिले गेले तर ते आपल्या शेतात शेणखत टाकून शेती उत्पादन करु शकतात. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अशा पध्दतीने नाडणे, त्यांचा अधिकार नाकारणे, त्यांच्यावर अन्याय करणे असे होता कामा नये अशी मी शासनाकडून अपेक्षा व्यक्त करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, आज सभागृहात दुष्काळा विषयी गंभीरपणे चर्चा चालू आहे. दुष्काळाशी सहा-सात विभागांचा संबंध येतो. संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित राहिले असते तर हे सरकार या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देत आहे म्हणून मला खूप चांगले वाटले असते. कृषी, वन आणि पाटबंधारे ही तिन्ही खाती एकत्र आली तर पाणलोट कार्यक्रम अतिशय यशस्वीपणे राबवू शकतो. पाणलोट कार्यक्रम योग्य पध्दतीने राबविला गेला तर भविष्यामध्ये पाण्याची अडचण भासणार नाही. या तिन्ही विभागांनी एकमेकात समन्वय ठेवून पाणलोट कार्यक्रमांच्या बाबतीतील नियोजन आतापासून केले पाहिजे, त्याचा निश्चितपणे राज्याला फायदा होऊ शकतो. या बाबतीत शासनाने आवर्जून लक्ष घालावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, दुष्काळावर मात करण्यासाठी वेगवेगळया उपाययोजना करणार आहात. त्यात अल्प भूधारक शेतकऱ्यांना रब्बी हंगामात बी-बियाणे मोफत देणार आहात काय याचा देखील विचार करणे व तसे नियोजन करणे आवश्यक आहे. अल्प भूधारक शेतकऱ्यांना मोफत बियाणेच नव्हे तर मोफत खतांचा पुरवठा देखील केला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मी माननीय श्री. हर्षवर्धन पाटील साहेब, यांना सांगू इच्छितो की, गुरांच्या छावणीमधील प्रत्येक गुराच्या मागे अनुदान दिले जाते.

यानंतर श्री. जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीका नहीं

श्री. रामदास कदम .....

सभापती महोदय, छावणीमधील प्रत्येक जनावरांठी आपण अनुदान देत असतो. छावणीतील एका जनावराला 15 किलो चारा दिला पाहिजे,मिनरल पावडर दिली पाहिजे, जनावरांना आठवडयातून 3 दिवस अर्धा किलो भुसा किंवा अर्धा किलो पेंड दिली पाहिजे असा आपला नियम आहे. परंतु या नियमाची अंमलबजावणी खरोखर होत आहे काय ? आपण हे पैसे जनावरांसाठी देत आहोत की, छावणी मालकांना पोसण्यासाठी देत आहोत ? जर या सर्व गोष्टींची अंमलबजावणी होत नसेल तर ही सर्व जबाबदारी कोणाची ? आंधळ दळतं आणि कुत्र पीठ खातं असा हा प्रकार सुरु आहे. आपल्या जनावरांना केवळ ऊसाची चिपाडे मिळत आहेत ही वस्तुस्थिती कोणीही नाकारु शकत नाही. जनावरांठी आपण 60 रुपये देत आहोत ते कोणासाठी देत आहोत ?

सभापती महोदय, दुष्काळाला तोंड देता यावे यासाठी आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारकडे 10 हजार कोटी रुपयांचे कर्ज मागितले होते परंतु केंद्र सरकारने ते नाकारले. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी 9 हजार कोटींची मागणी केली ते कर्जही नाकारण्यात आले. शेवटी मुख्यमंत्री म्हणाले की, 7 हजार कोटी रुपये तरी कर्ज म्हणून मंजूर करा परंतु 7 हजार कोटी रुपयांचेही कर्ज नाकारण्यात आले.

सभापती महोदय, आपल्या मुंबईतून दर वर्षी केंद्र सरकारला 1 लाख हजार कोटी रुपये महसूल जात असतांना अशा दुष्काळाच्या वेळेस जर दिल्ली आपल्याला मदत करणार नसेल तर ते योग्य नाही. राज्यात आणि केंद्रात आपलेच सरकार असतांना तुम्हाला पैसे मिळत नसतील तर केंद्रात जाऊन पंतप्रधानांच्या तोंडावर आपल्या राज्याच्या मंत्र्यांनी राजीनामे फेकले पाहिजे. सरकार चालवित असतांना तुम्हाला राज्यातील जनता जगवता येत नसेल, आपल्या हक्काचा पैसा आपल्याला मिळवता येत नसेल तर या सत्तेच्या खुर्च्या तुम्ही कोणासाठी उबवत आहात ? हा दुष्काळ जर दुसऱ्या राज्यात पडला असता तर त्या राज्यांना हवे तेवढे पैसे केंद्राकडून मिळाले असते. आपण केंद्र सरकारकडे कशासाठी कर्ज मागता ? 1972 च्या दुष्काळाच्या वेळेस केंद्र सरकारने 150 कोटी रुपये दिले होते. त्यामुळे आपल्या मुख्यमंत्र्यांनी केंद्राकडे कर्ज न मागता केंद्राकडे जाऊन सांगावे की, आम्हाला कर्ज नको, आम्हाला तुमची भीक नको, आम्हाला आमच्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

हक्काचे पैसे हवे आहेत.

मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. दुष्काळामध्ये माणसे, जनावरे तडफडून मरत असतील तर आम्हाला आमच्या हक्कासाठी 10 हजार कोटी रुपये हवे आहेत असे ठणकावून सांगा. जर 10 हजार कोटी केंद्र सरकार देत नसेल तर राजीनामे फेका, सरकार बरखास्त करुन टाका. आज आमच्या मुख्यमंत्र्यांना केंद्रात कटोरी घेऊन भीक मागावी लागत आहे ती कशासाठी ? महाराष्ट्राला काहीच सन्मान नाही ? मुंबई काय भिकारी आहे ? आम्हाला केंद्राने कर्ज म्हणून नाही तर आमच्या हक्काचे पैसे दिले पाहिजे. मुंबईच्या पैशावर आज संबंध देश चालतो आहे, मुंबईच्या पैशावर संपूर्ण देशाचा विकास होत आहे आणि असे असतांना आमच्या राज्यावर संकट आलेले असतांना आमच्या हक्काचे पैसे मिळत नसतील तर हा अन्याय आमच्यावर का ?

सभापती महोदय, दुष्काळाच्या प्रश्नासंबंधी मंत्री मंडळाने पंतप्रधानांकडे गेले पाहिजे माननीय शरद पवार साहेबांना, माननीय सोनिया गांधीना भेटले पाहिजे.

सभापती महोदय, घाट माथ्यावर जेवढे पावसाचे पाणी पडते ते सर्व पाणी पश्चिम महाराष्ट्रात किंवा मराठवाडयामध्ये वळवू शकतो. आज घाट माथ्यावर पडणारे पावसाचे 70 ते 80 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे ते पाणी आपण शेतीठी वापरु शकतो.

यानंतर श्री. भारवि....

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी चालू

श्री.रामदास कदम...

आपल्याला सगळे समोर दिसते आहे. पण कळत नाही. कळत असेल तर वळत नाही. मनात इच्छा असेल तर सगळ्या गोष्टी होऊ शकतात. आम्ही 70 हजार कोटी खर्च केले असे ज्यावेळी सांगता त्यावेळी त्यातील थोडा पैसा कोकणात खर्च झाला असता व पाणी आणले असते तर त्याचा निश्चितच फायदा झाला असता. कोकणाला जेवढे पाणी आवश्यक आहे तेवढे आपण द्यावे एवढेच आमचे म्हणणे आहे. बाकीचे पाणी आपल्याकडे ठेवावे. आपण लोकांना तडफडून का मारत आहात ?

स्वातंत्र्यानंतर 60 वर्षे उलटून गेल्यानंतर देशातील सिंचनाचे प्रमाण 52 टक्क्यांपर्यंत गेले. असे जरी असले तरी महाराष्ट्रामध्ये फक्त 18 टक्के सिचंन होत आहे. या मागचे गमक काय आहे हे आपण आम्हाला सांगितले तर आमच्या ज्ञानामध्ये देखील जरा भर पडू शकेल.

आमचा देश आणि महाराष्ट्र कृषि प्रधान आहे. आज आघाडीवर असलेल्या महाराष्ट्राचे काय झाले आहे ? सिंचनामध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे की, पिछाडीवर आहे ते सांगावे. पैसा खर्च होत आहे, पण सिंचन वाढत नाही. तज्ज्ञांच्या अंदाजा नुसार 70 टक्के टीएमसी पाणी आहे. त्यातील निम्मे पाणी हे नैसर्गिक दृष्टया मिळणार आहे. बाकीचे निम्मे पाणी आपण उपसा पद्धतीने घेतले तर आपली पाण्याची भूक कायमची संपवू शकतो.

उर्ध्व वैतरणा धरणातील 16 टीएमसी पाणी अत्यंत कमी खर्चात वळविणे शक्य आहे. त्याच बरोबर दमण खोऱ्यातील पाणी साठवण तलावावर आवश्यक ते छोटे बंधारे बांधून ते पाणी आपल्याला आणता येईल. त्यातील काही योजनांसाठी केंद्र सरकारकडून 90 टक्के निधी मिळतो. राज्य सरकारला 10 टक्के निधी खर्च करायचा आहे. शासन एका बाजूला 70 हजार कोटी रूपये खर्च केले असे सांगत आहे. शासनाने छोट्या बंधाऱ्याच्या योजनेसाठी 10 टक्के निधी खर्च केला असता तर आज आमच्यावर या सभागृहामध्ये चर्चा करण्याची वेळ आलीच नसती. आज येथे माणसे, जनावरे पाणी पाणी करून मेली नसती. तेव्हा हे पाप नेमके कोणाचे आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे नियम बाजूला ठेवून यंत्रांनी काम केले पाहिजे. 2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

टँकरच्या विशिष्ट अशा लॉबी आहेत. त्या नेमक्या कोणाच्या आहेत हे आपण तपासून पहावे. मघाशी त्यांनी डिझेलच्या बाबतीत सांगितले. असे किती टँकर गावात जातात आणि किती डिझेलची बिले आणली जातात हे एकदा तपासून पाहणे अत्यंत आवश्यक आहे. या संबंधातील माहिती माझ्याकडे आहे पण मी अधिक खोलात जाऊन बोलणार नाही. किमान अशा कामात तरी त्यांनी पैसे खाऊ नयेत.

प्रत्येक ओढ्यावर आपण जागोजागी सिमेंट बंधारे बांधले तर फायद्याचे होईल. पावसाचे पाणी खाली झिरपून जाते. आज अनेक गावात भूजलाची पातळी 2 मीटरने खाली गेली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांनी 2 हजाराच्या वर बंधारे बांधले होते. तशा पद्धतीचे काम आपल्याकडून होणे आवश्यक आहे. तेव्हा आपण बंधाऱ्यांवर सिमेंट बंधाऱ्याचे जाळे बांधले तर आपल्याला पाण्याच्या बाबतीत दिलासा मिळू शकेल.

माझी माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना एक विनंती आहे. आज महाराष्ट्रामध्ये फक्त 18 टक्के सिंचन झालेले आहे. देशात 52 टक्के सिंचन आहे. या 18 टक्क्यांपैकी पश्चिम महाराष्ट्रात किती टक्के सिचंन झाले आहे आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये किती टक्के सिंचन झालेले आहे ? आपण मंत्री असल्यामुळे काहीच बोलू शकणार नाही. सर्व भागात समान न्याय देण्याची घोषणा आणि आश्वासने आपण दिलेली आहेत. तेव्हा आपल्याच आश्वासनाला या शासनाने हरताळ फासण्याचे काम केले आहे. 18 टक्क्यांपैकी जवळ जवळ 15 टक्के पाणी हे पश्चिम महाराष्ट्रामध्ये केवळ ऊसासाठी जात आहे तर 3 टक्के पाणी उर्वरित महाराष्ट्राच्या वाट्याला येत आहे. याचा अर्थ असा होतो की, पश्चिम महाराष्ट्र म्हणजे शासन, नव्हे तशी व्याख्याच आज झाली आहे. त्याला कारण बहुतांशी मंत्री हे पश्चिम महाराष्ट्रातीलच आहेत. आम्ही मराठवाड्यात गेल्यानंतर ऐकायला मिळते की, आम्ही महाराष्ट्रात उगाचच आलो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस सभागृहात आल्या की "जय विदर्भ" बोलून आमच्या जखमेवर मीठ चोळतात. या भावना कोण निर्माण करते, कोणामुळे हे होते ? आम्ही सर्वांना समान न्याय देतो असे हे सरकार म्हणत आहे परंतु आपल्या समोर पाण्याचे जीवंत उदाहरण आहे.

सभापती महोदय, केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार नेहमी सांगतात की, आता ऊसाला ठिबक सिंचन लावले पाहिजे. ठिबक सिंचन केले तर पाणी कमी लागेल. पाणी फुकट मिळते ना, मग ते पाहिजे तेवढे घ्या. आपणच महाराष्ट्राचे मालक आहात, राजे देखील तुम्हीच आहात.

सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये जवळपास पाच हजार कोल्हापुरी टाईप बंधारे आहेत. पण त्यातील एकाही बंधाऱ्याला दरवाजा बसविलेला नाही. पाऊस आला की सर्व पाणी वाहून जाते. मग हे बंधारे अधिकाऱ्यांसाठी, ठेकेदारांसाठी, मंत्र्यासाठी बांधले आहेत काय ? बंधाऱ्याला चार-पाच दरवाजे नाहीत हे आपण समजू शकतो. माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना माझी विनंती आहे की, या बंधाऱ्यांना तत्काळ दरवाजे बसवावेत आणि त्या कामासाठी निधी द्यावा. त्या पाच हजार बंधाऱ्यामध्ये पावसाळ्यात पडणारे पाणी अडविले तर त्या पाण्याचा उपयोग निश्चितपणे मराठवाड्याला होईल याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, आज दुष्काळाचे निकष काय आहेत ? रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून लोकांना कामे देणे हा एक उद्देश आहे. आज जवळपास 2 लाख 80 हजारच्या आसपास लोक रोजगारावर आहेत. 1972 च्या दुष्काळामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांनी सुरुवातीला 30 लाख लोकांना काम दिले होते. नंतर ती संख्या 48 लाखावर गेली होती. त्यांनी लोकांना डिसेंबर महिन्यात खडी फोडण्याचे काम दिले. पुढील दहा वर्षे ती खडी शिल्लक होती. सरकार हा दुष्काळ गांभीर्याने का घेत नाही ? 1972 च्या दुष्काळामध्ये 30 लाख लोकांना दिलेले काम देण्यात आले होते. आज आपण रोहयोच्या माध्यमातून 3 लाख लोकांना रोजगार देतो. आता लोकसंख्या वाढली आहे की कमी झाली आहे ? आपणास खडी फोडण्याचे काम देता येत नसेल तर अन्य कामे द्या. त्यावेळी देखील खडीची आवश्यकता नसताना खडी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

फोडण्याचे काम देण्यात आले होते. त्या वेळच्या मुख्यमंत्री महोदयांनी माणसे जगविण्याचे काम केले होते. तेव्हा आता आपणास माणसे जगवावयाची असतील तर आपण अन्य कामांवरील खर्च बंद केला पाहिजे.

सभापती महोदय, डीपीडीसीसाठी मिळणारा निधी काही ठराविक लोकांसाठी असतो. "जिसके हाथ मे लाठी उसकी भैस" असा प्रकार आहे. सर्व पैसा त्यांच्याकडे आहे. पालकमंत्री हेच, पैसे वाटणारे देखील हेच. तेव्हा यामध्ये काही बदल होईल की नाही ?

सभापती महोदय, पेयजलासाठी काय व्यवस्था केली ? माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, ज्या टँकरमधून पाणी पुरविले जाते त्या टँकरची काय अवस्था असते ते आपण पहावे. पाणी पुरवठा करणारे टँकी गंजलेले आहेत, फुटलेले आहेत अशा टँकरमधील पाणी शेवटच्या गावापर्यंत पोहोचते काय याची आपण माहिती घ्यावी आणि त्याप्रमाणे उपाय योजना कराव्यात अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, टँकर दिला म्हणजे त्या गावातील लोकांना पाणी मिळाले असे होत नाही. टँकर आल्यावर लोक कसे धावतात हे मघाशी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे. दुष्काळग्रस्त गावामध्ये टँकरने पाणी पुरवठा करताना त्याठिकाणी पाण्याच्या टाक्या बसवून त्यामध्ये पाणी सोडावे. बाजारात पाच-दहा हजार लीटरच्या प्लास्टिकच्या टाक्या मिळतात त्या आपण बसवाव्यात. जर मोठे गाव असेल तर त्या ठिकाणी दोन टाक्या बसवाव्यात. गावात टँकर आला की, स्त्री-पुरुष-मुले सर्वजण त्या टँकरच्या मागे धावतात आणि प्रसंगी जखमी होतात हे प्रकार टाकी बसविल्यामुळे थांबू शकतील. तेव्हा अशा प्रकारची उपाय योजना करावी अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी साही नाही

श्री.रामदास कदम....

महोदय, वीज बिलाच्या बाबतीत आपण ज्या सवलती देणार आहात त्या बाबत ठोस निर्णय झाला की नाही, त्या संदर्भातील अंमलबजावणी कधी पासून करणार आहात हे माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तरामध्ये सांगावे. महोदय, पाऊस पडेपर्यंत किंबहुना दुष्काळ संपेपर्यंत किमान दुष्काळग्रस्त भागातील एकाही शेतकऱ्यांची घरची आणि कृषी पंपाची वीज तोडली जाणार नाही असे जाहीर करावे. माननीय मदत व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या सारखे करु नये. ते प्रत्येक वेळा सांगतात की, मी अमुक विषयी आदेश दिले, तमुक विषयी आदेश दिले. परंतु त्याचा फारसा काही उपयोग होत नाही. मी पुन्हा एकदा मागणी करतो की, भविष्यात एकाही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापले जाणार नाही आणि कापल्यास तातडीने राजीनामा देईन हे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगावे. या दुष्काळाचे सरकारला किती गांभीर्य आहे हे या राज्यातील जनतेला कळू द्या. "दुध का दुध और पानी का पानी" होऊ द्या, नाही तर आता राजीनामा द्यायचा आणि पुढच्या अधिवेशनात बिनखात्याचे मंत्री म्हणून पुन्हा परतायचे हे योग्य नाही. कशासाठी हे करावे ? वाटेल ते झाले तरी चालेल परंतु लाल दिवा शाबूत राहिला पाहिजे, असे करता कामा नये. जर कोणाची काही हरकत असेल तर मी हे शब्द परत घेतो.

महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक आणि स्व.यशवंतराव चव्हाण यांनी दुष्काळी परिस्थितीत जे काही काम केले त्यातील किमान काही तरी कामे या सरकारने करावीत, अशी माझी विनंती आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, दुष्काळग्रस्त भागातील लोकांची वीज बिलाची थकबाकी आणि त्यांचे 100 टक्के कर्ज माफ करणार आहात की नाही ? मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, कृपया आपण शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळू नका. कोणत्याही परिस्थितीत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ न चोळता त्यांना 100 टक्के कर्ज माफी करण्याची भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी घ्यावी. मी तर म्हणेन की, कोणत्याही परिस्थितीत दुष्काळग्रस्त भागातील सर्व शेतकऱ्यांची कर्ज माफी झालीच पाहिजे. नाही तर शेतकरी रस्त्यावर उतरुन तुम्हाला लाल दिव्याच्या गाडीत फिरु देणार नाहीत. आपण फार अडचणीत याल. आपण हे लक्षात ठेवावे की, आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून या ठिकाणी बसला आहात. शेतकऱ्यांच्या मतावर आपण निवडून आला आहात. निदान या बाबतची तरी जाणीव ठेवावी. महोदय, शेतसारा माफ झाला पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक फी माफीचा निर्णय होणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

आवश्यक आहे. तसेच चारा छावण्यामध्ये जो भ्रष्टाचार झाला त्याची चौकशी झाली पाहिजे. यापुढे असा भ्रष्टाचार होणार नाही या बाबत सरकार काय उपाययोजना करणार आहे हे माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे.

महोदय, महाराष्ट्रातील पाटबंधारे प्रकल्प म्हणजे राजाश्रय असलेला, मोठा पैसा उपसा महाउद्योग आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या सरकारला केवळ मोठी धरणे हवी आहेत, परंतु कालव्यांची कामे नकोत. कारण कालव्यातून कमी पैसा मिळतो. मोठ्या धरणातून जास्त पैसे मिळतात. आज राज्यात बहुतांश कालव्याची कामे शिल्लक आहेत. ती कामे सरकारकडून पूर्ण केली जाणार आहेत की नाहीत, त्या कामांसाठी राज्य सरकार तत्काळ निधी देणार आहे की नाही, किंबहुना त्या निधीचे नियोजन व्यवस्थित होण्यासाठी काय पाऊले उचलली जाणार आहेत, हे या ठिकाणी स्पष्ट होणे गरजेचे आहे.

महोदय, सबंध राज्यात एकूण 475 सिंचन प्रकल्प आहेत. या प्रकल्पांमध्ये 15,653 द.ल.घ.मी. पाणी साठते. परंतु आज महाराष्ट्रात आणि विशेषतः दुष्काळी भागात केवळ 35 टक्के सिंचन शिल्लक आहे.

(बेल वाजविण्यात आली.)

सभापती महोदय, माझी विनंती आहे की, कृपया आपण भाषण संपविण्याची बेल पुन्हा वाजवू नका. हा विषय महत्त्वाचा असल्यामुळे या प्रस्तावावरील चर्चेसाठी दोन दिवस वेळ दिला आहे. कृपया मला बोलू द्या.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रामदास कदम ....

यावेळी पाऊस पडल्यानंतर पाण्याचा साठा अधिक व्हावा यासाठी आपण या सर्व उपाययोजना करणार की नाही याचा खुलासा उत्तरामध्ये आला पाहिजे. दुष्काळग्रस्त गावांमध्ये शिवारामध्ये पडलेल्या पावसाच्या पाण्याचा थेंब न थेंब अडवून जर जमिनीखाली पाणी गेले तरच भविष्यामध्ये पाण्याची पातळी वाढणार आहे. अन्यथा आपण जेवढे बोअर घेणार तेवढा भविष्यामध्ये पाण्याचा दुष्काळ अधिक वाढणार आहे. त्या अनुषंगाने शासन काय उपाययोजना करणार आहे ?

सभापती महोदय, एका सांगोला तालुक्यामध्ये 72 छावण्यांमध्ये 7200 जनावरे बोगस दाखविली गेली. मी जबाबदारीने बोलत आहे. या दुष्काळामध्ये देखील कसे प्रकार होत आहेत या बाबत मी सांगोला तालुक्याचे एक लहानसे उदाहरण दिले. त्या ठिकाणी 72 छावण्यामध्ये 7200 बोगस जनावरे दाखवून शासनाचे पैसे लाटले. ही माणसे होऊ शकत नाहीत. त्यांना आपण माणसांची उपमा देऊ शकणार नाही. दुष्काळामध्ये इतर लोकांना मदत करण्याऐवजी दुष्काळाच्या नावाने पैसे खाऊन आपले पोट भरणारी ही अवलाद आहे. त्यांच्या बाबतीत शासन कारवाई करणार की नाही ? त्यामध्ये आमदार असतील, खासदार असतील, जिल्हा परिषदेचे सभापती असतील, पंचायत समितीचे सभापती असतील, कोणताही नेता असेल, राष्ट्रवादीचे जिल्हा प्रमुख असतील, जे कोणी असतील त्यांचा पक्ष न पाहता अशा बिनडोक लोकांना, स्वार्थी लोकांना, भ्रष्टाचारी लोकांना जेलमध्ये पाठवावे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोकांना सगळ्या छावण्या दिल्या.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, राष्ट्रवादीच्या लोकांनाच छावण्या दिलेल्या आहेत असे चुकीचे रेकॉर्डवर आलेले आहे.

श्री. रामदास कदम : कोणत्याही पक्षाचा असला तरी कारवाई करावी असे मी म्हटले. आपण दोघे भाऊ भाऊ आणि दोघे मिळून वाटून घेऊ असेच चालले आहे की नाही ? यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्या बाबतीत मी म्हणालो. त्यांची चौकशी का होत नाही ? अचानक तपासणी झाल्यानंतर जर हे सिध्द झाले की, 7200 जनावरे बोगस दिसून आली तर त्याची चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई का होत नाही ? याला कोण जबाबदार आहे ? जेवढी ती माणसे जबाबदार आहेत तेवढेच हे शासन सुध्दा जबाबदार आहे. मग हे शासन भ्रष्टाचारी आहे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

असे मी म्हणेन. कारण भ्रष्टाचाराला साथ देणारा, गुन्हेगाराला साथ देणारा त्यापेक्षाही मोठा गुन्हेगार असतो. तसे हे सरकार गुन्हेगार आहे असे मी म्हणेन. या भ्रष्ट शासनाला महाराष्ट्रातील जनता योग्य वेळी जाब विचारील पण आज ती वेळ नाही. या भ्रष्टाचारामध्ये जे जे लोक गुंतलेले आहेत त्या सर्वांवर कारवाई व्हावी अशी माझी विनंती आहे. टँकरमध्ये जसे माफिया आहेत तसे आता जे छावणी माफिया आहेत त्यांना शासन कसे पकडणार आणि त्यांच्या बाबतीत काय उपाययोजना करणार, त्यांच्यावर कशा पध्दतीने कारवाई करणार हे उत्तरात सांगावे. हे सर्व पैसे केंद्र शासन देते आणि हे लोक ते पैसे लुटून आपल्या घरी घेऊन जात आहेत. दुष्काळग्रस्त लोक ओरडत आहेत, मरत आहेत. त्या दृष्टीने कारवाई करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, या छावण्या आहेत की, कोंडवाडे आहेत असा प्रश्न येतो. आपल्या नियमाप्रमाणे एका छावणीमध्ये 500 जनावरे असली पाहिजे. आता एका छावणीमध्ये किती जनावरे आहेत, त्यांना काय खावयास मिळते याची चौकशी करावी. त्यातून आपल्याला अधिक माहिती मिळेल. आपण पाऊस पडेपर्यंत कदाचित जनावरांना ठेवाल पण सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी जो मुद्दा मांडला तोच मुद्दा मी मांडतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

किमान यावेळी छावणीनिहाय पैसे न देता वैयक्तिकरित्या शेतकऱ्यांना पैसा दिला तर तो निश्चितपणे शेतकऱ्यांच्या कामाला येईल. चोरांच्या घरात पैसा जाण्यापेक्षा, भ्रष्टाचाऱ्यांच्या घशात पैसा जाण्यापेक्षा हा पैसा शेतकऱ्यांच्या हाती दिला तर तो सत्कारणी लागेल. जोपर्यंत शासनाची नीती ठरत नाही, उपाययोजना निश्चित होत नाहीत तोपर्यंत दुष्काळ निवारण करणे हा फक्त कार्यकर्ते व ठेकेदार यांना पोसण्याचा धंदा होईल, एवढेच मला स्पष्टपणे सांगावयाचे आहे. एका बाजूला काही लोक छावण्यांमध्ये जनावरे ठेवत आहेत आणि स्वत:ची जनावरे सांभाळण्यासाठी तेथे थांबत आहेत. काही महिला व पुरुष त्या छावण्यांजवळ दिवस रात्र थांबत आहेत. घरातील माणसे त्या लोकांना खाण्यासाठी डबा घेऊन येत आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना डायरेक्ट नगदी मदत केली तर ही जनावरे त्यांना स्वत:च्या घरी ठेवता येतील. त्यामुळे शेतकऱ्यांची परवड थांबेल, त्यादृष्टीने शासनाने निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, आज केंद्र शासनाने राज्य शासनाला कर्ज देण्याचे नाकारलेले आहे. राज्याच्या डोक्यावर जवळजवळ 3 लाख हजार कोटी रुपये इतके कर्ज झालेले आहे. महाराष्ट्र शासन पूर्णपणे कर्जबाजारी झालेले आहे. युतीच्या काळात राज्य सरकारवर 18 हजार कोटींचे कर्ज झाले होते. त्यावेळी मुंबई-पुणे हाय-वे, पाण्याच्या योजना, मोफत घरे, शौचालये, रस्ते, मुंबईत 55 उड्डाण पूल तयार केले. त्यासाठी जे कर्ज काढले होते त्याचा हिशोब दिलेला आहे. परंतु या शासनाने 3 लाख हजार कोटी रुपयांचे जे कर्ज काढले आहे त्याचा पैसा कोठे गेला ते कळत नाही. या कर्जाबाबत श्वेत पत्रिका काढली जात नाही. सिंचनामध्ये घोटाळा झाला आहे तसा हा देखील मोठा घोटाळा आहे. म्हणून राज्य शासनाला केंद्र सरकार कर्ज काढू देत नाही. कर्ज काढावयाचे आणि स्वाहा करावयाचे असा प्रकार सुरु आहे. या शासनाची पत संपलेली आहे. या दुष्काळासाठी नेमकी कशा प्रकारची उपाययोजना केली जाणार आहे ते शासनाने सांगावे.

सभापती महोदय, अनेक ठिकाणच्या मोसंबीच्या बागा जळून गेल्या आहेत. मोसंबीची एक बाग तयार करण्यासाठी 4 ते 5 वर्षे लागतात. पण या बागा जळून गेल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना श्रीगणेशा पासून सुरुवात करावी लागणार आहे. शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी कशा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.रामदास कदम....

प्रकारच्या उपाययोजना केल्या जाणार आहेत ते सांगणे आवश्यक आहे. एका बाजूला मराठवाड्यात, पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुक्यांमध्ये दुष्काळ पडलेला आहे. त्या भागाला समान न्याय मिळाला पाहिजे. या चर्चेनंतर माननीय राज्यमंत्री श्री.प्रकाश सोळंके किंवा माननीय मुख्यमंत्री यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये पश्चिम महाराष्ट्रात किती छावण्या उघडल्या, मराठवाड्यामध्ये किती छावण्या उघडल्या ते सांगितले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये आणि मराठवाड्यामध्ये किती पैसा खर्च झाला ते सांगितले पाहिजे. त्यामुळे हे सरकार नेमके कोणाच्या बाजूचे आहे ते तरी कळेल. केवळ पश्चिम महाराष्ट्रात निधी खर्च होत आहे, मंत्र्यांच्या मतदार संघातच अधिक खर्च होत आहे. ज्यांच्या घरामध्ये 15-20 वर्षांपासून लाल दिव्यांच्या गाड्या आहेत, त्यांच्या गाड्यासोबत अजून 10-15 गाड्या असतात. म्हणून शासनाकडून झालेल्या खर्चाची आकडेवारी सांगितली गेली पाहिजे. मराठवाड्यासाठी व पश्चिम महाराष्ट्रात किती खर्च केला ते सांगितले पाहिजे. माण, खटाव अशी तालुकानिहाय माहिती सांगावी. ज्या भागात विरोधी पक्षाचे सदस्य असतील तेथे खर्च केला जाणार नाही, असे होता कामा नये.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुराला आज किती रुपये मजुरी मिळते ? ही मजुरी कधी आणि किती वाढविण्यात येणार आहे याचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी द्यावे. रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजुराला कमीत कमी 300 रुपये तरी मजुरी द्यावी अशी माझी मागणी आहे. त्या मजुराची आणि त्या कुटुंबीयांची पोटाची आग क्षमेल इतकी तरी मजुरी त्याला मिळाली पाहिजे. माझी शासनकर्त्यांना विनंती आहे की पोटाची आग काय असते हे समजून घेण्यासाठी त्यांनी एक दिवस तरी उपवास करुन पहावा. ..(अडथळा).. ही मंडळी पंढरीला जाण्याचे नाटक करीत असतात. पंढरीच्या पांडुरंगालासुध्दा हे फसवितात. तर सामान्य माणसाची काय व्यथा.

सभापती महोदय, विजेच्या भारनियमनाबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. संभाजीनगरमध्ये तसेच दुष्काळी भागामध्ये ज्या ज्या एमआयडीसी आहेत त्या एमआयडीसीतील कामगारांना वीज नसल्यामुळे 8-8 दिवस सुट्टी दिली जात आहे. बेरोजगारी वाढत आहे. या बाबतीत शासन काय उपाययोजना करणार आहे ? मघाशी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी बिस्लेरीच्या कंपनीला किती पाणी दिले जाते, दारुच्या कंपन्यांना किती पाणी दिले जाते हे सांगितले. आता संभाजीनगर आणि अन्य दुष्काळी भागातील ज्या एमआयडीसी पाण्याअभावी बंद पडत आहेत त्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे हे स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, साईबाबांची शिर्डी हे आंतरराष्ट्री तीर्थक्षेत्र आहे. देशविदेशातून भाविक शिर्डीला येत असतात. आज शिर्डीमध्ये पाणी नाही. शिर्डी देवस्थानाने दुष्काळ निवारणासाठी निधी दिला. शिर्डी देवस्थानाने स्वखर्चाने पाणी आणण्याचा प्रस्ताव शासनाकडे दोन वर्षापूर्वी दिलेला आहे. त्या प्रस्तावाकडे पाहाण्यासाठी शासनाला वेळ नाही. शिर्डी येथे 100 कोटी रु. खर्च करुन भक्तनिवास बांधलेले आहे. परंतु पाण्याअभावी ते सुरु झालेले नाही. पाण्याच्या प्रस्तावाची फाईल पाहाण्यासाठी शासनाला वेळ नाही. मग हे शासन कुणासाठी आहे ? दुष्काळ निवारणासाठी शिर्डी देवस्थानाने, महालक्ष्मी देवस्थानाने निधी दिला, आमदारांनी देखील आपला महिन्याचा पगार दिला. आज शिर्डी देवस्थानामध्ये पाणी नसल्यामुळे ताटामध्ये जेवण न देता ते पत्रावळीवर दिले जात आहे. या शिर्डी देवस्थानाने स्वखर्चाने पाणी आणण्याचा जो प्रस्ताव दिलेला आहे त्यास शासन मंजुरी देणार आहे की नाही हे देखील या निमित्ताने स्पष्ट झाले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी भागातील लोकांचे स्थलांतर होऊ देणार नाही असे सांगितले. परंतु कर्जत तालुक्यातील एका गावातील 800 लोकांनी स्थलांतर केलेले आहे. या बाबतीत सरकारची काय जबाबदारी आहे ?

नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

हे सरकार झोपले आहे काय, सरकार म्हणून तुम्ही काय जबाबदारी स्वीकारली आहे? निवडणुका कशा जिंकावयाच्या एवढयाच गोष्टीची यांना माहिती आहे. कोटयावधी रुपये कमवावयाचे, त्यातील थोडेसे पैसे मतदाराला वाटावयाचे आणि सत्तेवर यावयाचे. तुमचे निवडणुकीचे गमक आम्हाला कळलेले आहे. दुष्काळग्रस्त भागातून एकही कुटुंब स्थलांतरीत होणार नाही. प्रत्येक गावातील ग्रामस्थांना आम्ही अन्न व पाणी उपलब्ध करुन देऊ अशा प्रकारचे वचन माननीय मंत्री महोदय उत्तराच्या भाषणात देणार आहेत काय ? या संदर्भात काय उपाययोजना केल्या जाणार आहेत या बाबतची देखील माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावी.

सभापती महोदय, आज एका बाजूला आपल्याकडे पैसे नाहीत. हे शासन भिकेचा कटोरा घेऊन दिल्लीत जाऊन बसले आहे. दुसऱ्या बाजूला राज्यातील नगरपालिका आणि महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांकडे एकूण 3272 कोटी रुपये पाणी पट्टी थकीत आहे. दुष्काळग्रस्त भागासाठी पैसा नाही म्हणून सांगितले जाते. नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदा राजकीय पुढाऱ्यांच्याच आहेत. या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पाणी पट्टी वसूल का होत नाही ? अकोला-350 कोटी, नगर 234 कोटी, नागपूर 194 कोटी, लातूर 186 कोटी, धुळे 175 कोटी, जालना 101 कोटी, कोल्हापूर 95 कोटी, बुलढाणा 80 कोटी, परभणी 65 कोटी आणि उल्हासनगर 63 कोटी अशी एकूण 3273 कोटी रुपये पाणी पट्टी थकबाकी आहे. या संस्थांकडून ही पाणी पट्टी वसूल झाली असती तर शासनाला भिकेचा कटोरा घेऊन दिल्लीत जाण्याची गरज भासली नसती. सदर वसुलीच्या बाबतीत व्यवस्थितपणे नियोजन केले पाहिजे व ती वसुली तातडीने करुन तो निधी दुष्काळ निर्मूलनासाठी वापरला गेला पाहिजे.

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमात 87444 गाव आणि वाडयांचा समावेश आहे. पेयजलाचा 70 टक्के निधी खर्चा विना पडून आहे. या कार्यक्रमासाठी 2012-13 मध्ये 1841 कोटी रुपयांचा निधी मिळाला होता. प्रत्यक्षात निधी 722 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. या पेयजल कार्यक्रमावर फक्त 203 कोटी रुपये खर्च केला गेला. म्हणजे फक्त 30 टक्के खर्च केला गेला आहे. 2011-12 या वर्षात पेयजल कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र सरकारकडून निधी प्राप्त झाला होता, त्यातील 1 हजार कोटी रुपयांचा निधी शिल्लक आहे. ज्या कामासाठी केंद्र शासनाने निधी दिलेला असतो, तो निधी त्या कामांवर खर्च करीत नाही. केंद्र शासन सांगते की,

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

आम्हाला खर्चाचा हिशोब प्रथम द्यावा. त्यानंतर दुसऱ्या वर्षाचा निधी आम्ही तुम्हाला रिलीज करु. 2011-12 आणि 2012-13 या दोन वर्षात केंद्र शासनाकडून पेयजल कार्यक्रक राबविण्यासाठी जो निधी प्राप्त झाला होता, त्यातील 1 हजार कोटी रुपयांचा निधी शिल्लक राहिलेला आहे. तो निधी खरोखरच शिल्लक आहे की कोणाच्या तरी घशात गेला या बाबतचा खुलासा माननीय मुख्यमंत्र्यांनी करावा अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

सभापती महोदय, दुष्काळाचे संकट हे राज्यावर आलेले मोठे संकट आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक माणसावर आलेले हे संकट आहे. हे संकट कोणत्या पक्षाचे नाही. आमच्या शिवसेना पक्षाचे पक्ष प्रमुख माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांना मी धन्यवाद देईन. त्यांचे मी आभार मानतो. आम्ही त्यांना सांगितले की,दुष्काळासाठी आमदार एक महिन्याचा पगार देत आहोत. त्यांनी विचारले की, आमदारांना एक महिन्याचे वेतन आणि भत्ते असे मिळून किती रुपये मिळतात. आम्ही त्यांना सांगितले की, साधारणत: एका महिन्यात आमदारांना वेतन आणि भत्ते मिळून 75 हजार रुपये मिळतात. या बाबतीत पक्ष कार्यालयात एका मिनिटात निर्णय झाला की, शिवसेनेच्या आमदारांनी एक महिन्याचे वेतन आणि संपूर्ण भत्ते यातून मिळणारे 75 हजार रुपये पक्ष कार्यालयाकडे आणून द्यावे. हे पैसे एकत्र झाल्यानंतर शिवसेना पक्ष म्हणून काही दुष्काळी भागातील काही गावे दत्तक घेईल. त्या गावांमध्ये जाऊन दुष्काळग्रस्त लोकांना जेवढी मदत करता येईल तेवढी करण्याचा आम्ही प्रयत्न करु. (अडथळा) सदर पैसे मिळतात ते राज्यातील जनतेचे आहेत.

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शिघ्रलेखासाठी नाही

श्री.रामदास कदम.....

शेतकऱ्यांच्या घामाचे पैसे आहेत. याची काळजी कोणी घ्यायची? छावण्यांच्या माध्यमातून भ्रष्टाचार होत असेल, चाऱ्यांमध्ये भ्रष्टाचार होत असेल, शेणामध्ये भ्रष्टाचार होत असेल, शेण खाल्ले जात असेल तर काळजी कोणी घ्यायची? दुष्काळाचे संकट हे कोणत्या राजकीय पक्षाचे संकट नाही. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकावर आलेले हे संकट आहे. राज्य सरकार चांगले काम हातामध्ये घेईल तेव्हा पक्ष बाजूला ठेवून दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी आम्ही सरकारच्या पाठीशी उभे राहू. दुष्काळासाठी निधी नाही असे सरकारने सांगू नये. तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक, स्व.यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून या दुष्काळाला सामोरे जा आणि दाखवून द्या की, आम्ही दुष्काळावर मात करु शकतो. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दुष्काळासंबंधीच्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 1972 चा दुष्काळ हा अन्नाबाबतचा होता. 1972 च्या दुष्काळामध्ये पाणी टंचाई नव्हती. लोकांना खायला पुरेसे अन्न उपलब्ध नव्हते. अमेरिकेतून मिलो आयात केला जायचा. तो मिलो पदरात पाडून घेण्यासाठी लोकांच्या रेशन दुकानाबाहेर रांगा लागलेल्या असायच्या. कोकणामध्ये सुध्दा हीच परिस्थिती होती. 1972 चा दुष्काळ आणि आताचा दुष्काळ यामध्ये फरक करावा लागेल.

सभापती महोदय, 1972 चा दुष्काळ मी सांगली जिल्हयात अनुभवला होता. त्यावेळी मी 16 वर्षाचा युवक होतो. त्या काळात सांगली जिल्हयामध्ये तीव्र दुष्काळ पहावयास मिळाला. परंतु त्यावेळी लोकांना प्यायला मुबलक पाणी उपलब्ध होते. आजचा दुष्काळ वेगळा आहे. आज कित्येक भागात लोकांना प्यायला पाणी उपलब्ध नाही. लोक पाण्यासाठी वणवण फिरत आहेत, तडफडत आहेत.

सभापती महोदय, 1972 साली मागेल त्याला काम मिळाले पाहिजे यासाठी मी आंदोलनामध्ये सहभागी झालो होतो. हजारो लोक कामाची मागणी करीत रस्त्यावर उतरले होते. लोक अन्नासाठी दारोदार फिरत असल्याचे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. इस्लामपूर येथे वैराग गावामध्ये शेतकऱ्यांवर गोळीबार झाला होता. माझ्या पक्षाने 6-7 हुतात्मे दिले.

सभापती महोदय, आज शासनाकडे दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी कोणतेही नियोजन नाही. 1972 साली पदवीधर झालेली मुले रोजगार हमी योजनेच्या कामावर खडी फोडण्याचे काम करीत असत. रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणारा एक गायकवाड नावाचा तरुण, ज्याला अण्णासाहेब गोवारी यांनी निवडणुकीत फॉर्म भरायला लावला आणि पाच वेळा आमदार म्हणून निवडून आणले. त्या काळात लोकांना प्यायला पाणी उपलब्ध होते. आज परिस्थिती काय आहे? प्यायला पाणी नाही. त्या काळातील काँग्रेस पक्षाचे मंत्री यांच्याशी माझी भेट झाली. ते म्हणाले, स्व.यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना 1962 साली कॅबिनेटपूर्वी व अधिवेशन सुरु होण्यापूर्वी तयारीच्या दृष्टीने सायंकाळी आम्हा मंत्र्यांची बैठक घ्यायचे. किती प्रश्न आहेत, कोणते विषय आहेत, कॅबिनेटमध्ये कसे बोलायचे याबाबत मार्गदर्शन करायचे. चुकीचे वागलो तर विद्यार्थ्यांप्रमाणे आम्हाला जाब द्यावा लागत असे. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, आज राज्यामध्ये काय चालले आहे? मंत्रिमंडळामध्ये अर्थसंकल्पातील निधी कसा ओरबाडून घ्यायचा याबद्दल मंत्र्यांचे आपापसात वादविवाद होतात. दुष्काळाची कोणाला चिंता पडलेली नाही. आपल्याला मतदारसंघात अधिकाधिक निधी कसा आणता येईल यातच सर्व मंत्री दंग आहेत.

नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील .....

आम्ही पेपरमधून आणि मीडियामधून हे सर्व पाहत आहोत. सभागृहात जे मंत्री काम करतात त्या सर्व मंत्र्यांनी गुप्ततेची शपथ घेतलेली आहे. मंत्र्यांकडे जो अजेंडा येत असतो तो अजेंडा कोणालाही दाखवायचा नसतो. परंतु कॅबिनेटची बैठक झाल्याबरोबर त्या ठिकाणी काय झाले याची सविस्तर माहिती मीडियावर येत असते. दुष्काळाच्या विषयाच्या संदर्भात मंत्रिमंडळात चर्चा होत असल्याचे आम्हाला दिसून येत नाही हेच खरे या महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये आमदारांचा पक्ष बघून निधीचे वाटप केले जाते. मी पहिल्यापासून मंत्र्यांना कमीतकमी भेटतो, माननीय मुख्यमंत्र्यांना आतापर्यंत मी केवळ 5-6 वेळेसच भेटलो आहे. माननीय मंत्र्यांना कमीतकमी भेटणारा आणि कमी त्रास देणारा मी एकमेव आमदार आहे.

सभापती महोदय, गेल्या 13 वर्षाच्या कारकिर्दीत मी या सभागृहात केवळ 8 वेळा गैर हजर राहिलेलो आहे. सभागृहाच्या कामकाजात पूर्णवेळ भाग घेणारा एक सदस्य आहे हे मी अभिमानाने सांगतो.

मला जालन्याचे काँग्रेसचे आमदार भेटले होते त्यांनी मला सांगितले की, जयंत पाटील साहेब मी काही दिवसात रस्त्यावर उतरणार आहे. यासंदर्भातील अधिकची माहिती माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दिलेली आहे. उस्मानाबाद जिल्हयामध्ये पाण्याच्या थकबाकीला हप्ते पाडून दिले जातात परंतु मी काँग्रेसचा आमदार असल्यामुळे माझ्या नगरपालिकेला पाण्याचे हप्ते पाडून दिले जात नाही असे त्यांनी मला सांगितले होते. पाण्याचे हप्ते पाडून न दिल्यामुळे माझे मतदार मला मतदार संघात बसू देत नाहीत. गेल्या 15 दिवसापासून मी जालना ते मुंबई रोज फेऱ्या मारत आहे. उद्या मी जालन्याला गेल्यानंतर रस्त्यावर उतरणार आहे असे त्यांनी मला सांगितिले होते.

सभापती महोदय, हे दु:ख माझे नाही तर काँग्रेस पक्षाच्या एका आमदाराचे आहे. काँग्रेसचे आमदार असले तरी पैसे मिळत नाही परंतु असा प्रकार माननीय यशवंतराव चव्हाण व माननीय वसंतराव नाईक यांनी कधी केला नाही. त्यांनी पक्षभेद कधीही केला नव्हता तर त्यांनी फक्त काम करणारी व्यक्ती बघितली होती.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील .....

सभापती महोदय, माननीय यशवंतराव व माननीय वसंतराव नाईकांच्या वेळेस खालच्या सभागृहात विरोधी पक्षाचे केवळ 40 आमदार असत व बाकी सर्व एकमुखी सत्ता असायची. परंतु त्यावेळेस तेजस्वी काम करणारी एक वेगळी टीम होती. ..2..

सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात या ठिकाणी ज्या गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे त्या पध्दतीने होत नाही. दुष्काळाचे या राज्य शासनाला गांभीर्य नाही हे सत्य आहे. आजच्या दुष्काळी चर्चेच्या निमित्ताने आपल्या दुष्काळी जनतेला आपण काही देऊ शकू असे मला तरी या चर्चेतून वाटत नाही. आजची दुष्काळाची चर्चा ही सदर भरणारी आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मी दुष्काळी भागांना भेटी दिलेल्या आहेत, भेटी देत असतांना मी कधी फोटो काढत नाही किंवा मीडिया समोर जात नाही. मी कशा पध्दतीने काम करतो हे कधी सांगत नाही. काम हे बांधिलकीने करावयाचे असते अशा विचाराने आम्ही काम करणारे कार्यकर्ते आहोत. आदिवासींच्या घरात भाकरी खाणारा मी एक सामान्य कार्यकर्ता आहे. आम्हाला कधी बिस्लेरीची बाटली लागली नाही.

सभापती महोदय, मराठवाडयाच्या आमदारांना आज विधानमंडळाच्या पायरीवर बसावे लागले हे मी बघितले आहे.

सभापती महोदय, मी सीपीआयच्या मोर्चासाठी औरंगाबाद येथे गेलो होतो. माझ्या डाव्या आघाडीचे कार्यकर्ते, सीपीआयचे राज्य चिटणीस श्री. कांगो यांच्या आणि माझ्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला होता. रोजगार हमी योजनेचे पैसे वेळेवर मिळत नसल्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना सभ्ांगृहात हा विषय काढण्ार आहे याची कल्पना दिली होती.

यानंतर श्री. भारवि....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

औरंगाबाद मध्ये सन 2009-2010 सालातील 1100 मजुरांची 4 कोटी रूपयांची मजुरी दिली गेली नाही. ही मजुरी ठेकेदाराने खाल्ली आहे. ठेकेदाराने मजुराला मजुरी दिलेली नाही. मजुरांची खाती बँकेत किंवा पोस्टात उघडणे अनिवार्य आहे. या ठेकेदाराने काय केले ? त्याने सगळी खाती पोस्टात उघडली. कारण बँकेमध्ये केवायसी फॉर्म भरून द्यावा लागतो. तो माणूस कुठला आहे, कुठल्या गावचा इत्यादी सगळी माहिती भरून द्यावी लागते. एवढेच नव्हे तर त्यासाठी साक्षीदार असणे देखील महत्त्वाचे आहे. त्याचा फोटो देखील असणे आवश्यक आहे. पोस्टामध्ये खाती उघडून त्यावर खोटे फोटो लावून 4 कोटी रूपये ठेकेदाराने खाल्ले आहेत. खरे म्हणजे रोहयोची कामे कॉन्ट्रॅक्टरला देता येत नाही. माझ्याकडे सगळा पत्रव्यवहार आहे. आम्ही तहसीलदारांना भेटलो. एवढेच नव्हे तर आम्ही परवा आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढला. त्यावेळी आम्ही मांडलेल्या समस्या सर्व खऱ्या आहेत, मजुरांना मजुरी दिली जाईल अशा प्रकारचे आश्वासन मला देण्यात आले. ठेकेदाराने बँकेमध्ये खाते न उघडता पोस्टात खाती उघडली. पोस्टामध्ये श्री.रावते साहेबांचा फोटो आणि श्री.जयंत पाटील यांचे नाव नोंदविण्यात आले. अशा प्रकारने त्याने चार कोटी रूपये काढलेले आहेत. त्यासंबंधी कुठलाही निर्णय दिला जात नाही. गेल्या नागपूर अधिवेशनामध्ये खालच्या सभागृहामध्ये माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांनी प्रश्न विचारला असता माननीय गृह मंत्र्यांनी उत्तर दिले की, संबंधित गुन्हेगारांना बेड्या घालू. ताबडतोब त्यांचा बंदोबस्त करून मुसक्या आवळण्यात येतील. पण अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. अशी परिस्थिती सध्या आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

मराठवाड्यातील आयुक्तांनी काय सांगितले ते देखील मी सांगातो. ते म्हणाले की, केंद्राचा निधी मराठवाड्याच्या वाट्याला येत नाही. तो निधी आम्हाला मिळत नाही म्हणून मराठवाड्यासाठी स्वतंत्र निधीची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील टंचाई निवारण्यासाठी 240 कोटी रूपये, शहरी भागातील टंचाई निवारण्यासाठी 115 कोटी रूपये, नगर परिषद भागातील टंचाई निवारण्यासाठी 20 कोटी रूपये, जनावरांच्या छावण्यासाठी 150 कोटी रूपये, फळबागांच्या नुकसान भरपाईसाठी 30 कोटी रूपये, पिकाच्या संरक्षणासाठी 100 कोटी रूपये, शेततळ्यांच्या कामासाठी 139 कोटी रूपये, गेट दुरूस्तीसाठी 7 कोटी रूपये, पाण्याच्या टाक्या खरेदी करण्यासाठी 15 कोटी रूपये, सिमेंटच्या बंधऱ्यासाठी 100 कोटी रूपये, जलसंधारणाच्या कामासाठी 100 कोटी रूपये असे मिळून तातडीने 1100 कोटी रूपये स्वतंत्र मराठवाड्यासाठी द्यावेत अशी मागणी औरंबादच्या आयुक्तांनी केली आहे.

सभापती महोदय, आज बीड जिल्ह्यामध्ये काय परिस्थिती आहे ? बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात आज एक लाखाच्यावर, पाटोद्यामध्ये 85 हजाराच्यावर, सिल्लोड मध्ये 60 हजाराच्यावर जनावरे छावण्यांमध्ये आहेत. गेवराईमध्ये 1 लाख 30 हजार जनावरे आहेत. जिल्ह्यात 5 लाखाहून अधिक जनावरे असताना केवळ 30 छावण्या बीड जिल्ह्यामध्ये आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांच्या सांगली जिल्ह्यात जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, खानापूर इत्यादी तालुक्यातील मनुष्य व जनावरांची पाण्याअभावी होरपळ सुरू आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आमच्याकडे अजून एकही छावणी सुरू झालेली नाही. 90 हजार जनावरे आमच्या पूर्ण तालुक्यात नाहीत ?

श्री.जयंत प्र.पाटील : त्यासाठीच मी छावणीची मागणी करीत आहे. सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी त्यांचे नाव घेतलेले नाही. मी आकडेवारी सांगताना सन्माननीय सदस्य सभागृहात नव्हते. त्यामुळे ती आकडेवारी सांगून मी सभागृहाचा विनाकारण वेळ घेणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.अजित....

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, मी या ठिकाणी मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती सांगत आहे. मी स्वत: त्या ठिकाणी गेलो होतो. मी तेथील आयुक्तांशी जी चर्चा केली ती येथे सांगत आहे. जर ती चुकीची असेल तर ती मी मागे घेईन. आपण आयुक्तांकडून खुलासा मागवावा. जर चुकीची माहिती असेल तर मी येथे दिलगिरी व्यक्त करीन. माझे एवढेंच म्हणणे आहे की, राज्यामध्ये जो दुष्काळ पडलेला आहे तो निसर्ग निर्मित नसून मानव निर्मित आहे. या ठिकाणी सिंचन झाले नाही. पाण्याचे नियोजन बरोबर झाले नाही म्हणून हा दुष्काळ निर्माण झालेला आहे. 1972 मध्ये या राज्यामध्ये काय होते आणि आज काय आहे ? ज्या पध्दतीने येथे काम झालेले आहे त्यावर खऱ्या अर्थाने चर्चा केली पाहिजे. या संदर्भातील आकडेवारी माझ्याकडे आहे. काल मी उच्च न्यायालयात गेलो होतो. माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय आपणास सांगतो. या ठिकाणी चुकीच्या पध्दतीने नियोजन झालेले आहे. यासाठी लोकलेखा समितीसारखी खास वेगळी समिती विधिमंडळाने केली पाहिजे. सिंचनासाठी जो निधी प्राप्त होतो त्याचे कशाप्रकारे वाटप होते, कुठे खर्च होतो हे तपासण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे.

सभापती महोदय, मी एमएससी बँकेत वीस वर्षे संचालक म्हणून काम केलेले आहे. केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार हे दरवर्षी संचालकांशी चर्चा करायचे. सन 2004 मधील गोष्ट आहे. मी त्यांना एक प्रश्न विचारला होता, त्यावेळी त्यांनी उत्तर देताना सांगितले की, सन 2020 मध्ये पाण्यासाठी युध्द होईल. तसेच 2018 पर्यंत या देशात कोणताही 7/12 चा उतारा राहणार नाही. कारण सर्व जमीन ही एका ठराविक लोकांच्या मालकीची होईल. हे सर्व मी सांगत नसून केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी सांगितलेले आहे आणि आज हळूहळू तशी परिस्थिती होताना दिसत आहे. कोणाची किती जमीन आहे हे मला माहीत नाही. परंतु माननीय श्री.शरद पवार यांनी जे वक्तव्य केलेले होते ते खरे होताना दिसत आहे.

सभापती महोदय, दुष्काळ का पडतो हे मी सांगत आहे. माझे म्हणणे असे आहे की, दुष्काळ हा मानव निर्मित आहे. आपण जोपर्यंत पाण्याचे नियोजन करीत नाही. पाण्याचे योग्य वाटप करीत नाही, अडविलेले पाणी व्यवस्थित वापरत नाही तोपर्यंत कितीही पाऊस पडला तरी या ठिकाणी दुष्काळ पडेल असे माझे ठाम मत आहे. आज आपण पाण्याच्या नियोजना संदर्भातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

दृष्टीकोन बदलला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते कधी कधी सांगतात की, मतदारसंघ पाहून वाटप होते. व्यक्ती पाहून वाटप होते. तो कोणत्या पक्षाचा आहे हे पाहून वाटप होते. राज्याचा विचार करुन पाण्याच्या निधीचे वाटप आणि सिंचनाचे वाटप होत नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील....

या ठिकाणी बोलण्यावर मर्यादा आहेत. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, सिंचनाच्या बाबतीत मी या सभागृहात आणि बाहेरही बरेच बोललो आहे. आज पैसा नाही म्हणून सरकार तणतण करते, किंबहुना विवंचनेत आहे. असो.

महोदय, कोंडाणे धरणाचे काम रद्द केल्यामुळे एफ.ए.कन्स्ट्रक्शनने काल उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. आज वर्तमानपत्रातील पहिल्या पानावर ही बातमी आहे. त्यांचे म्हणणे आहे की, मला वर्क ऑर्डर दिली आणि नंतर माझे काम बंद केले. श्री.वाटेगावकर यांच्याशी संबंधित ती बातमी आहे. महोदय, मुळात ती वर्क ऑर्डर बोगस होती. मी काल त्या ठिकाणी गेलो होतो. काल राज्य सरकारच्या वकिलांनी कोर्टात सांगितले की, एफ.ए.कन्स्ट्रक्शन कंपनीचे बिल देणे आम्हाला कबूल आहे आणि आम्ही ते बिल देऊ. वास्तविक पाहता त्या कंपनीने धरणाचे काम करण्यापूर्वी ज्या अटी घातल्या होत्या त्या पूर्ण केल्या नाहीत, म्हणून ते काम रद्द करण्यात आले. त्या कंपनीने काम सुरु करण्यापूर्वी वन विभागाची परवानगी घेतली नाही, गावांचे पुनर्वसन केले नाही, रेल्वे लाईनपासून जेवढे अंतर ठेवावयास पाहिजे होते ते ठेवले नाही. त्या कंपनीने या अटी पूर्ण केल्या नाहीत म्हणून माननीय राज्यपालांनी ते काम रद्द केले. राज्यपालांनी रद्द केलेल्या कामाचे पैसे ती कंपनी मागत आहे. असे असताना त्या कंपनीचे बिल देण्यात हरकत नसल्याचे राज्य सरकारच्या वकिलांकडून उच्च न्यायालयात सांगितले जाते. त्या कंपनीचे 150 कोटी रुपयांचे बिल राज्य सरकार देत आहे. परंतु हे काम राज्यपाल महोदयांनी कोणत्या कारणांमुळे रद्द केले ही बाब राज्य सरकारचे वकील न्यायालयात सांगत नाहीत. माझी मागणी आहे की, राज्य सरकारने या विरोधात सर्वोच्च न्यायालयात गेले पाहिजे आणि खरोखरच पाण्याचे पैसे वाचविले पाहिजे.

माननीय मंत्री श्री.गुलाबराव देवकर, आपण सर्वोच्च न्यायालयातून राज्य सरकारला या कामी लगेच स्टे आणून देऊ शकता. एफ.ए. कन्सट्रक्शन कंपनीचे बिल अदा केले नाही तर राज्यातील जनतेचे पैसे वाचतील. एकीकडे पैसे नाही असे राज्य सरकारकडून वारंवार सांगितले जाते आणि दुसरीकडे अशा प्रकारे रद्द केलेल्या कामाचे पैसे देण्यात येतील असे सांगितले जाते. आज राज्यात पाण्याचे पैसे चोरणाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. जो पर्यंत या संदर्भातील नियोजन होत नाही, दुष्काळी भागाला प्राधान्य दिले जात नाही तो पर्यंत काही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील....

खरे नाही. ज्या भागात अतिवृष्टी कमी आहे, त्या भागात पाणी कसे पोहोचेल हे पाहण्याचे काम प्रामुख्याने केले पाहिजे.

महोदय, सांगोला येथून जाणाऱ्या छोट्या कालव्यावर केवळ 60-70 कोटी रुपये खर्च येणार आहे. माझ्या मते 100 कोटी रुपयांच्या आत त्या कालव्यावर खर्च होणार आहे. परंतु तितक्या निधीची तरतूद सुध्दा सरकार करीत नाही. या उलट त्या दुष्काळी भागात 200 कोटी रुपये केवळ टँकरवर खर्च केले जात आहेत. हे गोडबंगाल मला कळत नाही. उद्या जरी पाऊस पडला तरी दुष्काळ हा पडतच राहील. मी तर म्हणेन की, दुष्काळ पडला की, अधिकाऱ्यांची दिवाळी होत राहील.

महोदय, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, मी माझ्या पक्षाच्या वतीने बीड जिल्ह्यातील दोन आणि बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील एक गाव दत्तक घेतले आहे. माझ्या पक्षातील सर्व कार्यकर्त्यांनी वर्गणी जमा करुन त्या गावांचा सर्वांगीण विकास करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रातील माझ्या पक्षाच्या 1200 कार्यकर्त्यांना सोबत घेऊन मी गेल्या महिन्यात मराठवाड्यात अभ्यास शिबिर घेतले. पाथर्डी आणि बीडच्या मध्ये दुष्काळी भागातील परिस्थिती जाणून घेण्यासाठी एकत्र बसलो. त्या ठिकाणी कार्यकर्त्यांनी काम कसे केले पाहिजे या बाबतचा अभ्यास आम्ही तीन दिवस केला आणि निरनिराळ्या कामांवर प्रत्येक कार्यकर्त्यांची नेमणूक केली. परंतु या बाबतची प्रसिध्दी आम्ही कोठे केली नाही.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

आम्ही कोणाला सांगितले नाही. हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो आणि त्या कर्तव्याच्या भावनेतून काम करतो. या ठिकाणी बोलणे ठीक आहे पण प्रत्यक्षात जबाबदारी शासनाची आहे.

मघाशी माननीय उप मुख्यमंत्री सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना म्हणाले की, चार वर्षे तुम्ही काय केले ? 60 वर्षांपैकी 55 वर्षे तुमच्याकडेच राज्य आहे. त्यामुळे आपल्याला हे बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. चार वर्षामधील दोन वर्षे फाईल कशी हलवावयाची हे कळण्यामध्ये जातात. नोकरशाहीमध्ये काम करीत असताना काय परिस्थिती असते हे आपण पाहिले आहे. सन्माननीय सदस्य महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर आले आणि त्या बँकेचे कामकाज कळेपर्यंत ते त्या बँकेतून बाहेर सुध्दा गेले. अशी परिस्थिती आपल्या लोकशाहीमध्ये आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे आणि त्या पध्दतीचे ठोस निर्णय घेतले पाहिजेत. माझी राज्य शासनाकडून अपेक्षा आहे की, या ठिकाणी उत्तर देत असताना जर दिले, केले, होऊन गेले अशा पध्दतीचे उत्तर देणार असतील तर ते उत्तर आम्हाला नको. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना तसे उत्तर पाहिजे असेल तर मला माहीत नाही. या ठिकाणी गेल्या वेळी आपण चर्चा केली आणि शासनाकडून उत्तरे घेतली. पुनर्वसन मंत्र्यांनी सांगितले की, झाले, केले, नुकसान भरपाई देऊन टाकली. आम्हाला तशा उत्तराची अपेक्षा नाही. माननीय मंत्री महोदयांपेक्षा आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांकडून उत्तर मिळावे अशी अपेक्षा आहे. या ठिकाणी ठोस निर्णय जाहीर केले पाहिजेत.

सभापती महोदय, पुढच्या चार महिन्यांमध्ये यापेक्षाही तीव्र पाणी टंचाई निर्माण होणार आहे असे मला वाटते. त्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे ? कोकणात जूनमध्ये पाऊस पडतो परंतु मराठवाड्यामध्ये, पश्चिम महाराष्ट्रातील काही भागामध्ये तसेच पश्चिम विदर्भामध्ये उशिरा म्हणजे जुलैमध्ये पाऊस पडतो. म्हणजे आपल्याला पाच महिन्यांची तयारी आजपासून करावयाची आहे. त्या बाबत राज्य शासनाने काय विचार केला आहे याचे उत्तर आम्हाला अपेक्षित आहे. आम्हाला राज्य शासनाचे पूर्ण प्लॅनिंग कळले पाहिजे. पहिल्यांदा पिण्यासाठी पाणी आणि त्यानंतर शेती व इतर बाबींसाठी पाणी या पध्दतीने कार्यवाही केली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/

श्री. जयंत प्र. पाटील .....

सभापती महोदय, या ठिकाणी आणखी भीषण परिस्थिती निर्माण होणार आहे. आपण ज्या शेतीचे पाणी पिण्यासाठी वापरणार आहोत ती शेती नष्ट होणार आहे, करपून जाणार आहे. त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची चिंता मोठ्या प्रमाणावर करावी लागणार आहे. काही भागातील ऊस करपून जाणार आहे. त्यामुळे आपला साखर उद्योग अडचणीत येणार आहे. या सर्व परिस्थितीचा विचार केला गेला पाहिजे आणि त्याचे उत्तर आम्हाला दिले गेले पाहिजे. नुसते बोललो असे होता कामा नये. आम्हाला आकडेवारी मिळाली पाहिजे. शासनाचे नियोजन कशा प्रकारचे आहे आणि यापुढे शासन कशा पध्दतीने काम करणार आहे हे समजले पाहिजे. म्हणून या सर्व मुद्यांची उत्तरे या ठिकाणी अपेक्षित आहेत.

सभापती महोदय, माझ्या आधीच्या सन्माननीय सदस्यांनी या निमित्ताने अनेक चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम जे बोलले ती गोष्ट खरी आहे की, यामध्ये आम्ही अजिबात राजकारण आणत नाही. या ठिकाणी चिमटे काढण्याचा प्रयत्न झाला पण यामध्ये जबाबदारी तुमची आहे. 1972 च्या दुष्काळानंतर विधानसभेमध्ये झालेली चर्चा आपण वाचावी. ती चर्चा मी वाचलेली आहे म्हणून सन्माननीय सदस्यांना सांगत आहे. त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी कधीही चिमटे काढले नाहीत किंवा विनोद केले नाहीत. आपण म्हणता ते बरोबर आहे की, ती जबाबदारी स्वीकारुन आपण दोघे मिळून काम करावे ही भूमिका या ठिकाणी होती. काळ कठीण आहे. यापुढे आणखी कठीण परिस्थिती निर्माण होणार आहे. अशाच पध्दतीने जर आपण जलसंपती वेडीवाकडी वापरली, जलसंपत्तीचे पैसे वेडेवाकडे वापरले तर या ठिकाणी पाऊस पडला तरी पाण्याची टंचाई दूर होईल असे चित्र आज तरी मला या राज्यामध्ये दिसत नाही.

जलसंपदा विभागाचे सचिव आयएएस असले पाहिजे अशी आम्ही या ठिकाणी मागणी केली. त्याबाबत आपण निर्णय घेतला. सर्व खात्यांमध्ये सचिव हे आयएएस असले पाहिजे. या ठिकाणी वेगळी भूमिका आहे, वेगळे काम आहे म्हणून आयएएस सचिव दिलेच नसते. मी या सभागृहात पहिल्यांदा मागणी केली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सिंचन घोटाळ्यामुळे राज्यात दुष्काळ पडला आहे. वेडेवाकडे निर्णय घेतल्यामुळे दुष्काळ पडला आहे. टेंडर न काढता वर्क ऑर्डर देण्यात आली असे सभागृहात मंत्री महोदय सांगतात आणि आपण ते निमूटपणे ऐकतो. हे बरोबर नाही. कॅबिनेट मंत्री म्हणतात की तसे नाही आणि राज्यमंत्री म्हणतात की तसेच आहे. छोट्या रकमेचे काम काढावयाचे आणि मोठ्या रकमेचे काम टेंडर न काढता द्यावयाचे. जर एकत्र टेंडर असेल व क्वॉन्टिटी जास्त असेल तर लोएस्ट टेंडर भरणाऱ्याला काम दिले पाहिजे. सभापती महोदय, या विषयावर गांभीर्याने चर्चा करण्याची गरज आहे. सभागृहात केवळ आकडेवारी देऊन हा प्रश्न सुटणार नाही. जोपर्यंत दुष्काळाच्या समस्येवर आम्हाला ठोस उत्तर मिळत नाही तोपर्यंत राज्यातील दुष्काळाची समस्या सुटेल असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, सिल्लोड येथील रोजगार हमी योजनेच्या मजुरांना मजुरी देण्याची आवश्यकता आहे. रोजगार हमी योजनेच्या मजुरांची मजुरी 15 दिवसात देण्याची कायद्यात तरतूद आहे.

(सन्माननीय राज्यमंत्री श्री.रणजित कांबळे बसून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सिल्लोडच्या मजुरांना मजुरी देण्यात आली नाही याची चौकशी बरेच दिवस सुरु आहे. गेल्या अधिवेशनात देखील असेच सांगण्यात आले होते. ते लोक त्या गावातील नसताना त्यांना कामावर कसे ठेवण्यात आले, त्यांची नावे का नोंदविण्यात आली, ज्यांनी त्यांची नावे नोंदविली होती त्यांच्याविरुध्द शासनाने कारवाई केली आहे काय असे प्रश्न यातून निर्माण झालेले आहेत. माझ्याजवळ प्रशासनाकडून लेखी उत्तर आलेले आहे. विभागीय आयुक्तांनी असे म्हटले आहे की, त्या मजुरांनी काम केलेले आहे, पणं त्यांना मजुरी दिली गेली नाही. ही आमची चूक आहे. मी स्वत: त्या मोर्चाला गेलो होतो. अशा प्रकारचे मला आयुक्तांनी कळविलेले आहे. म्हणून मी मंत्री महोदयांना सांगत आहे. रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणारा माणूस गरीब असतो. ते मजूर मटाव वरुन 150 कि.मी.पायी चालत औरंगाबादपर्यंत आले होते. त्यापैकी शेवटच्या टप्प्यातील 5-6 कि.मी.पर्यंत मी स्वत: त्यांच्यासोबत चाललो आहे. (अडथळा) सभागृहात बसलेल्या शासनाच्या प्रतिनिधींची अशा प्रकारची भूमिका असेल तर दुष्काळ असाच चालू राहणार

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

आहे. सरकारच्या प्रतिनिधींना याचे गांभीर्य नाही ही गंभीर बाब आहे. त्या मजुरांना मजुरी दिली होती. पण त्यांची मागणी योग्य नाही अशा प्रकारचे पत्र मंत्री महोदयांनी पाठवून द्यावे. एका बाजूला प्रशासनाकडून त्या मजुरांना मजुरी दिली नाही असे सांगितले जाते आणि सभागृहात बसून मंत्री महोदय अशा प्रकारे वागत असतील तर ते योग्य नाही.

मंत्री महोदय, श्री.रणजित कांबळे यांच्याकडे रोजगार हमी योजना खाते नाही, तरी देखील ते खाली बसून माझ्या भाषणामध्ये व्यत्यय आणून बोलत आहेत. मंत्री महोदयांना बोलावयाचे असेल तर मी खाली बसतो. मी सभागृहात अगोदरच सांगितलेले आहे की, सभागृहात गांभीर्याने चर्चा होत नाहीत. केवळ औपचारिकता पार पाडण्याचे काम शासनाकडून केले जाते. आम्ही कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणतो. त्याची आकडेवारी मांडतो. कोट्यवधी रुपये वेगळ्या मार्गाने वापरले जातात. कोट्यवधी रुपयांची कामे निविदा न काढला दिली जातात. कोट्यवधी रुपयांचे एस्टिमेट नंतर वाढवून दिले जाते. प्रकल्पांची उंची वाढविली जाते, या बाबी शासनाला गांभीर्याने घेतल्या पाहिजेत असे वाटत नाही का ? शासनाने अशा गोष्टी लाईटली घेता कामा नये. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी मागणी केली आहे त्याबाबत शासनाने ठोस उत्तर द्यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करीत आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या दुष्काळाची चर्चा अतिशय गांभीर्याने झाली पाहिजे. अधिवेशन संपल्यानंतर आम्ही जेव्हा आमच्या मतदारसंघामध्ये जाऊ त्यावेळी आम्हाला लोकांना सांगता आले पाहिजे की या अधिवेशनामध्ये आम्ही सरकारला दुष्काळासंबंधी निर्णय घेण्यास भाग पाडले. ही दुष्काळावरची चर्चा इतर कामकाज बाजूला ठेवून दोन-तीन दिवस चालली तरी ती करण्याची आमची तयारी आहे. दुष्काळ निवारणाला शासनाने प्राधान्य द्यावे अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

उप सभापती : दुष्काळावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणखी 39 सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत. माझी अशी सूचना आहे की, जे सन्माननीय सदस्य दुष्काळी भागातील आहेत त्यांना दुष्काळाची तीव्रता अधिक जाणवत आहे म्हणून त्याना प्रथम बोलण्याची संधी मिळावी.

आता सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस भाषण करतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये आणलेल्या दुष्काळासंबंधीच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, हा दुष्काळ संपावा असे कुणाला मनापासून वाटते काय असा प्रश्न मला पडलेला आहे. 1972 च्या दुष्काळाची चर्चा या ठिकाणी करण्यात आली. 1972 च्या दुष्काळापेक्षा भीषण दुष्काळ आता पडलेला आहे असे म्हटले जाते. 1972 मध्ये पडलेल्या दुष्काळानंतरच्या 41 वर्षाच्या काळामध्ये राज्यामध्ये दुष्काळ पडू नये यासाठी आपण काही निर्णय घेऊन चांगल्या गोष्टी करु शकलो आहोत काय ? राज्यात दुष्काळ पडू नये यासाठी शासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही ही खरी चिंतेची बाब आहे. आम्ही महाराष्ट्राचे आमदार आहोत. महाराष्ट्राच्या कानाकोप-यामध्ये काय परिस्थिती आहे याची माहिती घेऊन ती आम्ही येथे मांडत असतो.

कळा ज्या लागल्या जिवा
मला की ईश्वरा ठाव्या
कुणाला काय हो त्याचे
कुणाला काय सांगाव्या

मराठवाड्यामध्ये वारंवार दुष्काळ पडत असतो. या मराठवाड्याला दुष्काळामधून बाहेर काढण्याचे अजून आपण ठरविलेले नाही. या सभागृहामध्ये कधी अवर्षणाची तर कधी अतिसृष्टीची तर कधी अवकाळी पावसाची चर्चा होत असते. ही चर्चा कधी विदर्भाच्या संदर्भात, कधी खानदेशाच्या संदर्भात, कधी पश्चिम महाराष्ट्राच्या संदर्भात होत असते. मराठवाड्याच्या बाबतीत तर ही चर्चा वारंवार होत असते. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरच्या 52 वर्षामध्ये महाराष्ट्राच्या दुष्काळी भागातील जनतेला या दुष्काळातून बाहेर काढावे असा विचार आपण कधी केलेला आहे काय ?

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी 1972 च्या दुष्काळाच्या भयानक स्थितीचे वर्णन केले. त्यावेळी पाण्याचा दुष्काळ नव्हता, त्याचे कारण असे आहे की, एवढया विंधण विहिरी आपण कधी केल्या नव्हत्या. एवढया मोठ्या प्रमाणात जवाहर विहिरी केल्या नव्हत्या. एवढया मोठया प्रमाणात जमिनीतील पाण्याचा उपसा केला नव्हता. म्हणून त्यावेळी पाण्याची टंचाई कमी होती. परंतु त्यावेळी अन्नधान्याची मोठी टंचाई होती. त्यावेळी 25 टक्के सुध्दा अन्नधान्याचे उत्पादन होऊ शकत नव्हते. या उत्पादनात आपण पुढे गेलो आहे. परंतु आज कृषीचे स्थूल उत्पन्न किती आहे याचा कधी कोणी विचार केला आहे काय ? सन 2011-12 मध्ये विदर्भात दुष्काळ होता. तेव्हा कृषी उत्पन्न 7.5 टक्के एवढे होते. त्या अगोदर पाऊस पडला नाही म्हणून दुष्काळ पडला होता, त्यावेळी 2.5 टक्के कृषीचे स्थूल उत्पन्न होते. आपण 2.5 टक्क्यापासून ते 7.5 टक्क्यांच्या परिघातातच फिरतो आहोत. परंतु कृषीचे स्थूल उत्पन्नाच्या बाबतीत आपण पाहिजे तेवढा विकास करु शकलो नाही. गुजरातचे कृषीचे स्थूल उत्पन्न 19 टक्क्यांपर्यंत गेले. परंतु आम्ही मात्र 2.5 टक्क्यांपासून ते 7.5 टक्क्यांपर्यंत गेलो आहोत. या गोष्टीचा शासनाने कधी तरी विचार केला केला आहे काय ? कृषीचे स्थूल उत्पन्न वाढविण्याच्या बाबतीत शासनाने कठोर उपाययोजना कराव्यात अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, टंचाईवरील उपाययोजनाच्या बाबतीतील पुस्तक माझ्याकडे उपलब्ध आहे. या पुस्तकात सर्व जी.आर.नमूद केलेले आहेत. या राज्यात तलाव बांधले आहेत, पाझर तलाव बांधले आहेत, त्या तलावांच्या दुरुस्तीचा एक तरी नियम या पुस्तकात नमूद केला आहे काय ? या पुस्तकात टँकरने पाणी उपलब्ध करुन द्यावे, बैलगाडी पाणी उपलब्ध करुन द्यावे, अशा ठिकाणी बुडके तयार करा. विहिरी खोल करणे, विहिरीतील गाळ काढणे, अत्यावश्यक असेल तेथे खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे या गोष्टीच्या पलिकडे शासन अजून गेलेले नाही. पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी दूर व्हावा म्हणून ठोस अशा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येणार आहेत हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

महोदय, विधानसभा व विधान परिषद सदस्य म्हणूला म्हणून 25 वर्षाचा कालावधी झालेला आहे. प्रत्येक वेळी सभागृहात दुष्काळावर चर्चा उपस्थित होते, त्यावेळी या पुस्तकातील जी.आर. च्या पलिकडे आम्ही जात नाही. आपण जर जुन्या गोष्टी तशाच ठेवणार असाल तर राज्याचा विकास केंव्हा करणार हाही महत्वाचा प्रश्न आहे. या शासनाला मनापासून विकास करावयाचा असेल तर कायम स्वरुपी उपाययोजना आखणे गरजेचे आहे. या बाबतीत कायम स्वरुपी उपाययोजना करणार आहात की नाही याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदय, महाराष्ट्रात 1972 साली प्रचंड मोठा दुष्काळ पडला होता. तो दुष्काळ आम्ही देखील सहन केलेला आहे. त्यावेळी अन्नधान्याची टंचाई होती, परंतु त्यावेळी राज्यातील मजुरांना कायम स्वरुपी पैसा कसा मिळेल म्हणून जे नियोजन करण्यात आले, तसे नियोजन गेल्या 51 वर्षात कधीही झालेले नाही. त्यावेळी दुष्काळी कामे मोठया प्रमाणात काढली व त्याचे नंतर रोजगार हमी कायद्यात रुपांतर केले. परंतु कै. वि.स.पागे यांनी ही रोहयो सुरु केली व त्याचे कायद्यात रुपांतर केले. त्यावेळी त्यांनी एकही नवा पैशाचा खर्च शासनावर टाकला नाही. सगळयांवर प्रोफेशनल टॅक्स लावून तो पैसा रोजगार हमी योजनेसाठी गोळा केला. प्रोफेशनल टॅक्सच्या माध्यमातून जेवढा पैसा गोळा होईल, तेवढाच पैसा महाराष्ट्र शासनाने टाकावयाचा आणि त्या पैशातून कायम स्वरुपी विकासाची कामे करावयाची. मग त्यात विहिरी, तलाव, रस्ते, बंधारे ही कामे नियोजनात टाकलेली होती. रोजगार हमी योजनेच्या 51 वर्षात गोळा झालेला निधी महाराष्ट्र शासनाने निश्चित कोठे खर्च केला याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

महोदय,दुष्काळास मदत करण्यासाठी एक दिवसाचा पगार द्यावा असे सांगता. रिक्षावाल्या पासून ते शिपायापर्यंत व मजुरांपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत प्रोफेशनल टॅक्स वसूल केला जातो. प्रोफेशनल टॅक्सच्या माध्यमातून 3500 कोटी रुपये जमा होतात. तेवढेच पैसे महाराष्ट्र शासनाने टाकले तर 7500 कोटी रुपये होतात. मग कोणाकडे भीक मागण्याची गरज पडली नसती. परंतु तुम्ही काय करता की, रोजगार हमी योजनेच्या कामासाठी लोकांकडून प्रोफेशनल टॅक्स जमा करता. पण आज रोजगार हमी योजनेची कामे होत नाहीत अशी परिस्थिती आहे. रोजगार हमी हा कन्सेप्ट संपलेला आहे. रोजगार हमी योजनेचे जमा झालेले पैसे शासनाने अर्थसंकल्पात वळते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

केलेले आहेत. त्यामुळे रोहयोच्या कामावर एकही पैसा खर्च करता येत नाही.

आता केंद्र शासनाच्या निधीतून मरेगा, नरेगा या योजना राबविण्याचे काम राज्यात सुरु केलेले आहे. या योजनेवरील कामांचा रेश्यो 60x40 एवढा आहे. पण 60x40 रेश्योमध्ये कामे होतात काय ? 60x40 रेश्योमध्ये कामे बसत नसल्यामुळे आयुष्यात एकही काम आपण पूर्ण करु शकत नाही. मजुरांचा जीव घेऊन कामे करण्यास सुरुवात केली आहे. मजुरांना कमी पैशात काम करण्यास सांगता. परंतु त्यांनी केलेल्या कामाच्या मजुरीचे पैसे सहा-सहा महिने, दोन-दोन वर्षे देत नाहीत. तो गरीब मजूर आहे. तो मजुरी करुन हातावर अन्न घेऊन खाणारा माणूस आहे....

यानंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

त्याला तुम्ही पैसा दिला नाही तर तो जीवन कसे जगणार? हा निधी शासन केव्हा देणार याबद्दल नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये मी प्रश्न विचारला होता. रोजगार हमी योजनेचा निधी का खर्च केला जात नाही? रोजगार हमी योजनेच्या निधीमधून कायमस्वरुपी उपाययोजना करणार आहात का? दुष्काळासंबंधी जी पुस्तिका देण्यात आली आहे ती केव्हा बदलण्यात येणार आहे? पूर्वी 15 ते 20 लोकांच्या चावड्या असायच्या, पाडे असायचे, त्यामुळे बुडक्यातील पाणी पुरेसे व्हायचे. आज कोणाकोणाला पाणी पुरणार आहे? बुडक्याच्या कामामध्ये, चाऱ्यामध्ये भ्रष्टाचार केला जात आहे.

सभापती महोदय, विहीर दुरुस्तीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना 2 हजार रुपयांपर्यंत अधिकार दिले आहेत. 2 हजार रुपयांमध्ये विहिरीची दुरुस्ती होऊ शकते का? अस्तित्वात असलेल्या विहिरी खोल करणे, खोदणे आणि पुनर्भरण करणे यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना 12 हजार रुपयांपर्यंत आणि विभागीय आयुक्तांना 15 हजार रुपयांपर्यंत खर्च करण्याचे अधिकार दिलेले आहेत. 20 ते 50 हजार रुपयांपर्यंत खर्चाचे अधिकार देता येणार नाहीत का? 12 ऐवजी 15 हजार रुपये खर्च येत असल्यास आम्ही वारंवार विभागीय आयुक्तांकडे खेटे घालायचे का? जे काम आज करणे आवश्यक आहे त्यासाठी सहा-सहा महिने घालवयाचे. यात तुमचा कोणता प्रामाणिकपणा आहे?

सभापती महोदय, जून्या विहिरींची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना 2 हजार रुपयांपर्यंत खर्च करण्याचे अधिकार दिले असून विभागीय आयुक्तांना 5 हजार रुपयांपर्यंत खर्चाचे अधिकार दिले आहेत. जून्या विहिरींची दुरुस्ती करण्यासाठी 2 हजार रुपये पुरेसे आहेत का? दोन-पाच हजार रुपये आमच्या तोंडावर फेकून आमची थट्टा चालविली आहे. मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. 2 हजार रुपयांमध्ये विहिरीची दुरुस्ती करायची आहे. आज रेती, सिमेंट, मजुरीचा खर्च किती येतो याची शासनाला कल्पना आहे का? केवळ दिल्यासारखे करायचे आणि गरीब लोकांची थट्टा करायची असा प्रकार सुरु आहे. 70 टक्के लोकांवर अन्याय करायचा आणि 30 टक्के लोकांचे पोट भरायचे काम सुरु आहे.

सभापती महोदय, अस्तित्वात असलेल्या विहिरींची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना 5 हजार रुपये आणि विभागीय आयुक्तांना 10 हजार रुपये खर्च करण्याचे अधिकार दिलेले आहेत. 5-10 हजार रुपयांमध्ये अस्तित्वात असलेल्या विहिरींची दुरुस्ती करता येईल का? प्रामाणिकपणा असेल तर काम करणे गरजेचे आहे. आमची थट्टा का करीत आहात?

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

केवळ मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, मोठया प्रमाणात दुष्काळ आहे ही गोष्ट खरी आहे. त्याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आज पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देऊ. परंतु नदी आणि धरणातील पाणी उद्योगांना दिले आहे, ते पाणी देत असताना कोणताही विचार केलेला नाही. आता उद्योग बंद करुन पिण्याचे पाणी देणार आहात, सिंचनासाठी पाणी देणार आहात. केवळ आमच्या तोंडावर उपाययोजना सांगायच्या, निर्णयाचे कागद फेकायचे हाच प्रकार सुरु आहे.

सभापती महोदय, शासनाने उद्योगांना पहिले प्राधान्य दिले आहे. शासनाकडे त्या पाण्याचा हिशोब नाही. वर्धा नदीमध्ये 290 टीएमसी पाणी आहे असे सांगूनही त्या पाण्याच्या आधारावर 9 वीज प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. पालकमंत्र्यांच्या तालुक्यामध्ये, त्यांच्या विधानसभा मतदारसंघातील 50 गावांमध्ये आज पाण्याची टंचाई जाणवत असताना ते बोलत नाहीत. आज उद्योगांना शासनाने पहिले प्राधान्य दिले आहे. कोणता उद्योग पिण्याचे पाणी देण्यासाठी स्वत:चा धंदा बंद करणार आहे. पहिले उद्योगांना प्राधान्य द्यायचे आणि नंतर आम्हाला सांगायचे की, उद्योग बंद करुन तुम्हाला पाणी देत आहोत. शासन सिंचनाचे पाणी कमी करीत आहे. उद्योग बंद करायची शासनामध्ये हिंमत आहे का? पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कोण सोडविणार आहे? भविष्यात अशी स्थिती उद्‌भवणार नाही अशी खात्री देता येणार नाही. आज मार्च महिन्यात धरणामध्ये 27 ते 28 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. पावसाळा आता दूर गेलेला आहे. जुलै महिन्यामध्ये पाऊस सुरु होतो. पुढील 5 महिन्याच्या काळासाठी 28 टक्के पाणी पुरवावे लागणार आहे.

विदर्भामध्ये उष्णतेचे प्रमाण खूप आहे.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

उष्णतेमुळे हे पाणी अजून कमी होणार आहे. असे असतांना तुम्ही सांगता धरणाचे पाणी तुम्हाला पिण्यासाठी देऊ. आज धरणामध्ये केवळ 10 टक्के पाणी आहे. धरणामध्ये 10 टक्के डेड पाणी ठेवावे लागते व असे असतांना त्यातील 5 टक्के पाणी आपण पिण्यासाठी देऊ शकणार आहात काय ? आम्हाला काहीही सांगून आमच्या तोंडाला पाणे पुसण्याचे काम करु नका. यापेक्षा तुम्ही तलावातील गाळ काढण्याचे काम करणार आहात काय, तलाव खोल करण्याचे काम करणार आहात काय, या सर्व कामासाठी तुम्ही रोजगार हमी योजनाचा पैसा वापरणार आहात काय ? आम्हाला मरेगा नको, नरेगा नको आणि मरेगाही नको कारण त्या ठिकाणी मजुरांचे मरण आहे तसेच शेतकऱ्यांचेही मरण आहे. आता परिस्थिती अशी आहे की, एकही काम होत नाही. आज रोहयोची सर्व कामे सेल्फवरच पडली आहेत. रोहयोच्या मजुरांना कामाची मजूरीही वेळेवर मिळत नाही, इंजिनिअर काम घेण्यास तयार नाहीत, एस्टिमेट करण्यास तयार नाही अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, दुष्काळाची परिस्थिती भविष्यात येणार नाही याकरिता आपण ठोस पाऊल उचलणार आहात काय ? हा खरा प्रश्न आहे. आपण कच्चे, पक्के बंधारे बांधले आहेत, छोटी धरणे बांधली, विंधण विहिरी केल्या व यामाध्यमातून आपण केवळ पाण्याचा उपसाच केलेला आहे परंतु पाणी साठविण्याचे काम केलेले नाही. आपण जे काही बंधारे बांधले त्या बंधाऱ्यांना आपण पाटे दिले ? बंधाऱ्याचे पाणी अडवले? आपल्याला जर खऱ्या अर्थाने दुष्काळ संपवायचा असेल, खऱ्या अर्थाने पाण्याची टंचाई संपवायची असेल तर त्यासाठी तुम्हाला कायमस्वरुपी योजनांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. प्रत्येक वेळी केंद्राकडे भीक मागायला जाण्यापेक्षा आपला व्यवसाय करातून पैसे उभे करा आणि दुष्काळापासून लोकांची खऱ्या अर्थाने सोडवणूक करा व खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला न्याय द्यावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या दुष्काळाच्या प्रस्तावावर आपण मला बोलण्याची संधी दिल्यामुळे मी प्रथम आपले आभार मानतो.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये भाग घेतलेल्या सर्व सन्माननीय सदयांनी दुष्काळाचे वर्णन केलेले आहे. 1972 च्या दुष्काळापेक्षा या वर्षाचा दुष्काळ भयंकर आहे ही वस्तुस्थिती आहे. आपल्या राज्यात सतत 2 वर्षापासून दुष्काळ पडत आहे. महाराष्ट्रातील 16 जिल्हयांची परिथिती अतिशय वाईट आहे. दुष्काळाच्या संदर्भात मागच्या वर्षीही राज्य सरकारने खूप चांगले प्रयत्न केले होते व यावर्षीही राज्य शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे.

आज राज्यात साधारणत: 2000 टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. परंतु काही ठिकाणी टँकरसाठी पाणी कोठून आणायचे असा प्रश्न पडलेला आहे. औरंगाबाद, जालना, मनमाड, येवला या मोठया शहरांमध्ये तर 15 दिवसातून एकदा पाणी दिले जात आहे.

सभापती महोदय, जनावराच्या पाण्याचा प्रश्नही बिकट झालेला आहे. केंद्र शासनाने राज्य शासनाला 778 कोटी रुपयांची मदत दिलेली आहे. मागच्याही वर्षी केंद्र शासनाने राज्य शासनाला भरीव अशी मदत केली होती परंतु ही मदत अपुरी असल्यामुळे राज्य शासनाने 2200 कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे दिला असून हा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी राज्य शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने कापूस, सोयाबीनसाठी 2 हजार कोटी रुपयांची घोषणा केली होती त्यातील जवळपास 1891कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा झालेले आहेत. राज्य शासनाने दुष्काळासंदर्भात पुष्कळ उपाययोजना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, डीपीडीसीतील 15 टक्के निधी दुष्काळासाठी खर्च करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. अशा अनेक उपाययोजना सुरु असल्या तरी राज्यामध्ये पिण्याच्या पाण्याची आणि चाऱ्याची परिस्थिती खूप गंभीर आहे. टँकरने पिण्याचे पाणी पुरवणे ही अवघड गोष्ट असते. टँकरच्या संदर्भात सर्वांनी वर्णन केलेले आहे. परंतु टँकरने जो पाणी पुरवठा केला जातो त्याचा दर्जा चांगला नसतो ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, राज्यातील अनेक गावांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याच्या योजना झालेल्या आहेत. 1972 च्या दुष्काळापेक्षा या वेळचा दुष्काळ वेगळा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे .....

आहे. 1972 मध्ये अन्नधान्याची टंचाई होती परंतु या दुष्काळामध्ये पिण्याच्या पाण्याचा, जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा विचार करीत असतांना आपल्याला वॉटर बँक तयार करता येतील काय याचा विचार करावा लागणार आहे. पावसाळयात जे पाणी पडते ते पाणी थांबविण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

त्याच प्रमाणे ज्या काही पिण्याच्या पाण्याच्या योजना घेतल्या आहेत त्यांचे जे सोर्सेस आहेत त्याचा फेर आढावा घेण्याची गरज आहे. पावसाळ्यामध्ये जेमतेम ते सोर्सेस सुरू असतात. उन्हाळ्यामध्ये हे सर्व सोर्सेस कोरडे पडलेले असतात. हे सर्व सोर्सेस पुन्हा कसे रिएम्फोर्स करता येतील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

विहीर पुनर्भरणाचा उपक्रम राबविला तर ज्या सोर्सेसमधून आपण पाणी घेतो तो सोर्स चांगल्या पद्धतीने पुनर्जीवित करता येऊ शकेल. त्यासाठी देखील आपल्याला उपाययोजना कराव्या लागतील.

सभापती महोदय, रेन वॉटर हार्वेस्टींगचा प्रयोग देखील मोठ्या प्रमाणावर केला पाहिजे. कारण चेन्नई शहरामध्ये खूप वर्षापूर्वी पिण्याच्या पाण्याचा बिकट प्रश्न निर्माण झाला होता. तेथे मोठ्या प्रमाणावर रेन वॉटर हार्वेस्टींगचे प्रयोग झालेत. त्याचा खूप चांगल्या प्रमाणात उपयोग झाल्याचे आढळून येत आहे. तेव्हा याबाबतीत देखील आपण निश्चितपणाने विचार केला पाहिजे.

दुसरा महत्वाचा प्रश्न जनावरांच्या चाऱ्यांचा आहे. जनावरांसाठी शासनाने छावण्या सुरू केल्या आहेत. जवळपास 4 लाख जनावरांना चारा देण्याची व्यवस्था शासना मार्फत झालेली आहे. यासाठी 60 व 40 रूपये दिले जातात त्यात मोठ्या प्रमाणावर वाढ होण्याची गरज आहे. तसेच, चारा निर्मिती कशी होईल हे देखील पाहिले पाहिजे. कारण पुढच्या चार-पाच महिन्यात चार निर्माण होणार नाही. त्यामुळे ज्या ज्या भागात आज पाणी आहे, मग विदर्भ असेल किंवा अन्य भाग असतील तेथील शेतकऱ्यांसाठी चारा निर्मितीची योजना आखली तर ते शेतकरी चारा निर्मिती करतील. त्या शेतकऱ्यांकडून चारा विकत घेतला तर एक चांगला उपाय होऊ शकेल असे मला वाटते. ज्या वन क्षेत्रात चांगला पाऊस पडतो. तेथे हमाटा सारख्या गवताची निर्मिती केली तर कायमस्वरूपी मार्ग निघू शकतो. त्या दृष्टिकोनातून विचार झाला पहिजे असे मला वाटते.

सायलेजची चारा म्हणून गुणवत्ता चांगली असते. त्याचा देखील आपल्याला वापर करता येऊ शकेल. दुष्काळ हा नेहमीच येतो. तो दर चार वर्षांनी पडतोच आहे. आपण नेमेचि येतो पावसाळा असे म्हणतो तसे नेमेचि येतो दुष्काळ अशी म्हणण्याची पाळी आपल्यावर आता आलेली आहे. याचे कारण दर चार-सहा वर्षांनी दुष्काळ पडतो. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

भविष्यकाळामध्ये आपल्याला दोन गोष्टींना सामोरे जावे लागणार आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा बिकट होत चालला आहे. अन्नधान्याचा प्रश्न आता राहिलेला नाही. आपल्या देशात गव्हाचा भरपूर साठा आहे. परवाच केंद्र शासनाने सांगितले की, यातील काही गहू निर्यात करावा लागेल. आता आपल्याकडे फक्त पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी व चाऱ्याच्या निर्मितीचा प्रश्न आहे. जनावरांसाठी चारा मोठ्या प्रमाणावर कशा प्रकारे निर्माण करता येईल हे आपण पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, शासनाने वीज बिलामध्ये सवलत दिलेली आहे. माझी अशी मागणी आहे की, ज्या भागामध्ये पाणीच नाही त्या भागातील वीज बिले माफ झालीच पाहिजेत. त्याच बरोबर शासनाने आता पीक कर्जाचे व्याज माफ करावे व कर्जाचे रूपांतर पुढच्या वर्षी करावे, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. तसेच नववी पर्यंतच्या परीक्षा देखील लवकर घ्याव्यात. विद्यापीठाने परीक्षा फी माफ करावी. अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

रोजगार हमी योजने संबंधी येथे बरीच चर्चा झालेली आहे. या योजनेच्या माध्यमातून दुष्काळासंबंधी कायम स्वरूपी उपाययोजना करावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

दुष्काळाचे मोठे संकट राज्यावर आलेले आहे. या दुष्काळाशी राज्य शासन अतिशय प्रभावीपणे सामना करीत आहे. 1972 च्या दुष्काळाच्या वेळी टाटा कंपनी व मफतलाल कंपनी पुढे आली होती. या दुष्काळाशी सामना करण्यासाठी राज्यातील सर्व एनजीओंचे सहकार्य घ्यावे अशी मी मागणी करतो. या दुष्काळाशी सामना करण्यासाठी राज्य शासनाने चांगल्या प्रकारच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. कोणीही दुष्काळाचे राजकारण न करता दुष्काळाशी सामना करण्यासाठी सर्वांनी संघटितपणे प्रयत्न करावेत अशी मागणी करतो व आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो. धन्यवाद.

.....

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दुष्काळाच्या चर्चेवर मला माझे मत मांडण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी प्रथम आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, या दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी शासन गंभीर नाही असे मी म्हणणार नाही. परंतु प्रशासनाला त्याचे गांभीर्य आहे असे मला वाटत नाही. या दुष्काळी परिस्थितीला सामोरे जात असताना शासन काही उपाय योजना करीत आहे हे निश्चितच सत्य आहे. परंतु आपण दुष्काळाला सामोरे जात असताना टँकर डिप्लॉय करणे, बोअर घेणे अथवा एमआरईजीएस मधील एखादे काम सुरु केले म्हणजे दुष्काळाला यशस्वीपणे सामोरे गेलो असे मानणाऱ्यांपैकी आम्ही नाही. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर त्यावर उपाय योजना करणे हे योग्य नाही. मला वाटते की, आता एकदाच लॉंग टर्म डिसीजन घेऊन त्याप्रमाणे निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे आणि ती काळाजी गरज आहे. .

सभापती महोदय, या दुष्काळी चर्चेवर सकाळ पासून माझ्या अगोदर सहा वक्ते बोलले आणि त्यातील तीन वक्ते कोकणातील होते तर तीन वक्ते दुष्काळी भागातील होते. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले, डॉ.सुधीर तांबे हे दुष्काळी भागातील आहेत. श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या भागात दुष्काळ नसला तरी माझे सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, दुष्काळी भागातील लोकांना अधिक मते मांडण्याची संधी दिली तर ते प्रभावीपणे आपली मते मांडून काही चांगल्या उपाय योजना सुचवतील.

सभापती महोदय, छावण्यांच्या संदर्भात सांगू इच्छितो की, नगर, सोलापूर, सांगली, या भागातील छावण्यांसाठी 110 ते 125 कोटी रुपयांपेक्षा अधिकचा खर्च झालेला आहे. नगर जिल्ह्यामध्ये साधारणत: 117 छावण्या सुरु आहेत. त्याबाबत आपण निश्चितच चर्चा केली पाहिजे. कारण नगर जिल्ह्यामध्ये 22 साखर कारखाने आहेत. ते साखर कारखाने पूर्ण क्षमतेने सुरु आहेत याचा अर्थ तेथे ऊस मोठ्या प्रमाणावर आहे. ऊस मोठ्या प्रमाणावर आहे याचा अर्थ तेथे चांगल्या प्रकारे पाणी उपलब्ध आहे. ओला चारा उपलब्ध आहे. तेव्हा त्या भागातील लोकांना चारा उपलब्ध करणे अवघड नाही.

सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यात 28 साखर कारखाने पूर्ण क्षमतेने सुरु आहेत. त्या ठिकाणी ऊस चांगला पिकत आहे आणि पाणी सुध्दा उपलब्ध आहे. तेथे छावणीवर 100-125

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित

कोटी रुपये खर्च होत आहे. सांगली जिल्ह्यातही तीच परिस्थिती आहे. बीड जिल्ह्यात मात्र आष्टी शिवाय कोठेही छावणी सुरु नाही. आम्हाला चारा आणायचा असेल तर त्यासाठी शासनाने 60:30 चा रेशिओ लावलेला आहे. आम्हाला 80-90 कि.मी. अंतरावरुन चारा आणावा लागतो. आम्हाला 60 आणि 30 रुपये प्रमाणे खर्च दिला तर या खर्चामध्ये छावणी चालविणे अशक्य कोटीतील बाब आहे. मी ही बाब सातत्याने जिल्हा प्रशासनाच्या, विभागीय आयुक्तांच्या नजरेस आणून दिली कारण ते ही बाब मंत्रिमंडळाच्या सब कमिटीपुढे मांडतील अशी माझी अपेक्षा होती. परंतु दुर्दैवाने जिल्हा प्रशासनाने आणि विभागीय आयुक्तांनी ही बाब मंत्रिमंडळाच्या सब कमिटीपुढे आणलेली नाही.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री जेव्हा बीड जिल्ह्यामध्ये आले होते तेव्हा त्यांनी विचारले की, आपल्याकडे चारा का नाही, येथे चारा फार कमी प्रमाणात उपलब्ध आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केले की, हा जिल्हा डेफिसीटमध्ये आहे. हा जिल्हा फेब्रुवारी महिन्यामध्ये डेफिसीटमध्ये दाखवीत आहात तर मार्च, एप्रिल, मे आणि जून महिन्यात तेथे चारा कोठून उपलब्ध होणार ? नगर, कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांमध्ये छावण्या सुरु आहेत. मी अधिकचे बोलणे योग्य होणार नाही. परंतु माझ्यासारख्याला प्रश्न पडतो की, दुष्काळ आहे काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

आज राज्यात 22-28 साखर कारखाने सुरु आहेत. आमच्या भागातून स्थलांतरीत होणाऱ्या मजुरांच्या संख्येत या वर्षी 27 टक्क्यांनी वाढ झाली आहे. इतर जिल्ह्यातील साखर कारखाने बंद पडल्यानंतर ते मजूर आमच्या जिल्ह्यात परत आले तर एमआरईजीएस आणि अगोदरच्या वक्त्यांनी सांगितल्यानुसार सेल्फवरील कामे करणार नाहीत. आज रोजगार हमी योजनेच्या कामावर 145 रुपये मजुरी दिली जाते. परंतु ती मजुरी अदा करण्यासाठी चार-चार महिन्यांचा कालावधी लागतो. मजुरांना रोजच्या रोज मजुरी मिळाली नाही तर ते दुसऱ्या दिवशी काय खाणार ? किमान रोजगार हमी योजनेवरील मजुरांना आठवड्याने पेमेंट करावे, अशी आमची माफक अपेक्षा आहे.

महोदय, माझा तालुका 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेला तालुका आहे. माझ्या तालुक्यात 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेली 193 गावे आहेत. बीड जिल्ह्यात 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेली 685 गावे आहेत. तसेच 50 ते 60 पैसे आणेवारी असलेली 718 गावे आहेत. पूर्ण बीड जिल्हा हा दुष्काळात होरपळत आहे. त्यामुळे निदान आमच्या भागाच्या बाबतीत सरकारने लॉंग टर्म मेझर्सबाबत निर्णय घेतला नाही तर हा दुष्काळ आम्हाला कायमचा होऊन जाईल. या बाबतचा निर्णय घेतला नाही तर यातून मार्ग निघणे अशक्यप्राय कोटीतील गोष्ट होईल.

तसेच दुसरी बाब पाण्याच्या उद्भवाबाबतची आहे. जेथून पाण्याचे टँकर्स भरले जात आहेत तेथील पाण्याचा उद्भव ड्राय होत चालला आहे. महोदय, जिल्हा प्रशासनाकडून निग्लीजन्स कसा होत असतो ते मी सांगतो. आमच्या भागातील 90 टक्के पाण्याचे उद्भव कोरडे झाले आहेत. आज एखाद्या विहिरीवर दोन टँकर भरावयास सांगितले तर दुसऱ्या दिवशी त्या विहिरीचा मालक माझी विहीर ड्राय झाल्याचे सांगतो आणि प्रत्यक्षात ती विहीर ड्राय झालेली असते. त्यामुळे त्या विहिरीतून केवळ एकच टँकर पाणी मिळते.

महोदय, 12 तारखेला माननीय मुख्यमंत्री बीडला आले होते. पाण्याचा उद्भव ड्राय होत चाललेल्या ठिकाणी पर्याय म्हणून एक नळ योजना करुन त्याला एक्स्प्रेस फीडर दिले तर 92 टँकर एका ठिकाणी भरता येतील असे आम्ही सांगितले. माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठकीत ही बाब तत्वत: मान्य करुन सांगितले की, या संदर्भातील काम सुरु करुन प्रस्ताव सादर करावा. 8 तारखेला माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव सादर करण्याचे सांगितले असताना गेल्या शुक्रवारी माननीय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

विभागीय आयुक्तांनी एक्स्प्रेस फीडर आणि इतर उपाययोजनांबाबतचा प्रस्ताव कॅबिनेटच्या सब कमिटीकडे पाठविला. यावरुन आपल्याला जिल्हा प्रशासन आणि विभागीय प्रशासनाची उदासीनता लक्षात येईल. या गोष्टीचे त्यांना गांभीर्य नसल्यामुळे तेथील टँकर रेकॉर्डवर चालू राहील आणि कोणत्याही टँकरबाबत तक्रार येणार नाही. दुर्दैवाने या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे त्या भागातील लोकांना पाणी मिळणार नाही. महोदय, कॅबिनेटच्या सब कमिटीपुढे प्रस्ताव आलेला आहे. या निमित्ताने मी राज्य सरकारला विनंती करतो की, पाण्याचा उद्‌भव ड्राय होत असल्यामुळे या बाबत तातडीने निर्णय घ्यावा.

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना देऊन अजूनही जिल्हा प्रशासनाला डेलिगेशन ऑफ पॉवर्सचे परिपत्रक आले नाही. बीडीओ कडून 8 तारखेला टँकरचा प्रस्ताव निघाल्यानंतर, तहसीलदार, मंडळ अधिकारी, परत तहसीलदार एसडीओ आणि आरडीसीकडून रुट होत होत 21 तारखेला जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतो. जिल्हाधिकारी कार्यालयात 21 तारखेला काही त्रुटी निघाली तर पुन्हा 25 तारखेला तहसील कार्यालयाकडे तो प्रस्ताव परत जातो आणि नंतरच्या महिन्याच्या 8 तारखेला पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतो, अशी स्थिती आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन किमान मराठवाड्यासाठी डेलिगेशन ऑफ पॉवर्सच्या बाबतीत निर्णय घ्यावा. तहसीलदारांना नव्हे तर किमान एसडीओंना हे अधिकार निश्चितपणे डेलिगेट करावेत, अशी माझी नम्र विनंती आहे.

महोदय, फळबागांच्या अडचणींबाबत बीड जिल्ह्यातील माननीय राज्यमंत्री श्री.प्रकाश साळुंखे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळासह आम्ही माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांना भेटलो होतो.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीरहित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

आणि बीड जिल्ह्यातील फळबागा वाचविल्या पाहिजेत म्हणून श्री. पवार साहेबांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. त्यावेळी फळबागांची एकूण परिस्थिती निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी दरम्यानच्या काळात या बाबतीत आपण निश्चितपणे उपाययोजना करीत आहोत असे सांगितले.. वर्तमानपत्रात आम्ही वाचले की, साहेबांनी पुण्यामध्ये किंवा कराडला घोषणा केली की, लवकरच असा प्रस्ताव कॅबिनेटपुढे आणून त्या संदर्भातील निर्णय करीत आहोत.

सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. त्या अनुषंगाने आपण फळबागा जगविण्यासाठी, पाण्यासाठी साधारणपणे हेक्टरी 40 ते 45 हजार रुपये देत आहोत. ते पैसे जेव्हा यावयाचे तेव्हा येतील. परंतु आज आमच्याकडे शेतकऱ्यांनी माननीय जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज दिले की, इरिगेशनचे जे रेट असतील त्याप्रमाणे आम्ही पैसे भरण्यास तयार आहोत, आमच्याकडील सर्व उद्भव ड्राय झाले आहेत, ज्या सागरच्या बंधाऱ्यातून आम्हाला पाणी घ्यावयाचे आहेत तेथे आम्ही स्वत: टँकर लावतो आणि आमच्या बागा जगविण्यासाठी आम्हाला इरिगेशनच्या रेटप्रमाणे पाणी विकत द्यावे. दुर्दैवाने काल दुपारी मला माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, माननीय विभागीय आयुक्तांच्या सहमतीने असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, पिण्यासाठी पाणी आरक्षित केलेले आहे त्यामुळे आम्हाला फळबागांना पाणी देता येणार नाही. एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार या बाबत निर्णय घेईल पण त्या भागात यदाकदाचित उद्या जर पाणीच मिळाले नाही तर बागा जिवंत राहणार नाहीत.

शेतकरी इरिगेशनचे रेट्स देण्यास तयार आहेत. भाड्याने टँकर लावण्यास तयार आहेत. त्यात अशी शंका काढली की, हे पाणी घेतील आणि कोठे तरी विकतील. ते रॉ वॉटर आहे. 20 किलोमीटरवरुन पाणी आणून ते विकण्याची कोणाला हौस आहे काय ? रॉ वॉटर कोणी पिण्यासाठी विकत घेणार आहे का ? ते पाणी ऊसाच्या शेतीसाठी कोणी घेणार आहे का ? ही साधी सरळ गोष्ट आहे. या कामामध्ये प्रॅक्टीकल ॲप्रोच नाही. या बाबतीत निश्चित उपययोजना करीत असताना थोडा अधिक प्रॅक्टीकल ॲप्रोच ठेवणे गरजेचे आहे. फळबागांसाठी शेतकरी इरिगेशनच्या रेटप्रमाणे पैसे भरण्यास तयार आहेत. स्वत:चे टँकर डिप्लॉय करुन पाणी घेऊन जाण्यास तयार आहेत. मी नम्र विनंती करतो की, त्या शेतकऱ्यांना सुध्दा परवानगी देणे ही काळाची गरज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/

श्री. अमरसिंह पंडित ....

सभापती महोदय, एमआरइजीएसच्या कामांच्या संदर्भात महत्वाचा निर्णय आहे. आमच्याकडील लाभ क्षेत्रात एमआरइजीएसच्या कामाशिवाय आता दुसरा पर्याय राहिलेला नाही. त्या ठिकाणी विहिरींची कामे करु शकतील, रस्त्यांची कामे करु शकतील पण बांधबंदिस्ती करण्याची तेथील परिस्थिती नाही. एमआरइजीएसच्या संदर्भात लाभक्षेत्राच्या बाबतीत कॅबिनेटमध्ये चर्चा झाल्याचे कळते. मला वर्तमानपत्रातून असे वाचावयास मिळाले की, लाभक्षेत्रामध्ये आपल्याला एकतृतीयांशच्या वर काम करता येत नाही. मी डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये सुध्दा हा विषय मांडला होता. लाभक्षेत्रामध्ये एकतृतीयांशच्या वर काम का करता येत नाही ? शेवटी मला असे कळले की, गेली दोन वर्षे आमच्याकडे पाणी आलेलेच नाही तरीही आम्ही लाभक्षेत्रात येतो त्यामुळे आमच्याकडे कोणतीही कामे होत नाहीत आणि त्या लाभक्षेत्रात यदाकदाचित आपण वॉटर कॉन्झर्वेशनची कामे अधिक केली आणि त्या ठिकाणी अधिकच्या वॉटर बॉडीज झाल्या तर वरुन येणारे पाणी खाली जाणार नाही. खाली म्हणजे आंध्र प्रदेशला पाणी जाणार नाही याची काळजी आमच्यातील काही लोकांना आहे. या ठिकाणी आम्हाला पिण्यासाठी पाणी नाही आणि खाली आंध्र प्रदेशला पाणी जात नाही म्हणून आपल्याला काळजी आहे.

शासन आम्हाला लाभक्षेत्रात काम करण्याची परवानगी देत नाही. आमचे जायकवाडीवरचे अवलंबत्व 42 टक्के आहे. त्या लाभक्षेत्रामध्ये टँकर लावण्याची वेळ आलेली आहे आणि 42 टक्के अवलंबत्व असताना जर शासन आम्हाला परवानगी देणार नसेल तर तर योग्य नाही. भविष्यात जायकवाडी धरण कायम राहणार आहे. वरच्या भागात 152 टीएमसीचे प्रकल्प झाले त्यावेळी 102 टीएमसीच्या खालचे अवलंबत्व किती आहे हे शासनाच्या लक्षात आले नाही का ? आपण 152 टीएमसीचे प्रकल्प वर बांधले. आज जायकवाडी धरण कोरडे पडलेले आहे. असे असताना आपल्याला आंध्र सरकारची काळजी लागून राहिली आहे. यापेक्षा आमचे दुसरे कोणतेही दुर्दैव असू शकत नाही. माझी विनंती आहे की, या लाभक्षेत्रामध्ये सुध्दा विहिरींची कामे, एमआरइजीएसची बांधबंदिस्तीची जी कामे करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या अटी न ठेवता डोंगरी पध्दतीने काम करण्याची परवानगी द्यावी.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

रोजगार हमी योजने अंतर्गत बीड जिल्ह्यामध्ये पाझर तलावाच्या गॉर्ज फिलिंगची 142 कामे अपूर्ण राहिल्याची माहिती मला रोजगार हमी योजनेचे कार्यकारी अभियंता यांनी दिली आहे. रोजगार हमी योजना बंद झाल्यावर एमआरइजीएस आली आहे. परंतु या योजनेतून ही कामे का होत नाहीत ? या योजनेमध्ये जमीन संपादन करण्याचा भाग समाविष्ट नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की, आमच्या जमिनी तुम्ही ताब्यात घेता पण मोबदला देत नाही. आजपर्यंत प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा पैसा दिला जात होता. परंतु एमआरइजीएसमध्ये जमीन संपादनाचा भाग समाविष्ट नसल्यामुळे शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळत नाही. म्हणून शासनाने किमान स्टेट पूलमधून निधी उपलब्ध करुन देऊन, 142 गॉर्ज फिलिंगची कामे पूर्ण करुन त्या पाझर तलावांचा उपयोग करुन घ्यावा. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या या पाझर तलावासाठी जमिनी खोदलेल्या आहेत, दोन्ही बाजूला भिंत तयार केलेली आहे आणि तेथे फक्त मधला गॉर्ज राहिलेला आहे. गॉर्जचे काम पूर्ण

झाल्यावर त्या जमिनीचा त्यांना मोबदला मिळेल व त्या पाझर तलावाचा त्यांना लाभही मिळेल.

माननीय मुख्यमंत्री बीड येथे आले होते त्यावेळी त्यांनी एक महत्वाचा विषय मांडला होता. ज्या गावांची आणेवारी 50 पैशापेक्षा कमी आहे त्या गावात सिमेंटचे बंधारे बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे त्यांनी सांगितले होते. त्याबाबत चर्चा झाली होती. दुर्दैवाने त्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. नजिकच्या काळात किमान हे अधिवेशन संपण्यापूर्वी ज्या गावांची 50 पैशापेक्षा आणेवारी कमी आहे त्या गावांसाठी आणि लाभक्षेत्रातील गावांसाठी जेथे लिकेजेस आहेत तेथील पाणी अडविले पाहिजे. साधारणपणे 20 हॉर्सपॉवर्सच्या मोटर्स चालू शकतील इतके पाणी वाहून जात आहे. ते पाणी अडविता आले आणि सिमेंट बंधारे बांधले तर पाण्याची गळती थांबविता येईल त्यामुळे त्या त्या भागातील लोकांना चांगला लाभ देता येईल.

सभापती महोदय, यानंतर मी अतिशय महत्वाचा मुद्दा मांडू इच्छितो. केंद्र सरकारने यापूर्वी एका विहिरीची किंमत 92 हजार ठरविली होती. त्यानंतर त्यांनी 1 लाख 90 हजार रुपये किंमत ठरविली होती. आता दोन महिन्यांपूर्वी एका विहिरीची किंमत 3 लाख रुपये ठरविली आहे. आजच्या तारखेपर्यंत त्या निर्णयाला 47 दिवस झालेले आहेत. त्याबाबत मार्गदर्शक सूचना आलेल्या आहेत. त्याबाबत टाईप एस्टिमेट तयार करावयाचे आहे. 3 लाख रुपयांचा त्यांना

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.अमरसिंह पंडित....

ब्रेकअप द्यावयाचा आहे. कोणत्या स्टेजवर किती खर्च करावयाचा आहे ते त्यांना कळवावयाचे आहे. हे टाईप एस्टिमेट जिल्हाधिकारी कार्यालयातून विभागीय आयुक्त कार्यालयात पाठवावयाचे आहे. ते एस्टिमेट उपायुक्त, (रोहयो) यांच्यामार्फत विभागीय आयुक्तांकडे जायचे आहे. त्या टाईप एस्टिमेटला मान्यता देऊन 3 लाख रुपयांच्या कामाला सुरुवात करावयाची आहे. या टाईप एस्टिमेटचे प्रस्ताव मंजुरीअभावी प्रलंबित आहेत.

मी रोज विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना व उपायुक्त,(रोहयो) यांना सकाळी 10 वाजता व संध्याकाळी 4 वाजता रिमाईन्डर एसएमएस पाठवित आहे. "This is just to remind you to sanction Time-estimate." अशा प्रकारचा एसएमएस त्यांना पाठवित असतो. परंतु दुर्दैवाने 47 दिवसामध्ये काही कारणास्तव या एस्टिमेटस्ना अद्याप मान्यता मिळालेली नाही. या प्रखर दुष्काळातही मान्यता मिळालेली नाही. या दुष्काळाची जाण व गांभीर्य जिल्हा व विभागीय प्रशासनाला नसावे असे वाटते. मी केवळ बीड व गेवराईसाठी बोलत नाही तर संपूर्ण मराठवाड्यासाठी बोलत आहे. कोणतीही कामे सुधारित अंदाजपत्रकांच्या प्रशासकीय मान्यतेअभावी होऊ शकत नाहीत. म्हणून शासनाने यासंबंधी तातडीने निर्णय घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना तो कळवावा अशी मी नम्र विनंती करतो.

सभापती महोदय, प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना दुष्काळाशी संबंधित नाविन्यपूर्ण व विशिष्ट काम करण्यासाठी 2 कोटींचे अधिकार देण्यात आल्याची बातमी मी काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रामध्ये वाचली आहे. मला विभागीय आयुक्तांकडून दिनांक 13 तारखेला एक पत्र आले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शोधनासाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

त्या पत्रामध्ये असा उल्लेख आहे की, कोणत्याही परिस्थितीमध्ये 2 कोटी रु.चा निधी आपल्याकडे आरक्षित ठेवा, तो खर्च करु नका. वर्तमानपत्रातून असे सांगितले गेले की, हा रिव्हाल्व्हिंग फंड आहे. हा फंड खर्चच झाला नाही तर तो रिव्हाल्व्हिंग कसा होईल ? जेथे 100 टँकर भरले जातात तेथील एक्सप्रेस फीडरचा प्रस्ताव कॅबिनेट सब कमिटीकडे येतो. पण 2 कोटी रु. खर्च करण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे खर्च कसा करणार हा प्रश्न आहे. पुन्हा असे सांगितले जाते की हा निधी खर्च करण्यासाठी ठेवलेला आहे. या निधीचा उपयोग त्या भागातील लोकांच्या कल्याणकारी योजनांसाठी खर्च होणार नसेल तर या निधीचा कोणताही उपयोग नाही. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी या निधीच्या बाबतीत योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

सभापती महोदय, परळी येथे 1250 मे.वॉट वीज निर्मिती केंद्र आहे. या परळी वीज केन्द्रासाठी वाण तसेच आजूबाजूच्या प्रकल्पातील पाणी आरक्षित केलेले आहे. आम्हाला असे सांगण्यात आले की, उस्मानाबादसाठी पाणी आरक्षित केलेले आहे. हे पाणी उचलून परळीला घेऊन जाता येणार नाही. कारण तेथ पर्यन्त कॅनॉल नाही, रस्ते नाहीत, पूल नाही. परळीचे वीज केन्द्र जर जून पर्यन्त चालवायचे असेल तर 6 एमएम क्यूब पाण्याची आवश्यकता आहे. आज वाण प्रकल्पासहीत अन्य प्रकल्पामधील पाणी आरक्षित केलेले आहे. वाण प्रकल्पमध्ये 16 एमएम क्यूब पाणी आहे. जून पर्यंत 6 एमएम क्यूब पाण्याची आवश्यकता आहे. परळी वीज केन्द्रातील दोन संच चालू केले तर 550 मे.वॉट वीज या फेव्हरेबल कंडिशनमध्ये, जेथे कोळशाची उष्णता कायम राहाते, कोळसा भिजलेला नसतो, अशा फेव्हरेबल कंडिशनमध्ये वीज निर्मिती केली तर 550 मे.वॉट वीज निर्मिती होते. आज आपला वीज निर्मितीचा खर्च 3.30 रु. असून आपण 5 रु. प्रमाणे वीज खरेदी करतो. वीज निर्मितीचा खर्च आणि वीज विकत घेण्यासाठी येणारा खर्च याचा आपण ताळमेळ घातला तर परळी वीज केन्द्राच्या बाबतीत विचार करणे ही काळाची गरज आहे. कारण मी जबाबदारीने सांगतो की, जून-जुलै पर्यंत वाण धरणातील 1 एमएमक्यूब देखील पाणी आपणास टँकर भरण्यासाठी देखील उचलता येणार नाही.

सभापती महोदय, दीर्घकालीन उपाययोजनांच्या बाबतीत मी माझे मत या ठिकाणी मांडणार नाही. त्याची कारणे अनेक आहेत. महामहिम राज्यपाल महोदयांना मी स्वत: जाऊन भेटलो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेच्या वेळी मी माझे मत मांडणार आहे. दुष्काळ पडल्यानंतर टँकरने पाणी पुरवठा करायचा, एमआरइजीएसची कामे करायची, चारा छावण्या करायच्या अशाच उपाययोजना आमच्या नशिबामध्ये असतील तर माझ्या सारख्या नवीन सदस्याला असा प्रश्न पडतो की, खरोखरच आम्ही महाराष्ट्रात आहोत काय ? मराठवाडा हा अशाच प्रकारे अखंडपणे दुर्लक्षित राहाणार आहे काय ? कदाचित महाराष्ट्रामध्ये विलीन होताना आम्ही अटी टाकल्या असत्या तर आमच्यावर ही वेळ आली नसती असे आता वाटू लागले आहे.

सभापती महोदय, मी माझे शेवटचे मत नोंदवित आहे. दुष्काळ हा साधारणे 30 जून पर्यन्त असतो. प्रत्येक जिल्हयाला एक पालक सचिव दिलेला आहे. किमान बीड जिल्हयाच्या पालक सचिवानी प्रत्येक 15 दिवसांनी जिल्हाधिकार्यालयात बैठक घ्यावी. या बैठकीची तारीख आधी निश्चित करावी अशी माझी सूचना आहे. ज्या लोकप्रतिधींना त्यांची मते मांडायची असतील, त्यांच्या अडचणी मांडायच्या असतील, मग त्या टँकरच्या संदर्भातील असतील किंवा एमआरइजीएसच्या संदर्भातील असतील, त्या तक्रारीचे पत्र घेऊन प्रथम जिल्हाधिका-यांकडे जावे लागते. त्यानंतर ते पत्र विभागीय आयुक्तांकडे जाते आणि त्यानंतर ते कॅबिनेट सबकमिटीपुढे येते. मला वाटते की, पालक सचिवांच्या उपस्थितीत अशा सूचनांची नोद घेतली गेली तर त्या सूचना थेट कॅबिनेट सबकमिटीपुढे येतील आणि त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय होईल. सभापती महोदय, मला ज्या योग्य वाटल्या त्या सूचना मी येथे केलेल्या आहेत. मला माझे मत मांडण्याची संधी दिल्या बद्दल मी आपले मनापासून आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांकडून माहिती हवी आहे. या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने मनरेगा, नरेगा आणि एमआरईजीएस यांचा सातत्याने उल्लेख होत आहे. मनरेगा, नरेगा आणि एमआरईजीएस यांचा उल्लेख मला समजलेला नाही. मनरेगा म्हणजे काय आणि एमआरईजीएस म्हणजे काय याची मला माहिती हवी आहे. संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. नरेगा, मनरेगा आणि एमआरईजीएस हे शब्द कशातून आले आहेत, हे शब्दप्रयोग इंग्रजीमधील आहेत काय, ते शब्दप्रयोग हिंदीमधील आहेत काय, सदर शब्दप्रयोग काय आहेत, याची मला काहीही माहिती नाही. त्या योजना एकच आहेत की वेगवेगळया आहेत, या गोष्टींची मला माहिती हवी आहे. या ठिकाणी या शब्दप्रयोगांचा उल्लेख होतो आहे, त्या शब्दप्रयोगाची इतिवृत्तात नोंद होत आहे. काही सदस्य नरेगा म्हणत होते, काही सदस्य मनरेगा म्हणत होते, काही सदस्य एमआरईजीएस असे बोलत आहेत. नक्की कोणत्या योजने बद्दल या ठिकाणी उल्लेख होतो आहे हे कळत नसल्यामुळे आम्हाला संबंधित मंत्र्यांनी मार्गदर्शन करावे.

श्री.गुलाबराव देवकर : राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केलेली आहे. त्या योजनेचा उल्लेख महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणून केला जातो. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगा.

श्री.दिवाकर रावते : म म्हणजे काय, न म्हणजे काय, रे म्हणजे काय व गा म्हणजे काय या गोष्टी मला समजून घ्यावयाच्या आहेत.

श्री.गुलाबराव देवकर : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगा योजना म्हणतात.

श्री.दिवाकर रावते : मनरेगाचा उल्लेख सभागृहात वारंवार होत आहे. मनरेगा हे कोठून आणले याची मला माहिती द्यावी. तसेच म म्हणजे काय, न म्हणजे काय, रे म्हणजे काय व गा म्हणजे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आहे, त्या योजनेस मनरेगा असे म्हटले जाते. त्या योजनेचे ते संक्षिप्त नाव आहे. एमआरईजीएस योजनेलाच मनरेगा असे म्हणतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : या योजनेचे नाव बरोबर नाही म्हणून ते खोडून काढा. मनरेगा म्हणजे काय ते आम्हाला समजले पाहिजे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजे मनरेगा कसे होईल. मी उद्या आपणास कोणत्याही नावाने बोलाविले तर चालेल काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेस आपण मनरेगा म्हणतो. 8

श्री.दिवाकर रावते : मनरेगा आणि नरेगा यांचा वारवांर सभागृहात उल्लेख होतो आहे. तुम्ही उभे राहून सांगितले पाहिजे की, नरेगा हे नाव बरोबर नाही. नरेगा, मरेगा, फरेगा असे शब्द यमक जुळविण्यासाठी ठीक आहेत.

श्री.गुलाबराव देवकर : दोन्ही अर्थाने त्याचा उल्लेख करीत असतो. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेला मनरेगा असे म्हणतात.

श्री.दिवाकर रावते : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना. त्या योजनेचे नाव इंग्रजी मध्ये असे आहे की, महात्मा गांधी नॅशनल रुरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी ॲक्ट. या योजनेच्या बाबतीत अधिकाऱ्याने बारसे केलेले आहे. ते अयोग्य असेल तर ते नाव नीट झाले पाहिजे. सरकार म्हणून तुमची जबाबदारी काय आहे ? महाराष्ट्रात त्या योजनचा उल्लेख कोणत्या नावाने करणार आहात ?

श्री.गुलाबराव देवकर : या योजनेचा दोन्ही अर्थाने उल्लेख होतो. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना हे मराठी नाव आहे. आपण या योजनेचा उल्लेख इंग्रजीमध्ये केला. मनरेगा आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अशा दोन्ही अर्थाने त्या योजनेचा उल्लेख केला जातो.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ.दीपक सावंत : 'न' अक्षर कशाबद्दल वापरले आहे?

श्री.गुलाबराव देवकर : 'न' अक्षर इंग्रजी नॅशनल या शब्दाबद्दल वापरले जाते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासकीय योजनेचे व्यवस्थित नामकरण केले जात नसेल, योग्य खुलासा होत नसेल तर काय करायचे? ते म्हणतात, हे म्हणतात म्हणून आम्ही म्हणतो असा शासनाचा कारभार चालतो का? तुम्ही सर्वसामान्य लोकांच्या खिशातून कर रुपाने पैसा गोळा करीत आहात, केंद्र सरकारकडून महात्मा गांधींच्या नावाने निधी येत असतो.

श्री.गुलाबराव देवकर : नॅशनल रुरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम यामध्ये नॅशनल या इंग्रजी भाषेतील शब्दाबद्दल मराठी भाषेतील 'न' अक्षराचा उल्लेख केला जातो.

श्री.दिवाकर रावते : मंत्री महोदयांनी स्पष्ट शब्दात खुलासा करावा. 'म' म्हणजे काय, 'न' म्हणजे काय, 'रे' म्हणजे काय आणि 'गा' म्हणजे काय?

श्री.गुलाबराव देवकर : 'म' म्हणजे महात्मा गांधी, 'न' म्हणजे नॅशनल रुरल एम्प्लॉयमेंट स्कीम.

श्री.दिवाकर रावते : 'न' म्हणजे नॅशनल?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी व्यवस्थित खुलासा केलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अधिकाऱ्यांना वाटते म्हणून कुठेही कोणताही इंग्रजी शब्द वापरला जातो. महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून योजना राबविली जात असताना स्वाभिमान आहे की नाही? सरकारने आणलेली योजना लोकांच्या हितासाठी राबविली जात आहे. योजनेच्या नावामध्ये शुध्दता असावयास हवी. पूर्ण इंग्रजी, पूर्ण मराठी किंवा पूर्ण हिंदी भाषेत योजनेचे नामकरण असावयास हवे.

श्री.गुलाबराव देवकर : मराठीचा जो उल्लेख केला आहे त्याबाबत क्लिअर मराठी आणि इंग्रजीमध्ये योजनेबाबत वाक्यरचना करण्यात येईल. मी नोंद घेत आहे.

श्री.दिवाकर रावते : ठरावाच्या मसुद्यामध्ये नमूद केलेली 3 आर योजना काय आहे?

श्री.गुलाबराव देवकर : 3 आर योजना म्हणजे केंद्र आणि राज्य सरकारची जी योजना आपण राबवितो त्याचा उल्लेख केलेला आहे. जलसंधारण विभागाचा हा विषय आहे.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, 1993 मध्ये सूदान या देशात केव्हीन कार्टर नावाचा फोटोग्राफर छायाचित्र घेण्यासाठी पोहोचला. संयुक्त राष्ट्र संघाने छावणी उभारली होती. तरीही अन्नधान्याचा तुटवडा जाणवत होता. धान्याचा ट्रक आला की लोक धावत सुटत आणि धान्य लुटून घेण्याचा प्रयत्न करीत असत.

नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

लोक निघून गेल्यानंतर कार्टरच्या लक्षात आले की, एक छोटीशी मुलगी तिला चालताही येत नव्हते, ती मुलगी खुरडत दाणे टिपण्याचा प्रयत्न करीत होती. या मुलीच्या छातीचा पूर्ण पिंजरा झाला होता व या मुलीच्या मागे एक गिधाड उभे होते. ही मुलगी कधी मरते आणि मी सावज कधी टिपतो असे त्या गिधाडाला वाटत होते. हा फोटो कार्टरने काढला व हा फोटो जगभर गाजला. या फोटोमुळे प्रचंड वादळ उठले होते. ज्यांनी हा फोटो पाहिला त्यांनी कार्टरला विचारले की, "कार्टर या मुलीचे नंतर काय झाले ?" आयुष्यभर कार्टरला हा फोटो छळत होता. या फोटोमुळे कार्टरला अनेक पुरस्कार मिळाले परंतु हा फोटो कार्टरला छळत असल्यामुळे त्याने आत्महत्या करुन जीवन संपवले.

सभापती महोदय, सुदान मधील तो दुष्काळ आज महाराष्ट्राच्या वाट्याला आलेला नाही. परंतु 1972 च्या दुष्काळापेक्षा अधिक वाईट स्थिती या दुष्काळामध्ये आहे असे सांगितले जाते. या दुष्काळामध्ये अन्नधान्याचा तुटवडा नाही परंतु आज पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. आज पाण्याचा टँकर जेव्हा गावात पोहचतो तेव्हा लोकांची धडपड सुरु होते. कोरडया विहिरीत पाणी ओतले जाते व ते गढूळलेले पाणी खेचून घेण्यासाठी जी प्रचंड गर्दी उसळते त्यामध्ये आतापर्यंत 2-3 दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत.

सभापती महोदय,1972 साली माननीय यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्राने दुष्काळावर मात केली व प्रचंड कामे उभी केली. परंतु 65 वर्षानंतर सुध्दा या महाराष्ट्रातील 12 हजार गावे तहानलेली राहिली आहेत ही या राज्याला भूषणावह बाब नाही.

सभापती महोदय, धरणे खूप झाली, सिंचन वाढले परंतु या 12 हजार गावांमध्ये पाणी का पोहोचले नाही या प्रश्नाचे उत्तर राज्यकर्त्यांना द्यावे लागणार आहे. सुदानमध्ये गिधाड वाट पहात होते परंतु तुम्ही कोणाची वाट पाहत आहात ? कारण त्या घागरीमध्ये पाणी ओतण्याची जबाबदारी तुमची होती. आजही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा टँकर जातो ही काही या राज्य सरकारला भूषणावह बाब नाही तर ती लज्जास्पद बाब आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

सभापती महोदय,महाराष्ट्र औद्योगिक आणि विकासाच्या बाबतीत अव्वल असल्याचा दावा महाराष्ट्र शासन करते. महाराष्ट्र गुजरातपेक्षाही पुढे आहे असाही दावा शासन करीत आहे. परंतु आकडेवारी असे सांगते की, दारिद्रयामध्ये आंध्र प्रदेश आणि ओरिसा राज्याबरोबर महाराष्ट्र राज्य स्पर्धा करीत आहे. पहिल्या 8 राज्यांमध्ये दारिद्रय आहे, पाण्याचे दुर्भिक्ष आहे, अन्नाचे दुर्भिक्ष आहे, जेथे कुपोषणाने मुले मरतात अशा आठ राज्यामध्ये महाराष्ट्राचा नंबर लागतो त्यामुळे याचे उत्तर आपण देणार आहोत की नाही ? असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मघाशी माननीय जयंत प्र.पाटील साहेबांनी उल्लेख केला तसेच जगभर सांगितले जाते की, या पुढचे महायुध्द पाण्यावरुनच होणार आहे. परवा गोदावरीचे पाणी जायकवाडी धरणामध्ये पोहचविण्याचा प्रयत्न झाला त्यावेळी संगमनेर आणि नाशिक येथे निदर्शने झाली, पाणी अडवण्याचा प्रयत्न झाला. आज राज्या-राज्यामध्ये, जिल्हया-जिल्हयामंध्ये, भागाभागांमध्ये पाण्यामुळे तंटे होण्यास आताच सुरुवात झालेली आहे. त्यामुळे हा संघर्ष शासन कसा टाळणार आहे ? या प्रश्नाचे उत्तर शासनाला द्यावे लागणार आहे.

सभापती महोदय,पर्जन्य छायेखालील प्रदेश कोणते आहेत हे स्पष्ट आहेत. 65 वर्षापूर्वी ज्या भागांमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष होते त्याच भागात आजही पाण्याचे दुभिक्ष आहे. हे तेच पट्टे आहे, या पट्टयातील लोकांना निसर्गाशी आणि दारिद्रयाशी झुंजावे लागत आहे. ही 12 हजार गावे तीच आहेत की, जेथे मजुरांचे तांडेच्या तांडे नेहमी स्थलांतर करतात आणि आजही तेथील तांडेच स्थलांतर करीत आहेत. भटकंतीच्या वस्त्याही त्याच आहेत. आदिवासींच्या पाठोपाठ आरोग्य आणि शिक्षण या दोन्ही बाबतीत मागे असलेले भाग नेमके हेच आहेत आणि नेमके हेच ते पट्टे आहेत. या पट्टयांना आपण पाणी न दिल्यामुळेच मागासलेपणा, दारिद्रय,भटकंती त्यांच्या पाचवीला पुजली आहे. याला जबाबदार राज्यकर्ते आहेत ते लोक नाहीत हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय,कुकडी प्रकल्पाचे पाणी करमाळा मागत आहे परंतु त्यांना तुम्ही पाणी देत नाही. आणि ऊजनीचे पाणी मात्र तुमच्या कारखान्यासाठी तुम्ही 100 कि.मीटर दूर घेऊन जाता परंतु त्या परिसरातील गावांना पाणी देत नाही. कर्जत, जामखेड, भूमपरांडा या ठिकाणच्या पाण्याची एकही योजना या शासनाने यशस्वी होऊ दिली नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

जायकवाडी धरण श्री.शंकररावजी चव्हाण यांच्या मुळे झाले.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सभागृहाच्या अनुमतीने सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे भाषण संपे पर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, जायकवाडी धरण श्री.शंकरावजी चव्हाण यांच्यामुळेच झाले. अन्यथा मराठवाड्यातील आजची परिस्थिती प्रचंड वाईट झाली असती. जायकवाडीला देखील विरोध झाला. त्यामुळे त्या धरणाची जागा सरकली. त्यामुळेच आज जायकवाडी धरण पूर्ण भरले जात नाही. ते अर्धेच भरले जाते.

सभापती महोदय, आज जालना जिल्ह्याची प्रचंड उपासमार सुरू आहे. जत, कवठेमहांकाळ, मिरज हे पश्चिम महाराष्ट्रात असले तरी ते त्यांच्या मतदार संघात येत नाहीत म्हणूनच त्यांना तहानलेले रहावे लागते. बारामती, इंदापूर हा आपला भाग सोडून उरलेला भाग दुष्काळात लोटत राहण्या मागचे जे राजकारण आहे त्याचाही शोध घेतला पाहिजे.

बीड-उस्मानाबाद जिल्ह्यांनी काय पाप केले होते ? जिंतूरच्या कंकरवाडीतील श्रीमती गंगूबाई साबळे ही महिला इंदापूरला काम शोधत आली. त्यांना कांदे काढण्याचे काम देऊ असे सांगितले होते. परंतु, प्रत्यक्षात त्यांना ऊस तोडायला दिले. ते जमले नाही. त्यामुळे भांडण झाले. झटापट झाली. लोक पळून गेले. गंगूबाईला पळता आले नाही. लोक निघून गेल्यानंतर ती निघाली. तिला जिंतूरला आपल्या गावी पोचण्यासाठी सोळा दिवस गेले. 16 दिवस तिचे कुटुंब आपली माय मेली की जीवंत आहे याचा शोध घेत होती. एवढी प्रचंड स्थिती त्यांच्यावर येण्यास राज्य शासनाचे धोरण जबाबदार आहे.

आज मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतर सुरू आहे. हे स्थलांतर वाईट आहे. मराठवाड्यातील एकाच पट्टयातील लोक स्थलांतर करीत आहेत. हा पट्टा आजचा नाही. हा पूर्वापार पट्टा आहे. या राज्यात दुष्काळी पट्टा आहे त्या भागातीलच लोक स्थलांतरित होत आहेत. तेथील लोकच ऊस तोडणीसाठी जात आहेत. तेथील लोकच भटके विमुक्त असतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

हेच लोक शिक्षणापासून दुरापास्त राहतात. ही परिस्थिती केवळ पाणी पोहचू दिले नाही म्हणून आहे. यात त्यांच्या नशिबाचा काहीही संबंध नाही. हे शासनाचे पाप आहे आणि त्यांना भोगायला लावत आहात. हा त्यातील महत्त्वाचा भाग आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी याचा उल्लेख मानव निर्मित आहे असा केला आहे. मी तर म्हणेन हे मानवनिर्मित नसून शासन निर्मित आहे. राज्य शासनाच्या धोरणाचा परिपाक म्हणून राज्यात दुष्काळ आहे.

सभापती महोदय, मला एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधायचे आहे. आपण आता पर्यंत अवर्षण, टंचाई जाहीर करीत होतो. परंतु, माननीय राज्यपाल महोदयांनी त्यांच्या अभिभाषणामध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. त्यांनी आपल्या अधिकृत भाषणामध्ये "दुष्काळ" हा शब्द वापरला आहे. मी इंग्रजी शब्द देखील बघितला. त्यात Draught हा शब्द वापरला आहे. त्यांनी टंचाई किंवा अवर्षण हा शब्द वापरलेला नाही. दुष्काळ हा शब्द वापरला असेल तर त्याचे निकष बदलतात. ते निकष बदलून केंद्र शासनाकडे तशी मागणी केली आहे काय, त्याप्रमाणे धोरणे आखली आहेत काय, हा माझा प्रश्न आहे. टंचाई आणि अवर्षणासंबंधातील धोरणे आणि दुष्काळाची धोरणे यात जमीन आस्मानाचा फरक आहे. त्यात बरेच अंतर आहे. माननीय राज्यपाल महोदय दुष्काळ हा शब्द वापरत असतील तर मग सगळी परिस्थिती बदलते. माननीय राज्यपाल महोदयांचे हे अधिकृत भाषण आहे. ते जाहीर केलेले आहे. त्यामुळे त्या निकषावरच मराठवाड्याने न्याय मागितला पाहिजे हे मी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना सांगू इच्छितो. त्याबद्दल त्यांनी तसूभर देखील मागे जाता कामा नये. आता सरकारला मागे जाता येणार नाही. त्यांना अवर्षण किंवा टंचाईकडे या शब्दांकडे जाता येणार नाही. त्यामुळे आता दुष्काळाचे निकष लावण्याची जबाबदारी शासनावर आहे.

सभापती महोदय, पाऊस आता कमी पडतो ही गोष्ट खरी आहे. असे असले तरी प्रत्येक पडणारा थेंब हा साठवण्याची भाषा होते. पण तो साठवण्यामध्ये भेदभाव होतो हे देखील तितके खरे आहे. हा थेंब कुठे, कधी व कोणासाठी साठवायचा यामध्ये खरे भांडण आहे. या मंडळीनी ठरविले की, तो येथे साठवायचा, या मंडळींनीच ठरविले की, तो आपल्यासाठी साठवायचा. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

मंडळींनी ठरविले की, हा थेंब तेथे पोहचू द्यायचा नाही. गेल्या 100 वर्षापासून जेवढा पाऊस पडत आहे तेवढाच आज देखील पडत आहे. गेल्या 100 वर्षातील पावसाची सरासरी बदलली नाही असे श्री.गोवारीकर सांगत आहेत. या सरकारने पाणी साठवण्यावरून विशिष्ट भागामध्ये जाणीवपूर्वक भेद निर्माण केला आहे. 16 जिल्ह्यांमध्ये 121 तालुक्यांमध्ये आज दुष्काळी परिस्थिती आहे. त्याला शासनाचे भेदभावाचे, पक्षपातीपणाचे, सवतीसुभ्याचे, मत्सराचे धोरण कारणीभूत आहे. बाकीच्यांनी ओरडून आपले घसे कोरडे करायचे आणि त्यांनी मात्र आपले तलाव भरून घ्यायचे ही या राज्यातील स्थिती आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, डॉ.मेहबूब हग नावाचे पाकिस्तानी अर्थतज्ज्ञ होते. त्यांनी विकास कशाला म्हणायचा या संदर्भात काही कल्पना मांडल्या होत्या. त्याचाच विकास पुढे डॉ.अमर्त्य सेन यांनी केला. युनोकडून जो मानव विकास निर्देशांक जाहीर होतो त्यामध्ये आपण कोठे बसतो याची जगभर सर्वजण वाट पाहत असतात. आपला देश 153 क्रमांकावर आहे. पण या राज्यामध्ये काय स्थिती आहे ? मानव विकास निर्देशक्रामध्ये शिक्षण, आरोग्य आणि पाणी असे अनेक भाग आहेत. पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. तेव्हा पाण्याचा निर्देशांक अगोदर निश्चित केला पाहिजे. मानव विकास निर्देशकामध्ये दारिद्रय रेषा निश्चित केली जाते. त्याप्रमाणे आपणास वॉटर, पॉवर्टी लाईन निश्चित करावी लागेल. आपणास वॉटर इंडेक्स निश्चित करावा लागेल. एकदा वॉटर इंडेक्स निश्चित झ ाल्यानंतर मग कोणाचे पाणी कोठे गेले, कोणाचे पाणी कोणी पळविले, कोणाला किती पाण्याचा वाटा मिळाला पाहिजे याचे गणित मांडता येईल. परंतु आजही एकाही राज्याने वॉटर इंडेक्स केलेला नाही. माझे असे म्हणणे आहे की, आपण महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हणत असाल तर या राज्याचा वॉटर इंडेक्स काय, सरासरी किती पाणी असले पाहिजे हे आपण निश्चित केले पाहिजे. तसेच वॉटर पॉवर्टी लाईन देखील निश्चित केली पाहिजे. मग कोण किती खाली आहे, त्या प्रमाणे विकासाच्या योजनांमध्ये त्यांचा हक्क पोहोचेल.

सभापती महोदय, आज वॉटर पॉवर्टी इंडेक्स खूप महत्वाचा आहे. ती लाईन आखणे आवश्यक आहे. ती होत नाही म्हणून आज सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना ओरडावे लागत आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडीत यांना म्हणावे लागले की, आमच्यासाठी निकष वेगळे आणि तुमच्यासाठी निकष वेगळे आहेत काय ? त्यांना न्याय मिळत नाही म्हणून त्यांची ओरड आहे. आपण वॉटर पॉवर्टी लाईन निश्चित केल्या नंतर पाण्याच्या योजनांबद्दलच्या आखणी मध्ये, नियोजनामध्ये जो काही फरक आहे तो निश्चित करता येईल आणि वाटा मागता येईल. मग बीपीएलच्या जशा योजना होतात तशा वॉटर पॉवर्टी लाईन खालच्या विभागांना आपणास न्याय देणे भाग पडेल.

सभापती महोदय, सरकारने चारा छावण्यांच्या संदर्भात योग्य निर्णय घेतलेला आहे. आज लोकांना दुष्काळ आवडतो. दुष्काळ आला की लुटण्याची एक संधी मिळते. शेतकऱ्यांना आणि मजुरांना काय मिळते हा मुद्दा गौण असतो. दुष्काळाचे नियोजन ज्यांच्या हातामध्ये आहे त्या सर्वांना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

दुष्काळ हवा असतो.

सभापती महोदय, श्री.पी.साईनाथ यांनी आंध्र प्रदेशमध्ये जो सर्व्हे केला आणि त्यातून त्यांनी "Everybody Loves Drought" हे एक पुस्तक लिहिले आहे. त्यांनी दाखवून दिले की, एका जिल्ह्यामध्ये दुष्काळ पडल्यानंतर आणि पॅकेज जाहीर झाल्यानंतर एका महिन्यात 500 स्कॉर्पिओ गाड्या आल्या. दुष्काळ जाहीर केल्यानंतर 123 तालुक्यांमध्ये पुढील महिन्यात किती गाड्या आल्या, कोणाच्या दारात काय काय आले याचा अहवाल पुढच्या अधिवेशनात मांडला तर अधिकाऱ्यांकडे काय आले, पुढाऱ्यांकडे काय आले, हे सर्व आपल्यापुढे येईल.

सभापती महोदय, चारा छावण्यांच्या बाबत माझी मागणी आहे की, आपण चारा छावण्या बंद कराव्यात. आपण सरळ दावणीला चारा द्यावा. मी शहरातील असलो तरी मागील चार दिवसांत चार जिल्ह्यांचा दौरा केलेला आहे. काही लोक खूप प्रामाणिकपणे चारा छावणी चालवित आहेत. मी त्यांना दूषण देत नाही. आपण चारा छावण्या बंद करुन थेट शेतकऱ्यांना चारा द्यावा. त्यामुळे दोन फायदे होतील. एक तर भ्रष्टाचार थांबेल आणि दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे एकदा छावणीमध्ये गुरे दिल्यानंतर त्या ठिकाणी दोन माणसे अडकली जातात. म्हातारा माणूस तेथे अडकतोच परंतु त्याला रोज शिदोरी घेऊन जाणारा एक माणूस देखील अडकतो. आज शाळेतील मुले शाळेला दांडी मारुन तेथे जात आहेत. मुलांच्या शाळा बंद झालेल्या आहेत. तेव्हा शेतकऱ्यांच्या घरात गुरे राहू द्यावीत. ती शेतीच्या आणि अन्य कामाला देखील उपयोगी येतील व शेणी देखील त्याला मिळेल.

सभापती महोदय, आज गुरे छावणीमध्ये गेल्यामुळे त्याला शेणी देखीत मिळत नाही कारण शेणीवर चारा छावणी मालकाचा अधिकार झालेला आहे. छावणीमध्ये गुरांना ऊसाची चिपाड खायला घातली जातात. ती ऊसाची चिपाड चघळून गुरांच्या तोंडातून रक्त येऊ लागले आहे आणि ऊस खाऊन गुरांना डायबेटीस होतो त्याचे काय ? गेल्या वेळच्या छावण्यानंतर अनेक गुरे मेली होती. ती कसायला विकली असती तर पैसे तरी मिळाले असते. छावणीमध्ये गुरांना मिश्रित खाद्य द्यायला पाहिजे ते दिले जात नाही. या ठिकाणी मक्याच्या भुशाचा उल्लेख झाला. तो खाण्यासाठी नरम असतो. तो गुरांना खायला द्यायला पाहिजे. गुरांना औषधे दिली जात नाही. औषधाच्या नावाखाली दुसरे काही तरी दिले जाते. ..3..

AJIT/ MMP/ पूर्वी श्री.भारवि.. 18:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

तेव्हा छावणीमध्ये असलेली जनावरे पुढच्या काळात मरणार आहेत त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी त्यांच्या भाषणात गाढवाचा उल्लेख केला. दुष्काळ किंवा अवर्षणाचा फटका फक्त शेतकऱ्यांना बसतो असे नाही तर शेतीवर अवलंबून असणारे इतर छोटे छोटे समाज आहेत त्या सर्वांना बसतो. त्यांचे जे परंपरागत उद्योग व व्यवसाय आहेत त्यांच्या पुनर्वसानाचे काय ? त्यांच्यासाठी कोठे छावण्या लावण्यात येतात ? तेव्हा पुढाऱ्यांच्या दावणीला छावणी लावण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या आणि मजुरांच्या दावणीला, जे जे कोणी विमुक्त आणि भटक्या जमातीचे तांडे असतील त्यांच्या दावणीला चारा दिला पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

महोदय, राज्यात रोजगार हमी योजनेची कामे सुरु आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरु झाल्यानंतर आपल्या राज्याने राज्याच्या योजनेची सर्व जबाबदारी झटकून टाकली. राज्य सरकार केंद्र सरकारच्या योजनेच्या पैशांवर आशा लावून आहे. आम्ही आमचा पैसा खर्च करणार नाही या पध्दतीने आज राज्य सरकारच्या माध्यमातून निर्णय होत आहेत. जी कामे सुरु आहेत त्या कामावरील मजुरांना दीड-दोन महिने मजुरी दिली जात नाही. 145 रुपये रोज असताना 100 रुपयांच्या आतच ते काम होते आणि नंतर थांबते. वास्तविक पाहता किमान वेतनापेक्षा जास्त मजुरी द्यावयास पाहिजे. 1972 च्या दुष्काळात रोजगार हमी योजना सुरु केली गेली. त्या योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारने देशाला पुढचा आदर्श घालून द्यावयास पाहिजे. परंतु तसे न करता त्या निकषावर आताच्या योजना आखल्या जात असतील तर त्यामुळे शेतकरी, शेतमजूर आणि महाराष्ट्राचे प्रचंड प्रमाणावर आपण नुकसान करीत आहात, असेच म्हणावे लागेल. राज्यातील लोकांना तुम्ही काय देणार आहात, हा प्रश्न मी या निमित्ताने उपस्थित करतो.

महोदय, वॉटर इंडेक्सच्या बाबतीत मी मघाशी उल्लेख केला. दरडोई 1700 घनमीटर पाणी माणसाला लागते. हा माझा नव्हे तर युनोचा आकडा आहे. इतके पाणी मिळत नसेल तर त्या देशावर जलताण आहे असे मानले जाते. माणसी 1000 घनमीटर पेक्षा कमी पाणी मिळत असेल तर टंचाई जाहीर करावी लागते. 500 घनमीटर पेक्षा कमी मिळत असेल तर पाण्याचे दुर्भिक्ष असल्याचे समजले जाते. आपण या आकडेवारीच्या नेमके कोठे आहोत हे समजले पाहिजे. टंचाई जाहीर करीत असताना टंचाईबाबतचे आकडे जाहीर करावयास पाहिजेत. मला वाटते उत्तरामध्ये सरकारने काय उपाययोजना करणार आहे हे न सांगता टंचाईची आकडेवारी जाहीर केली पाहिजे.

आज दुष्काळी भागातील पिके करपून गेली आहेत. आता वॉटर इंडेक्सचा मुद्दा मूलभूत आहे. कारण पिके येणे हे पाण्यावर अवलंबून आहे. त्या पाण्याची पातळी किती आहे, किती दरडोई पाणी उपलब्ध आहे, धरणात किती पाणी उपलब्ध आहे, इतर पाणी साठ्यात किती पाणी उपलब्ध आहे, या बाबतची तालुका आणि गावनिहाय आकडेवारी दिली पाहिजे. आपण खरोखरच दुष्काळाच्या बाबतीत गंभीर असाल तर ही आकडेवारी द्यावी. जर आपण गंभीर नसाल तर आम्ही स्वत:च 18 एप्रिलपर्यंत ही आकडेवारी गोळा करु. ती आकडेवारी गोळा केल्यानंतर पुन्हा या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

विषयी माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर आणि श्री.दिवाकर रावते यांना अधिक बोलता येईल. कारण माझ्यापेक्षा आपण ग्रामीण भागात काम करता, ग्रामीण भागातील लोकांच्या यातना आपण बघितलेल्या आहेत.

महोदय, अमेरिकन नागरिक दररोज 580 लीटर पाणी वापरतो. चीनमध्ये हे प्रमाण 90 लीटर आहे. मुंबई-दिल्लीत हे प्रमाण 80 लीटर आहे. ग्रामीण भागात तर हे प्रमाण 40 लीटरपेक्षा खाली आहे. याचाच अर्थ इतक्या मोठ्या प्रमाणावर पाणी फ्लशमध्ये जाते. प्रत्येक घरी जेवढे पाणी फ्लशमुळे वाया जाते तेवढे पाणी सबंध दुष्काळग्रस्त भागातील कुटुंबाना वर्षभरात उपलब्ध होत नाही. लातूरला 1200 फूटच्या खाली बोअर घ्यावी लागते. या गोष्टींचा आपण विचार करणार आहोत की नाही ? आता इलाज नसल्यामुळे बोअरबाबत पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. या राज्य सरकारकडून वारंवार सिंचन क्षेत्र वाढविण्यात आल्याचे सांगितले जाते. 17-18 टक्के सिंचन क्षेत्र वाढविल्याचे सांगितले जाते. मी तर म्हणेन की, 70 टक्क्यांपेक्षा अधिक शेती तुमच्या सिंचनावर नव्हे तर बोअरवर चालते. ही बाब या सरकारला लज्जास्पद आहे. भूगर्भात 400 फूटापर्यंतचे पाणी साठण्यासाठी 400 वर्षे लागतात. 1000 फुटाच्या खाली पाणी गेल्यानंतर जी चाळणी होणार आहे त्याचे काय करणार आहात ?

आज लोक एकमेकांच्या जवळजवळ बोअर घेत आहेत. शिवाय वेड लागण्या इतपत बोअर घेण्यावर खर्च करतात. भूगर्भात पाणी नसल्यामुळे आणि त्या ठिकाणी बोअर घेतल्यामुळे रात्री इ ोपल्यानंतर वेगवेगळे आवाज घुमायला लागतात. त्यामुळे लोकांना भीती वाटते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर बोअर घेणे थांबविले पाहिजे. शिवाय पाण्याच्या संदर्भात एक नवीन धोरण घेऊन राज्य सरकारने पुढे आले पाहिजे.

या सरकारने कृत्रिम पावसाचा प्रयोग करणे मध्येच सोडून दिले. तसेच मुंबई महानगरपालिकेने मध्यंतरी कृत्रिम पाऊस पाडण्याचा विचार केला आणि नंतर तो सोडून दिला. या उलट चीनने ऑलिम्पिक स्पर्धांच्या वेळी आलेले ढग कृत्रिमरित्या पळविले आणि नंतर पावसाची गरज पडल्यावर पुन्हा ढग परत आणले.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. कपिल पाटील .....

या बाबतीत चीन पुढे गेलेला आहे. चीन एवढा पुढे गेला आहे की, वीज कधी पडणार हे ते सहा तास आधी सांगतात. तुमच्या भागात ढग गडगडणार आहे, वीज पडणार आहे, ढग फुटणार आहे, सावध राहा असे ते सांगतात. आपण आपल्या गरीब जनतेला ढगात ढकलण्याचे ठरवून टाकले आहे. या देशातील गोरगरीब, शेतमजूर, मागास जनता जी निसर्गावर अवलंबून आहे त्यांना ढगातच लोटण्याचे जणू काही आपल्या शासनाचे धोरण आहे. कारण तुमची पोटे भरलेली आहेत, बाकीच्यांनी फक्त मरावे असे आपण ठरविले आहे का एवढेच सांगावे.

कृत्रिम पावसासाठी फार खर्च येत नाही. श्री. गोवारीकर यांच्यासारखा शास्त्रज्ञ आपल्याकडे आहे. आपल्याकडे उत्तम प्रकारचे शास्त्रज्ञ आहेत. जी दर्जेदार इंजिनिअरींग, जी यंत्रणा पाहिजे ती आपल्याकडे आहे. आपण चीन किंवा अमेरिकेवर अवलंबून राहू नका. आपण चीनची टेक्नॉलॉजी वापरावी. पाच वर्षे सतत प्रयोग चालू ठेवावा. हे पैसे वाया गेले तरी चालतील. त्या बाबतीत सभागृह शासनाला दोष देणार नाही. पण उस्मानाबाद, बीड, कर्जत, जामखेड, कवठेमहांकाळ असे जे दुष्काळी पट्टे आहेत त्या ठिकाणी हा प्रयोग करीत राहावे. पैसे वाया गेले तरी चालतील. तुम्ही कमी खा. तुम्ही पैसे कमी खाल्ले तर राज्याचे सगळेच प्रश्न सुटतील. 10 टक्के जरी भ्रष्टाचार कमी केला तरी आपले सर्व प्रश्न सुटतील. शासनाने कृत्रिम पावसाच्या प्रयोगाबाबत धाडसाने निर्णय करावा, अशी माझी मागणी आहे. आपण पिण्याच्या पाण्याचा हक्क सुध्दा निश्चित करावा आणि हे जाहीर करावे की, तुम्हाला एवढे पाणी मिळेल. तेवढे पाणी देण्याची जबाबदारी शासनाची राहील. ज्या ठिकाणी अतिरिक्त पाणी वापरले जाते त्यावर आपल्याला निर्बंध घालता येतील.

सभापती महोदय, शासनाने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्याची घोषणा केली. अवर्षण कधी आले? परीक्षा फी नंतर घेतली गेली आहे. अशा प्रकारे परीक्षा फी का घेतली? आपल्याला सप्टेंबरपर्यंत कळले होते की, पाऊस पडणार नाही. डिसेंबरमध्ये आपण चर्चा केली. त्यावेळी आम्ही सांगत होतो. मग परीक्षा फी का घेतली ? परीक्षा फी घेतल्यानंतर ती परत केली. हा काय प्रकार आहे ? आपण परीक्षा फी परत देणार आणि ती फी परत घेण्यासाठी फेऱ्या माराव्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

लागणार. परीक्षा फी परत करणे सोपे आहे. कारण दहावी, बारावीची परीक्षा फी साडेतीनशे रुपये आहे. कालेजची किंवा व्यावसायिक अभ्यासक्रमाची फी फार तर हजार बाराशे रुपये असेल. 300 रुपये परत केले की, आमचा प्रश्न संपला. आपल्याला फी परत करावयाची असेल तर ट्यूशन फी परत करावी. फक्त सरकारीच नाही तर जेवढे खाजगी इंजिनियरींग कॉलेजेस असतील, मग तेरणा असेल, भारती विद्यापीठ असेल किंवा डी.वाय.पाटील असेल, मी कोणा व्यक्तीचे नाव घेत नसून संस्थेचे नाव घेत आहे, नाही तर नोटीस न देता नाव घेतो असा प्रश्न निर्माण होईल. ही संस्थेची नावे आहेत म्हणून मी घेतली. या सर्व खाजगी इंजिनिअरींग, मेडिकल, पॉलिटेक्निक कॉलेजेस यांनी दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांकडून घेतलेली ट्यूशन फी परत केली पाहिजे. ती फी परत केली तरी त्या कुटुंबाला मोठा आधार मिळेल आणि पुढचे शिक्षण घेण्याची उमेद आणि कुवत त्यांच्यामध्ये राहील.

सभापती महोदय, त्यांची पुढची ॲडमिशन सुध्दा मोफत केली पाहिजे. आता जूनमध्ये काही ॲडमिशन्स सुरु होतील. पाऊस पडण्यासाठी जुलै उजाडतो. कारण महाराष्ट्राच्या उर्वरित भागामध्ये पाऊस पडण्याचा कालावधी पुढे सरकलेला आहे. त्या ठिकाणी पाऊस स्थिरावण्यास ऑगस्ट, सप्टेंबर महिना उजाडतो. त्यामुळे पुढची प्रवेश फी, पुढची ट्यूशन फी माफ केली पाहिजे. या वर्षाची ट्यूशन फी परत करावी आणि पुढची प्रवेश फी आणि ट्यूशन फी माफ करुन ती फी न घेता डायरेक्ट ॲडमिशन द्यावी. या प्रमाणे पुढे कार्यवाही करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, जो दुष्काळी पट्टा आहे तेथील वस्तीशाळेतील शिक्षकांचा प्रश्न आहे. त्यांना 1 हजार ते 3 हजार रुपये दिले जातात. दुष्काळग्रस्त भागातील व्यवस्था चालू ठेवण्यासाठी त्यांच्या पोटात काही देणार की नाही ? नाही तर तेथील शिक्षण बंद पडेल. आताच मुले परत जावयास लागली आहेत. तेथील वस्तीशाळा शिक्षकांचाही विचार करावा. मी शहरातील शिक्षकांबद्दल बोलत नाही. मी वस्तीशाळा शिक्षकांबद्दल बोलत आहे आणि हे सर्व शिक्षक दुष्काळग्रस्त भागातील आणि दुर्गम भागातील आहेत. त्यांचाही विचार करावा. नाही तर दुष्काळाचे कारण सांगून पैसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

नाहीत असे सांगणार असाल तर ते बरोबर होणार नाही. त्याबाबत सुध्दा या निमित्ताने सांगावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, जेवढे सॉफ्ट ड्रिंक्स आणि जेवढ्या ब्रिव्हरीज असतील किंवा जेवढे बियरचे कारखाने असतील त्या सर्वांचे पाणी ताबडतोब बंद करावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

प्रकल्पग्रस्तांच्या बाजूला हे सर्व कारखाने जोरात सुरु आहेत. लोकांना पिण्यासाठी पाणी नाही आणि त्यांना धो धो पाणी पुरवठा सुरु आहे. तो लगेच बंद करावा. लोकांना पिण्यासाठी पाणी नसल्यामुळे या कंपन्यांचा पाणी पुरवठा सुरु आहे तो बंद करुन किमान लाज राखली पाहिजे. शासन तशा प्रकारची कारवाई करील अशी माझी अपेक्षा आहे. एवढे बोलून मी येथेच थांबतो. धन्यवाद.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्था□□त होऊ□ उद्या बुधवार, दि□□ 13 मार्च, 2013 रोजी स□ळी 11 वाजता पु□ भरेल.

(सभा□हाची बैठ□ सायंकाळी 6 वाजू□ 20 मि□टां□, बुधवार, दि□□ 13 मार्च, 2013 रोजीच्या स□ळी 11 वाजेपर्य□त स्था□□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही